



# माणूस

पन्नास पैसे

प्रजासत्ताक दिन

विशेषांक १९७२

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | २९ जानेवारी १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | पंचतीस 35 | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |


# माणूस


संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे


**सप्रेम नमस्कार...**

□ मी माणूसचा ग्राहक नसलो तरी नियमित कविता-वाचक आहे. परंतु माझे संपूर्ण लक्ष श्री. अनंत भावे यांच्या 'जनरल जिरॉद्च्या धाडसी पलायना'ने खेचले. मन रोमेलचाच विचार करू लागले. श्री. रवींद्र पिंगे यांच्या शतपावलीतील 'पुजारी – जेम्स जॉईस' दीर्घकाळ स्मरणातून न जाणारा आहे. किंबहुना रवींद्र पिंगे 'माणूस'चे एक मोठे आकर्षण असते असे म्हटल्यास ते अप्रस्तुत होईल असे वाटत नाही. भारतीय मुसलमान हा एक संशोधनाचाच विषय आहे. दादूमियांचा उपक्रम आवडला. दि. बां.नी १८ लक्ष पावलांतून कुरकुरायला नको होते.

८ जानेवारी, १९७२ जयपाल चौगुले, चोभारा (आंबेजोगाई)

'माणूस'चे लेखक श्री. वसु भगत यांनी दोन वर्षांपूर्वी दिल्ली येथे पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची फ्रेंच टेलिव्हिजनसाठी दोन दिवसांची एक प्रदीर्घ मुलाखत घेतली होती. या मुलाखतीच्या प्रसंगी त्यांनी घेतलेली काही छायाचित्रे यावेळी मुखपृष्ठावर सादर केली आहेत. —संपादक.


साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# झंझावात

## चंद्रशेखर

लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीच्या वेळी भिंतीवरती रंगविलेल्या अनेक घोषणांपैकी मधून मधून एक घोषणा दिसते ती अशी, ' इंदिरा हटाव – देशको बचाव ! ' ही घोषणा भिंतीवर तशीच असली तरी देशातील वातावरणात कमालीचा फरक पडला आहे. इंदिरा गांधींनी पाकिस्तानी आक्रमणापासून देशाचा बचाव केला यासाठीं त्यांचा जवळजवळ एकमताने गौरव होत असून ही भावना पक्षाच्या सीमा ओलांडून गेली असल्याचे दिसते. संघटित लोकमताचा लक्षणीय असा एक अंश जून १९६९ ते डिसेंबर १९७१ ही अडीच वर्षे श्रीमती गांधींवर अनेक प्रकारचे आरोप करीत होता. या आरोपात काही तथ्य नव्हते असे आता म्हणणे शक्य आहे. पण त्यांच्याबद्दल अशी भावना निर्माण का झाली याची कारणे शोधणे राजकीय अभ्यासकांना उपयुक्त ठरेल.

इंदिराजींनी १९६९ सालच्या उत्तरार्धात जी पावले टाकली व जी भूमिका घेतली ती थोडक्यात अशी– १९६७ मध्ये कॉंग्रेसचा मोठ्या प्रमाणावर पाडाव झाला. या पक्षाचे काही व्यापक शुद्धीकरण केल्याखेरीज गत्यंतर नव्हते. पक्षाच्या प्रमुख व सरकारी पातळीवरील सर्वोच्च नेत्या म्हणून इंदिराजींना हा प्रश्न हाती घ्यावा लागला. त्यांच्यावर त्यावेळी बेशिस्तीचे, पक्षात फूट पाडण्याचे, उतावीळ-पणाचे आरोप करण्यात आले म्हणून हा मुद्दा विशेष मांडणे आवश्यक आहे. ज्या पक्षाचे केंद्रीय सरकारात नेतृत्व करावयाचे त्या पक्षाची सुधारणा करण्यासाठी काही पावले टाकण्याचा हक्क इंदिराजींना निश्चितच होता. नव्हे त्यांची ती जबाबदारी होती.

त्यांचे पहिले वैशिष्ट्य हे, की या शुद्धीकरणाची सुरुवात त्यांनी वरिष्ठ नेतृत्वा-पासून केली. पक्षाची भूमिका अधिक डावी, लोकाभिमुख व एकसंध असावी हा एकमेव निकष त्यांनी या शुद्धीकरणास लावला. ही भूमिका ज्यांना मान्य नव्हती त्या सर्व वरिष्ठ नेत्यांची पक्षातून हकालपट्टी केली. त्यावेळीं पक्ष दुभंगला असे जरी काही काळ वाटले तरी ती मोठ्या प्रमाणावरील हकालपट्टीच होती. हे त्यांनी कसे

केले ते विस्ताराने सांगण्याची गरज आहे असे नाही. ही हकालपट्टी व्यावहारिक रीत्याही प्रभावी आहे हे दाखविण्यासाठी त्यांनी १४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण केले व साधारण डाव्या विचारसरणीचे श्री. गिरी यांना पक्षाच्या तथाकथित अधिकृत उमेदवाराविरुद्ध उभे करून निवडून आणले. ज्यांना १९६७ च्या निवडणुकांचे राजकीय निष्कर्ष मान्य होते ते सर्व कॉंग्रेस कार्यकर्ते या पक्षांतर्गत लढ्यात इंदिराजींच्या बाजूस राहिले.

पक्षाने कित्येक वर्षांपूर्वी स्वीकारलेला कार्यक्रम अंमलात आणण्यास जर पक्षाच्या काही वरिष्ठ नेत्यांचाच अडथळा होत असेल तर तो कार्यक्रम पार पाडण्याची जबाबदारी ज्याच्यावर, तो पंतप्रधान वरील खेरीज कोणते पाऊल टाकू शकतो ? पक्ष निवडणुकीत निवडून येणार नाही या भयाखाली वावरणारा पंतप्रधान कोणतेही पाऊल पुढे टाकू शकणार नाही हे उघड आहे. पंतप्रधानपदाचे हे स्वातंत्र्यच इंदिराजींनी एक झंझावाती लढा देऊन पक्षाच्या जुन्या नेतृत्वाखाली राहणाऱ्या पक्षाकडून मिळवले व आपला मार्ग खुला केला. जानेवारी १९६६ मध्ये ताश्कंदमध्ये अंत होण्यापूर्वी शास्त्रीजींच्या मनातही या प्रकारची काही योजना घोळत होती असे मानण्यास जागा आहे. फरक एवढाच, की त्यांची योजना उजवीकडे झुकणारी होती. इंदिराजींच्या निष्कर्षांनुसार पक्षाला डावीकडे ढकलणे आवश्यक होते ते त्यांनी केले व त्यांचे हे पाऊल बरोबर होते हे मध्यावधी निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळवून त्यांनी सिद्ध केले. त्या निवडणुकीसाठी त्यांनी ' गरिबी हटाव ' ही घोषणा देशाला दिली. विरोधी पक्षांचे त्यावरचे उत्तर ' इंदिरा हटाव ' हे होते.

' इंदिरा हटाव ' या भूमिकेला निवडणुकीतील निकालाने उत्तर मिळाले तरी त्याबाबतही अनेक शंका उपस्थित करण्यात आल्या व इंदिराजींविषयीचे आरोपही तेवढ्याच मख्खपणाने होत राहिले. हे आरोप मुख्यत: तीन १ : इंदिराजी देश रशियाला विकणार आहेत. २ : त्या मुस्लिमधार्जिण्या असून राजकीय स्वार्थासाठी मुस्लीम लीगला अभय देत आहेत. ३ : त्या हुकूमशहा आहेत. या आरोपाचे तात्त्विक खंडन करण्याचा प्रयास मी करीत नाही. इंदिराजींची नंतरची पावले कशी पडत गेली तेवढे फक्त नमूद करतो.

मध्यावधी निवडणुकीत जरी भरघोस यश मिळाले तरी जनमानसात आपल्याबद्दल काही आशंका आहेत याची इंदिराजींची जाणीव सतत जागी होती. या आशंका दूर करण्यासाठी एकादे मतभेदातीत क्षेत्र निवडून त्यात यशस्वी होणे आवश्यक आहे हे त्यांना कळले होते. ' गरिबी हटाव ' कार्यक्रम त्याच्या सर्व अर्थांनिशी तावडतोब अंमलात आणला तर आपल्या वादग्रस्त प्रतिमेत अधिक गडद रंग भरले जातील व त्याच त्या आरोपांची पुनरावृत्ती होईल हेही त्यांना समजून चुकले होते. पक्षात जसे निर्विवाद स्थान मिळवले तसे आम जनतेत मिळवावे व मग एक राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून ' गरिबी हटाव ' कार्यक्रम हाती

घ्यावा असा त्यांचा विचार होता. पक्षातदेखील त्यांचे प्रभुत्व निर्विवाद होते, ते फक्त केंद्रीय पातळीवर. काही राज्यात ते नव्हते.

त्यांना आवश्यक अशी संधी काहीशा योगायोगाने चालून आली. डिसेंबर ७० मध्ये पाकिस्तानात निवडणूका होऊन लोकप्रतिनिधींच्या हाती सत्ता देण्याबाबत काही कटकटी चालू झाल्या होत्या. त्याचा उद्रेक होऊन पश्चिम पाकिस्तानी राजवटीने पूर्व बंगालमध्ये मार्च ७१ च्या अखेरीपासून ' न भूतो ' अशी दडपशाही सुरू केली. ' बांगला देश 'ने स्वातंत्र्य घोषित करून पाकिस्तानातून फुटून निघण्याचा निर्णय केला. दडपशाहीला विटून पूर्व बंगालमधून भारतात निर्वासितांचा लोंढा सुरू झाला. भारताची पूर्व सीमा व सीमावर्ती प्रांतातील राज्ये यांमधील ' सुव्यवस्था ' संपुष्टात आली.

## घटनापरंपरा

इंदिराजींनी या प्रश्नास प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. प्रथम नेहमीप्रमाणेच त्यांच्यावर दुबळेपणा वगैरे आरोप होत होते. ते सहन करून, एका विवक्षित पद्धतीने त्यांनी या प्रश्नास हवा तसा आकार देण्याची प्रक्रिया सुरू केली. बांगला देशच्या मुक्तिफाजेस शिक्षण देणे, शस्त्रे देणे, व तिला संघटित करणे ही कामे सुरू झाली. या धोरणाने अमेरिका साहजिकच अस्वस्थ झाली. पाकिस्तानी शासन अधिकाधिक उतावीळ बनले. दरम्यान अमेरिकेने चीनशी जवळीक करण्याचा इशारा देताच इंदिराजींनी रशियाशी वीस वर्षे मुदतीचा मित्रत्वाचा करार करून टाकला; व मुक्तिफौजेस अधिक साहाय्य करण्यास सुरुवात केली. पाकिस्तानी राजवटीचा माफक संयम सुटून अखेरीस तिने भारतावर आक्रमणे केली, याचा फायदा घेऊन भारतीय सैन्य पूर्व बंगालमध्ये घुसले व त्याने ' बांगला देश ' स्वतंत्र केला.

या सर्व घटनापरंपरेमध्ये बारकाईने पाहिल्यास इंदिराजींनी या प्रश्नास प्राधान्य देण्याचा निर्णय आधीच केला होता असे दिसून येईल. निर्वासितांचा बोजा, पाकिस्तानची मुजोरी, बंगला देशची असहाय्यता, राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न हे सर्व जमेस धरूनही भारत सरकारने वरीलप्रमाणे पावले टाकली नसती तर विरोधी पक्ष वा लोकमत हे करण्यास त्यांना भाग पाडू शकले असते की नाही याबद्दल मला शंका आहे. अगदी तसाच विचार केला तर पाकिस्तान या देशावर स्वारी करून त्याला जिंकू शकेल असा संभव नव्हता व पुढेही कधी निर्माण होईल असा प्रश्न नव्हता. पाकिस्तान भारताबरोबर वैर करते हे खरे पण पाकिस्तानपासून भारताच्या स्वातंत्र्यास धोका पोचेल असे म्हणणे तर्कशुद्ध नव्हे. तेवढी त्याची ताकद नाही.

राहता राहिला प्रश्न ' बांगला देश 'चा. बांगला देशचा प्रश्न नवा नाही. गेली कित्येक वर्षे तो धुमसत आहे. असे असता यापूर्वी भारताने त्यास कधीच उत्तेजन दिले नाही वा मदतीचा हातही पुढे केला नाही. निर्वासितांचा प्रश्न जरा गुंतागुंतीचा आहे. यापूर्वी भारतात आलेले लक्षावधी निर्वासित पाकिस्तानी नागरिक

व म्हणून परकेच होते. त्यांना परत पाठविण्याकरता भारताने कधी सशस्त्र कारवाई केली नाही. असे असता १९७१ सालीच भारताने हे पाऊल का उचलले ? पूर्व-बंगाली मुस्लीम पूर्व पाकिस्तानी होते तेव्हा धर्मांध होते आणि आता 'बांगला देश' म्हटल्याने ते एकदम सहिष्ण झाले व निर्वासित तेथे आता सुखाने राहू शकतील याला प्रमाण काय ?

या साऱ्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. कारण ती मिळणार नाहीत. काँग्रेस पक्षाच्या शुद्धीकरणानंतर इंदिराजींचे जें एक निर्णायक व निर्विवाद नेतृत्व या पक्षास लाभले त्या नेतृत्त्वाच्या मूळ स्वरूपात या प्रश्नांचे उत्तर आहे. इंदिराजींचे नेतृत्व कोणत्याही प्रश्नाचा निर्णय करण्याकडे प्रवृत्ती असलेले आहे. पंडीत नेहरू यांची लोकप्रियता कमी नव्हती पण ते कोणत्याही प्रश्नाचा ठाम निर्णय घेणे टाळीत किंवा पुढे ढकलीत याचे कारण त्यांनी आपल्या सौजन्यामुळे त्यांच्याच पक्षात अनेकविध विचारसरणीचे भूमिकांचे व वृत्तीचे लोक राहू दिले होते. आणि या साऱ्यांना खूप ठेवण्याचा ते प्रयत्न करीत असत.

इंदिराजींना ही गरज आता त्या प्रमाणात राहिलेली नाही. किंबहुना या लोकरंजनाचा मोठ्या धैर्याने त्याग करूनच त्यांनी पक्षाचे निर्विवाद नेतृत्व मिळविले असल्याने त्यांना कोणालाही खूष करण्यासाठी निर्णय टाळण्याची आवश्यकता नाही. त्या निर्णय घेऊ शकतात, आणि शेवटपर्यंत त्याची तड लावू शकतात.

विरोधी पक्षांनी व संघटना काँग्रेसने त्यांच्या ज्या वैशिष्टयांबद्दल त्यांची निंदा अहमहमिकेने केली होती तेच त्यांचे वैशिष्टच देशाला परवाच्या संघर्षात विजयी करण्यास कारणीभूत झाले हे लक्षात घेतले पाहिजे. देशाच्या अतर्गत कारभारात जो नेता ठाम निर्णय घेतो, त्यासाठी जरूर तो धोका पत्करतो तोच परराष्ट्र व्यवहारातही ठाम निर्णय घेऊ शकतो ही गोष्ट त्यावेळी बऱ्याच मंडळींनी समजावून घेतली नाही, ही त्यांची शोकांतिका आहे. इंदिराजींनी 'बांगला देश'चा प्रश्न काही पुढाकार घेऊन हातात घेतला तो राजकीय गरज म्हणून नव्हे, पक्षीय राजकारण म्हणून नव्हे तर कोणताही प्रश्न निर्णायकरणे सोडविणे हा त्यांचा स्थायीभाव आहे म्हणून ! त्यांच्या नेमक्या याच गुणावर टीकेचा गदारोळ उठला होता हे पाहिले की आपल्या राजकीय परिपक्वतेबद्दल शंका येते.

प्रथम नमूद केलेल्या तीन आरोपांपैकी पहिल्याचा आता विचार करू. आपल्या देशात काही खरा काही खोटा असा एक दृढ समज आहे की डाव्या विचारसरणीचा नेता प्रखर राष्ट्रवाद दाखवू शकत नाही. तो साम्यवादी राष्ट्रांच्या आहारी जातो. हाच आक्षेप स्वतंत्र, जनसंघ यांच्याबाबत घेतला जात नाही हे मात्र विशेष म्हणावे लागेल. डाव्या विचारांचे लोक जर साम्यवादी राष्ट्रांच्या दडपणात राहतील तर उजव्या विचारांचे लोक अमेरिकेच्या कह्यात रहातील असे का मानू नये ? पण नेहमी असे दिसते, की डाव्या लोकांवर हा आरोप अगदी उबग येईपर्यंत केला जातो व राष्ट्रवादाचा मानाचा फेटा उजव्या पक्षाच्या मस्तकावर ठेवला जातो.


Swastik FOAM
is so intimate because...
It is restful: Lie back and relax. Swastik Foam offers a soft support to your tired limbs.
It is protective: Does not harbour insects and is anti-moisture too. Keeps cool and fresh by "breathing" through a million air-cells
It is dependable: Lasts a lifetime. Can be used wherever cushioning is needed, so you're always supported by the gentle firmness of Swastik Foam. Available in a wide range of ready-to-use items like back rests, car seats, bolsters, mattresses and pillows, as well as by the metre in hard, medium or soft foam.
Swastik Foam– for the rest in your life.
SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
Swastik House,
Kirkee, Poona 3.
Dattaram-SRP-8-A

## डावा राष्ट्रवाद

माझ्या दृष्टीने इंदिराजींच्या नव्या नेतृत्त्वाच्या यशाचा सर्वांत मोठा फायदा असा, की डाव्या विचारसरणीचे नेतृत्त्व तितकेच प्रखर राष्ट्रवादी असू शकते हे त्यांनी सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ केले आहे. ही टीका आता या देशात तरी पुन्हा होणार नाही व डाव्या विचारसरणीची या भ्रामक कलंकातून कायमची मुक्तता झाली आहे. या उप्परही जे लोक हा प्रश्न काढतील ते दुर्लक्षित होतील याविषयी मला तरी शंका नाही. देशामध्ये समाजवाद यावयाचा असेल, गरिबांचे काही प्रश्न सुटावयाचे असतील व लोकशाहीला आर्थिक पाठबळ मिळावयाचे असेल तर उजव्या गटाच्या हातातील हे दुष्ट हत्यार केव्हातरी निष्प्रभ होणे आवश्यकच होते व हे महान कार्य इंदिराजींनी करावे हे त्यांच्या प्रतिभाशाली नेतृत्त्वास साजेसेच आहे.

आता दुसरा प्रश्न मुस्लिम धार्जिणेपणाचा. पाकिस्तान मुस्लिम राष्ट्र असूनही व भारतात कोटयवधी मुस्लिम असूनही इंदिराजी 'बांगला देश' मोहीम हाती घेण्यास कचरल्या नाहीत ह्यातच सर्व आले. काँग्रेस पक्ष मुस्लिमधार्जिणा होता—गरीब जनतेशी संबंध न राहिल्याने तो हुकमी मतांसाठी मुस्लिम धार्जिणेपणा करीत असे हे खरे. पण इंदिराजींनी पक्षाचे परिवर्तन केल्यापासून त्यांच्या काँग्रेस पक्षास जनतेने पुन्हा आपला पाठिंबा दिला आहे व त्यांना मुस्लिमधार्जिणेपणाची गरज नाही. गरिबांची शक्ती त्या पक्षाजवळ आहे त्याला कोणत्याही एका जमातीपुढे नमण्याचे कारण नाही हा धडा सर्व विरोधी पक्ष गिरवतील तर त्यांच्या राजकीय भवितव्यात थोडा आशादायक बदल होईल.

बांगला देश पर्वामुळे परधार्जिणेपणा व मुस्लिमअनुनय या बाबतची इंदिराजींवरील टीका फोल ठरली आहे. पण त्या हुकूमशहा होण्याचा प्रयत्न करीत आहेत ही टीका अजून कायमच आहे व निवडणुकींच्या मोसमात ही टीका जोर धरील. अशी टीका करणारे गटच पंडीतजींच्या काळात काँग्रेस पक्ष ही एक बजबजपुरी आहे अशी टीका जोरजोराने करीत होते. सर्वोच्च नेत्याने काही आग्रही भूमिका न घेतल्याने काँग्रेस पक्ष या अवस्थेस पोहोचला होता हे खरे आहे. हे बदलण्यासाठी पक्षातील प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाच्या कार्यक्रमाशी एकनिष्ठ राहिला पाहिजे असा आग्रह इंदिराजींनी धरला तर त्यात हुकूमशाही वृत्ती आहे असे मानण्याचे कारण नाही, असा एकसंध, एकानिष्ठेने वागणारा पक्ष निर्माण करण्याचे काम पंतप्रधानांचे आहे. कारण त्याला त्या पक्षाच्या वतीने काही कार्यक्रम अंमलात आणावयाचा आहे.

आज राज्यपातळीवरील नेतृत्व आपल्या विचाराने वागणारे असावे म्हणून आग्रह धरल्यावद्दल इंदिराजींवर टीका होत आहे पण एक ठाशीव आर्थिक कार्यक्रम अंमलात आणावयाचा असेल तर राज्याचे मुख्यमंत्रीही पंतप्रधानांच्या विश्वासा-

तीलच हवेत. नेहरूंनी एकेक राज्य एकेका पुढाऱ्याकडे सोपविल्यानेच व त्यांच्या राजकीय निष्ठेबद्दल आग्रह न धरल्याने काँग्रेसची पीछेहाट झाली. केंद्र व राज्ये हे कारभाराच्या सोयीसाठी केलेले स्तर आहेत. पुढाऱ्यांना दिलेली वतने म्हणून राज्यांकडे पाहून चालणार नाही, देशात सर्वत्रच गरीब जनता राहते व तिचे प्रश्न सोडविण्याचा कार्यक्रम अंमलात येण्यासाठी सर्वत्रच एका किमान निष्ठेचें नेतृत्व पाहिजे असा आग्रह म्हणजे हुकूमशाही नव्हे. इंदिरावादी, इंदिरानिष्ठ हे शब्द-प्रयोग वृत्रपत्रे सोयीसाठी वापरीत असतात. त्यातून फारसा अर्थ न काढणेच बरे. पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाची पक्षावर छाप असणे ही खूण हुकूमशाहीची नसून कार्यक्षम पक्षयंत्रणेची आहे.

## नवा कुंभमेळा

गरिबी हटाव कार्यक्रमाने व बांगला देश मोहिमेने देशात इंदिराजींचे स्थान आता अढळ झाले आहे. मी मागे एकदा म्हटल्याप्रमाणे त्यांचे नेतृत्व प्रस्थापित झाले; आता त्यांच्या वागण्यातील व भूमिकेतील आव्हानात्मकता कमी होईल व त्या सर्व घटकांना बरोबर होऊन वाटचाल करण्याचा प्रयत्न करतील. येथे पुन्हा एकदा नेहरूंच्या काँग्रेसपुढील धोकाच उद्‌भवण्याचा संभव नजरेआड करता येत नाही. त्यांच्या असामान्य लोकप्रियतेचा फायदा घेऊन अनेकजण आता काँग्रेसपक्षात शिरत आहेत व लौकरच तेथे एक नवा कुंभमेळाच तयार होईल. त्यांच्यात व पक्षात पुन्हा अंतर पडेल व काँग्रेस पुन्हा एकदा निष्क्रीय अंतर्विरोधाचे भक्ष्य होईल. राज्यनिवडणुकीत इंदिराजी जी दक्षता घेत आहेत त्यावरून त्यांना या धोक्याची पूर्ण जाणीव आहे असे दिसते. पक्षाला तीन वर्षांपूर्वी दिलेली ताकद आणि दिशा कायम राहील असे नेतृत्व राज्यपातळीवरही आणण्याचा त्यांचा कटाक्ष आहे.


सरदारगृह

राहण्याची व भोजनाची उत्तम सोय. हीरक महोत्सवानिमित्त
विविध सुखसोयी—अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह.

सरदारगृह प्रायव्हेट लिमिटेड

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

मंगलकार्ये व मेजवान्यांची उत्तम व्यवस्था.

एवढयाने त्यांच्यापुढील कार्य सोपे होत नाही. बांगला देशचा प्रश्न एका अर्थाने सोपा होता. 'गरिबी हटाव' प्रश्न मात्र अवघड आहे. कारण येथे युद्धाचे क्षेत्र व शत्रू शोधण्यापासून सुरुवात आहे. प्रत्येकजणच आमची गरिबी हटवा असे म्हणत आहे. यातील धोका ओळखून 'गरिबी हटाव' कार्यक्रमाला काही बांधीव स्वरूप देण्याची गरज आहे. श्रीमंत वर्गाला काही परिणामकारक असा अकुंश लावून आवश्यक तो पैसा विकासाठी उभा करणे, त्याच्या विनियोगाची विशेष योजना आखणे आणि त्या योजनेद्वारा उत्पादन व वाटप या दोन्ही मार्गांनी गरिबी दूर करणे हे काम त्यांना यापुढील काही वर्षे त्यांच्या अंगभूत निश्चयीपणाने करावे लागेल. या कामी पक्षावर भिस्त ठेवून राहणे श्रेयस्कर नव्हे. सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचेल अशी निष्ठावान शासक व कर्मचारी आणि कार्यकर्ते यांची फळी उभारावी लागेल. ही जर उभारली नाही तर सध्याच्या भांडवलशाही, नोकरशाही चौकटीकडून कोणतेही काम होण्याची अपेक्षा नाही. गरीब व कष्टकरी जनता आता मार्गांची व साधनांची काथ्याकूट ऐकण्याच्या मनस्थितीत नाही–प्रत्यक्ष काय काम होते हे ती कटाक्षाने पहात आहे–आर्थिक परिवर्तन ही आता ध्येयवादाची वा तत्त्वज्ञानाची बाब राहिली नसून नव्याने दृग्गोचर झालेल्या राष्ट्रवादाची एक अपरिहार्य गरज बनलेली आहे. जनता या ऐतिहासिक कार्यासाठी आवश्यक अशी निर्णायक सत्ता इंदिराजींच्या हाती देण्यास मागेपुढे पहात नाही तर इंदिराजींचे हे देवदत्त कर्तव्य आहे, की ती जनतेच्या हितासाठी वापरण्यास त्यांनी मागेपुढे पाहू नये.

त्यांनी नेतृत्वाची लढाई जिंकली आहे–तीसुद्धा लोकशाही मार्गानेच. त्यामुळे अशी आशा करण्यास हरकत नाही की जनतेची लढाईही त्या लोकशाही मार्गानेच जिंकून दाखवतील. गरीब जनतेच्या अपेक्षांची, गरजांची आणि आर्थिक परिवर्तनाच्या आवश्यकतेची जाणीव बांगला देश लढयातही इंदिराजींनी सतत जागती ठेवली. त्यांच्या सर्व विचारांत सामान्य जनतेशी त्यांनी एक प्रामाणिक असे इमान राखले आहे असे गेल्या काही महिन्यांतील त्यांच्या भाषणावरून दिसून येईल. हेच इमान त्या प्रत्यक्ष धोरणात व कार्यवाहीत दाखवतील असे मागील तीन वर्षाच्या त्यांच्या झंझावाती नेतृत्वावरून वाटते. हे न झाल्यास काय होईल याचे वर्णन त्यांनीच भारत-पाक युद्ध सुरू होण्याच्या दोनच दिवस आधी म्हणजे १ डिसेंबर ७१ रोजी केले. २५ व्या घटना दुरुस्तीबद्दल बोलताना इंदिराजी लोकसभेत म्हणाल्या 'भारतीय संसदेने परिवर्तन घडवून न आणल्यास ते परिवर्तन संसदेबाहेरच्या मार्गांनी येईल.'

क्रांतीचे हे भान त्यांना यापुढेही असेच राहील यात शंका नाही–कारण भारतीय क्रांती जन्मास घालण्याचे सामर्थ्यही त्यांचे ठायी आहे. □ □ □

# चाकावरचे विचार

## श्री. मा. भावे

### त्याचा विसर न व्हावा

३१ डिसेंबर १९२९ ला लाहोर येथे भरलेल्या, काँग्रेसने पूर्ण स्वराज्याचा ठराव मंजूर केला. त्या ठरावात काँग्रेसजनांनी कायदेमंडळाच्या निवडणुकांवर बहिष्कार टाकावा आणि सभासदांनी कायदेमंडळाचे राजीनामे द्यावेत असा आदेश देण्यात आला होता. योग्य वेळ यताच कायदेभंग व करबंदी या चळवळी सुरू करण्यात येतील असे आश्वासनही ठरावात होते. या ठरावाचा विचार करण्यासाठी काँग्रेस कार्यकारिणीची बैठक दोन जानेवारी १९३१ रोजी भरली व २६ जानेवारी हा दिवस 'पूर्ण स्वराज्य दिन' म्हणून पाळण्यात यावा असे तीत ठरले.

यानंतर गांधीजी साबरमतीच्या 'सत्याग्रहाश्रमा'त परतले. 'पूर्ण स्वराज्य दिना'ची प्रतिज्ञा तयार करणे आणि भावी आंदोलनाची आखणी करणे ही दोन कामे त्यांना करावयाची होती. जातीय तणाव, अंतर्गत मतभेद व हिंसामय राजकारण यामुळे मार्ग काढणे कठीण जात होते. १८ जानेवारीला रवींद्रनाथ ठाकूर भटीस आले असता गांधीजींनी सांगितले, 'मी रात्रंदिवस विचार करीत आहे, पण भोवतीच्या अंधारातून एकही प्रकाशकिरण डोकावताना दिसत नाही.' तथापि आपल्याला मार्ग सापडेल असा विश्वास त्यांना होता.

२३ जानेवारी १९३१ च्या 'यंग इंडिया'त गांधीजींनी लिहिले, 'आपला लढा आत्मशुद्धीसाठी आहे. एक धोरण म्हणून नव्हे, तर एक जीवनदृष्टी म्हणून आपण अहिंसेचा स्वीकार केला पाहिजे! याच अंकात 'आपल्या इंग्रज मित्रांस उद्देशून' लिहिलेल्या लेखात गांधींनी म्हटले होते 'हिंदी जनतेच्या क्रोधास कायदेभंगाच्या चळवळीतूनच वाट मिळवून दिली पाहिजे. स्वराज्यापेक्षाही स्वसामर्थ्याच्या प्रत्ययाची या देशाला अधिक जरुरी आहे, कारण असा प्रत्यय येणे म्हणजेच स्वातंत्र्य.'

'पूर्ण स्वराज्य दिन' कसा साजरा करावा याविषयी काही सूचनाही 'यंग इंडिया'च्या वर उल्लेखिलेल्या अंकात होत्या. 'पूर्ण स्वराज्य दिन' हा स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी पाळावयाचा नसून आम्ही पूर्ण स्वराज्याखेरीज स्वस्थ बसणार नाही हा निर्धार व्यक्त करण्यासाठी पाळावयाचा होता. कायदेभंगाची सुरुवातही

त्या दिवशी होणार नव्हती. विधायक कार्य व आत्मशुद्धी यासाठी तो दिवस होता. त्या दिवशी भरणाऱ्या सभांतून फक्त प्रतिज्ञापत्रकाचे वाचन होणार होते, भाषणे होणार नव्हती.

गांधींनी तयार केलेल्या व काँग्रेस कार्यकारणीने मंजूर केलेल्या प्रतिज्ञापत्रकांत म्हटले होते, 'जीवनावश्यक गरजांची पूर्ती' केल्या श्रमांचा पूर्ण मोबदला आणि स्वातंत्र्य हे हिंदी जनतेचे हक्क आहेत, कारण जीवनाचा पूर्ण विकास होण्यासाठी या गोष्टी आवश्यक आहेत. जे सरकार जनतेचे हे हक्क हिरावून घेऊन तिला दडपू पहात असेल, ते सरकार बदलण्याचा वा उलथून टाकण्याचा अधिकार जनतेला आहे, अशी आमची धारणा आहे.... यामुळे हिंदी राष्ट्राने ब्रिटिशांबरोबर असलेले संबंध तोडून टाकून पूर्ण स्वराज्य मिळविले पाहिजे !

ब्रिटिश राजवटीत हिंदुस्थानचा राजकीय, सामाजिक, आर्थिक व आध्यात्मिक अधःपात झाल्याचे नमूद करून प्रतिज्ञापत्रकात पुढे म्हटले होते, 'आमच्या देशाची सर्वांगांनी अवनती घडवून आणणाऱ्या राजवटीचा अंमल सहन करणे हा मानवता व ईश्वर यांच्या लेखी गुन्हा ठरेल. तथापि हिंसक मार्गांनी आमचे ध्येय साध्य होणार नाही हे आम्ही जाणतो. ब्रिटिश राज्याशी असहकार, कायदेभंग व करबंदी याच मार्गांचा अवलंब करावा लागेल. या नृशंस राजवटीला आम्ही कोणतीही मदत करण्याचे थांबविले, अहिंसक मार्गांनी करबंदी केली, तर हे राज्य टिकणार नाही अशी आमची खात्री आहे. म्हणून आम्ही अशी प्रतिज्ञा करतो, की पूर्ण स्वराज्य अस्तित्वांत येण्यासाठी काँग्रेसने वेळोवेळी पाठविलेल्या आज्ञा आम्ही पाळू !'

काँग्रेसचे प्रमुख चिटणीस श्री. श्रीप्रकाश यांच्या सहीने काढलेले हे पत्रक सार्वजनिक सभांतून वाचण्यासाठी देशभर पाठविले होते.

'काँग्रेस बुलेटिन'च्या अंकात 'पूर्ण स्वराज्य दिना'ची खालील हकीकत आली आहे–काँग्रेस कार्यकारिणीने दिलेल्या आदेशानुसार रविवार दिनांक २६ जानेवारी या दिवशी देशभर पूर्ण स्वराज्य दिन पाळण्यात आला. गावागावांतून व खेड्याखेड्यांतून राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली व मिरवणुका काढण्यात आल्या. सार्वजनिक सभांतून काँग्रेसने केलेला ठराव मंजूर करण्यात आला आणि प्रतिज्ञापत्रकाचे वाचन झाले. कलकत्ता, मुंबई, दिल्ली व लाहोर या शहरांतील मिरवणुकीत लाखो लोक सामील झाले होते !

'बहुतेक ठिकाणी समारंभ शांततेने पार पडले. परंतु म्हैसूर व पतियाळा संस्थानांत पोलिसांनी हस्तक्षेप केला. म्हैसूर व बंगलोर शहरात राष्ट्रध्वज ओढून काढण्यात आले. पतियाळांत ११२ शिखांना अटक करण्यात करण्यात आली.

'टोकियो, ऑक्सफर्ड, लॉस एंजेलिस, व्हँकुव्हर व व्हिक्टोरिया अशा परदेशांतील शहरांतूनही पूर्ण स्वराज्य दिन साजरा झाला.'

अशी आपल्या पहिल्या स्वातंत्र्य-दिनाची हकीकत आहे.

## महाराष्ट्र कॉंग्रेसचे तिकीट वाटप

महाराष्ट्र कॉंग्रसचे विधान-सभांच्या निवडणुकांसाठी उमेदवार ठरविण्याचे काम 'रिव्हिएरा' मधील श्री. चव्हाण यांच्या अलीशान फ्लॅटमध्ये पार पडले. या तिकीट-वाटपाचे इतर परिणाम काय असतील ते असोत पण कऱ्हाडला जन्मलेल्या, यवतमाळ शेती करणाऱ्या आणि दिल्लीत राहणाऱ्या चव्हाणांना मुंबईत फ्लॅट कशासाठी लागतो याचे उत्तर मिळाले. उद्या मोहन धारियांनी जागेचे रेशनिंग केले तरी हा फ्लॅट आता जाणार नाही. एरवीही तो गेलाच असता अशातला भाग नाही.

पेशवाईत दर श्रावणांत पर्वतीच्या रमण्यात दक्षिणा वाटण्याचा समारंभ होई. गावोगावचे भट-भिक्षुक तांड्याच्या-तांड्याने पुण्यात येत आणि दक्षिणेच्या दिवशी रमण्याला त्यांचा गराडा पडे. रमण्याच्या प्रत्येक देवडीवर कोणी खासा बसून ब्राह्मणांची परीक्षा घेई व दक्षिणा देई. पेशवाईत कॅमेरे नसल्याने सोहळा कसा होत असेल याची कल्पना येत नाही. तथापि रिव्हिएराचे जे फोटो वर्तमानपत्रांतून आले आहेत. त्यांवरून या दक्षिणा-समारंभाचा अंदाज बांधता येणे शक्य झाले आहे. पर्वतीच्या देवड्यांवर पूर्वी खासे बसत असत आता चव्हाणांच्या फ्लॅटच्या निरनिराळ्या दारांवर वसंतरावदादा, शंकरराव चव्हाण, बाळासाहेब देसाई अशी मंडळी बसत असतील.

विरोधी पक्षांच्या मंडळींना हा समारंभ आवडत नाही. परवाच एका सभेत बोलताना श्री, ना. ग. गोरे म्हणाले, की बांगला देश युद्धात जी परंपरा घडली त्याच्याशी हे सुसंगत नाही. ही भांडणे,हेवे-दावे, क्षुद्र मत्सरादी त्या युद्धात दिसलेल्या भव्य कर्तृत्व, राष्ट्रीय ऐक्य इत्यादी गुणांशी विसंगत आहेत. विरोधी पक्षांचा भाव असा असतो, की त्यांच्याकडे या गोष्टी नाहीत हे स्पष्ट व्हावे. पण हे विधवेने मला कुंकवाची उठाठेव करावी लागत नाही, असा टेंभा मिरविण्यासारखे आहे. उमेदवारांसाठी स्पर्धा असली तर हेवेदावे होणार !

कॉंग्रेसचे उमेदवार ठरविताना गटबाजीला ऊत येतो, दडपणे येतात ही चिंतेची गोष्ट नाही. कॉंग्रेसच्या तिकिटाला इतके महत्त्व येते हीच मुळात काळजी करण्यासारखी बाब आहे. पूर्वी ज्याप्रमाणे कोणताही नवा विचार मांडावयाचा असल्यास तो वेदांच्या चौकटीत बसवून दाखवावा लागे, त्याप्रमाणे आज कोणतेही राजकीय कार्य कॉंग्रेसच्या चौकटीत बसते असे दाखवून दिल्याखेरीज ते मान्यता पावत नाही. त्यामुळे कम्युनिस्ट, सोशॅलिस्ट, स्वतंत्र आदी पक्षांचे लोक आणि इतर कर्तृत्ववान व्यक्ती कॉंग्रेसमध्ये जातात.

याचे एक उदाहरण नुकतेच वाचावयास मिळाले. वडार समाजाच्या लोकांनी आपल्या समाजातील व्यक्तीस कॉंग्रेसचे तिकीट मिळाले पाहिजे, असा ठराव केला. वास्तविक वडारांना आपल्या समाजातील व्यक्तीस निवडून आणावयाचा असेल,

तर त्यांनी इतर समाजांशी वाटाघाटी करून एखादी व्यक्ती निवडून आणावी. कॉंग्रेसचे तिकीटच मिळावे असा आग्रह धरण्याचे कारण नाही. वडार, तेली, कोष्टी, मुसलमान, साळी अशा समाजांनी केलेले या प्रकारचे ठराव अनेकदा वाचनात येतात. त्यांनी जर स्वतंत्र संघटना उभारली, तर मतांची योग्य वाटणी करून त्यांना आपले उमेदवार निवडून आणता येतील.

येथेच कॉंग्रेस पक्षाचे खरे स्वरूप स्पष्ट होते ते हे, की निदान ग्रामीण भागां पुरती तरी, कॉंग्रेस ही अशा जातीवार गटांची संघटनाच आहे. त्यामुळेच वर उल्लेखिलेले समाज आपसांत जागांची वाटणी न करता कॉंग्रेसकडे तिकिटासाठी धरणे धरतात आणि कॉंग्रेसला त्यांचा हट्ट पुरवावा लागतो. कॉंग्रेस हा एक पक्ष नसून तो एक निवडणूक संघ आहे.

अमेरिकेच्या अध्यक्षाच्या निवडणुकीत मतदार अध्यक्षाची प्रत्यक्ष निवड करत नाहीत. आपल्या मतदारसंघातून ते एक प्रतिनिधी निवडून देतात. असे निवडलेले अध्यक्षीय उमेदवारांना मते देतात. या प्रतिनिधींचा जो संघ बनतो त्याला निवडणूक संघ असे म्हणतात. आपल्याकडे विधानसभा सदस्य वा लोकसभा सदस्य यांची निवड मतदार प्रत्यक्ष मतदानाने करतात. त्यासाठी निवडणूक संघाची पद्धत नाही.

परंतु मतदार अप्रौढ असल्याने आपल्याकडे कॉंग्रेसपक्ष हाच निवडणूक संघासारखा वागू लागला आहे. मतदार आणि त्यांचे प्रतिनिधी यांच्यात कॉंग्रेसची एक दलाली निर्माण झाली आहे. यात कॉंग्रेसचा दोष नाही. जनतेची राजकीय अप्रगल्भता आणि विरोधी पक्षीयांची दुर्बलता यांचा तो परिणाम आहे. तथापि एक ज्येष्ठ व श्रेष्ठ राजकीय पक्ष या नात्याने ही परिस्थिती बदलण्याची जबाबदारी मात्र कॉंग्रेस पक्षावर निश्चितच येते.

या संबंधात काही लोकांची अशी सूचना आहे, की विधानसभा व लोकसभा सदस्यांच्या निवडणुकांसाठी निवडणूक संघांची कायदेशीर तरतूदच करण्यात यावी. एक माजी सनदी नोकर श्री. गोपालकृष्ण यांनी अशी सूचना केली होती : प्रत्येक मतदार संघासाठी एक ' निवडणूक संघ ' प्रथम निवडून घेण्यात यावा. त्या संघाने दोन उमेदवारांची अंतिम निवडणुकीसाठी निवड करावी. म्हणजे १०–१५ उमेदवार असले–त्यात एका पक्षाला एकाहून जास्त उमेदवारही उभे करता येतील–तर निवडणूक संघाने मतदानाने त्यातील दोनच उमेदवार निवडावयाचे. या दोन उमेदवारांतून आपला प्रतिनिधी सर्वसाधारण मतदारांनी निवडणुकीद्वारा पुन्हा निवडावयाचा.

या सूचनेचा खोल विचार सर्व पक्षांनी केला पाहिजे. ही सूचना अंमलात आली तर कॉंग्रेस पक्ष हा जो अनैसर्गिक निवडणूक संघ अस्तित्वात आला आहे तो नाहीसा होईल आणि राजकारण अधिक मोकळे होईल असे वाटते. □ □ □

नलिनी अंबाडे

# खुल जा सिम सिम

तुम्हाला ती अलिबाबा चाळीस चोरांची गोष्ट ठाऊकच असेल. मी तर विसरूनही गेलेय. प्रचंड गुहा होती म्हणे–तीमध्ये खूप संपत्ती– गुहेला अभेद्य दार. ते दार म्हणे आपोआप उघडायचे. त्यासाठी परवलीचा शब्द होता "खुलजा सिम सिम"! ह्याच परवलीच्या शब्दाचा जप गेले २ महिने आम्ही मद्रासी करीत होतो. अर्थात् थोडासा बदल करून, "खुल जा सिम सिम ! खुल जा सिम्प्सन्"

नुसते सिम्प्सन सांगून तुम्हाला कळणार नाही. तुम्ही लॉऱ्या ट्रक पाहता त्यांपैकी फार्गो-डॉज अन् फोर्ड-शेवरलेट गाड्यांची इंजिने भारतात बनविणारी कंपनी म्हणजेच मद्रासची "सिम्प्सन अँड कंपनी लि." ! मॅसी फर्ग्यूसन "टाफे" ट्रॅक्टर्स बनविणारी ती हीच–पर्किन्स डिझेल इंजिने बनविणारी कंपनी ती हीच ! दिवसाला तीस इंजिने म्हणजे थट्टा नव्हे बरं. मुख्य वटवृक्षापेक्षा पारंब्यांचा विस्तार अधिक असतो ना, त्याप्रमाणेच सिम्प्सनच्याही पारंब्यांचा पसारा फार मोठा आहे– फक्त २७ कंपन्या ! बाजूच्या रकान्यावरून त्यांच्या पसाऱ्याची कल्पना येईल. अर्थातच हा सारा पसारा मद्रासच्या सेंबियम् ह्या उपनगरात व ऑफिसेस मौंट रोडवर. ह्या सर्व कंपन्यातील कामगारांची एकच भली दांडगी युनियन. तिला कंपनीची मान्यता. कामगारांचे थोडेफार हित, थोडे मालकाचे हित, तर कधी मालकांस गुरकावणे, कधी कामगारांनाच दटावणे अशा खेळीमेळीच्या वातावरणात ह्या युनियनने गेली वीस वर्षे, मालक-कामगार दोघांमध्ये 'बफर' म्हणून धक्के खाल्ले. सन १९५४ मधील महिनाभराचा एकुलता एक संप वगळता, कालपर्यंत सोळा वर्षात संप होऊ दिला तर नाहीच, पण युनियनने स्वतःच्या वीस लाखाच्या तीन तीन मजली इमारती उठवल्या–यात स्वस्त धान्याची दुकाने, को-ऑप. सोसायटी, कापडचोपड दुकाने चालविली. दोन मोटरगाड्या खरीदल्या अन् लाखांनी शिल्लक बँकेत ठेवली. हे सर्व करताना युनियनने–म्हणजेच पुढारी गुरुमूर्तीने–कोणत्याही राजकीय पक्षाचा विटाळ होऊ दिला नाही, किंबहुना म्हणूनच तो गुरुमूर्ती २५ वर्षांत इतके कार्य करू शकला. आज युनियनचे मासिक उत्पन्न पंधरा हजारांचे वर आहे–सॉरी,

' होते ' असेच म्हणावयास हवे खरे !

त्याचं काय झालं, तामीळनाडूमध्ये काँग्रेसचा पराभव करून द्रमुक पक्ष सत्तेवर आला आणि नूर पालटला. पक्षविरहित युनियन म्हणजे काय ? भलतंच काहीतरी ! काहीतरी करून द्रमुकला ती जबरदस्त युनियन स्वपक्षाखाली हवी होती. त्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. कंपनी म्हणे जिचे सभासद जास्त अशा एकीलाच आमची मान्यता राहील. वीस हजार कामगारांपैकी पंधरा हजार तर गुरुमूर्तींचे वर्षानुवर्षांचे सभासद होते. समजा उरलेले सारे जरी एकत्र केले तरी नव्या कोणत्याही युनियनला बहुमत मिळणार नव्हते. आता आली का पंचाईत ! द्रमुकचा सनदशीर मार्ग संपलेला होता. अर्थातच बेकायदेशीर मार्ग म्हणजे, आहे त्या युनियनला फोडणे—त्यासाठी हाणामाऱ्या अन् ठोकाठोकीही करण्यास त्यांची तयारी होती... अर्थातच एके दिवशी द्रमुक-प्रणित युनियन ' पेरवैसंगम् ' स्थापन झाली—तिचे नेते श्री. काटूर गोपाल.

सन १९६८ मध्ये कंपनीने ३७ दिवसांची टाळेबंदी केलेली होती. त्याबद्दलचा दावा गुरुमूर्तीने हायकोर्टात लावला होता. केस तीन वर्षे चालली. असे म्हणतात की, गेल्या ऑगस्टमध्ये कंपनीच्या विरुद्ध निकाल लागणार होता. टाळेबंदी बेकायदेशीर ठरून, त्या काळातील पगारापोटी चाळीस लाख रुपये कंपनीस भुर्दंड पडणार होता. इतक्यात नवल वर्तले ! ज्याने २५ वर्षे ही युनियन चालविली, दावा लावला, त्या गुरुमूर्तीने एकाएकी राजीनामा दिला. युनियनचाच नव्हे तर आपल्या नोकरीचाही ! त्या रिकाम्या खुर्चीवर, निवडणुका वगैरे न घेता द्रमुक काटूर गोपाल यास बसविण्यात आले. एवढ्यावरच हे थांबले असते तरी पुढचा संप टळला असता. पण...! खुर्चीवर येताच नव्या काटूर गोपाळ महाशयांनी प्रथम कोर्टातील दावा काढून घेतला. नंतर, कामगारांना पत्ताही न लागू न देता कंपनीशी कामगारांच्या वतीने एक विलक्षण करारही करून टाकला.

नव्या कराराने कंपनीचा ४० लाखांचा पगार वाचलाच, पण टाळेबंदीचे बुडालेले काम, कामगारांनी सुटीच्या दिवशी येऊन करायचे होते. म्हणजे ३४ सुट्ट्या बुडणार होत्या. नव्या कराराने अनावश्यक कामगारांस डच्चू देण्यास कंपनीस अधिकार मिळाला होता. रोज अठरा इंजिने व्हावीत ही किमान अपेक्षा होती, पण प्रत्यक्षात सरासरी ३० पडत होती. अर्थातच् वरच्या १२ इंजिनांपोटी कामगारास इन्सेंटिव्ह भत्ता मिळत होता. नव्या कराराने अठरा आकडा, छत्तीस झाला, कंपनीने १९६९ मध्ये एक कोटी, सतरा लाखाचा बोनस वाटला होता म्हणजे तो ३०% पडत होता. बोनस अर्थातच त्या साली असणाऱ्या सर्वांस मिळे. म्हणजेच अधेमधे सोडून गेलेले, मयत झालेले अशा सर्वांसही तो मिळे. नव्या करारान्वये बोनस वाटण्याच्या दिवशी जे प्रत्यक्ष हजर राहतील अशांनाच तो मिळणार होता. केंद्रीय पोलादमंत्री कुमार मंगलम् म्हणाले असला करार पूर्वी

कधीही कामगार-नेत्याने केलेला नसेल. माझी सिम्प्सन कामगारांस पूर्ण सहानुभूती आहे"! झाले, तामीळनाडूच्या मुख्यमंत्र्यांनी लगेच त्याचा समाचार घेतला, तशी कुमारमंगलम् यांनी दुरुस्ती केली "पोलादमंत्री म्हणून नव्हे, तर एक कामगार-नेता म्हणून मला सहानुभूती वाटते"

आपला इतक्या वर्षांचा जुना नेता जातो काय – नवा कुणीतरी विना-निवडणूक खुर्चीवर येतो काय – कसला भयानक करार करतो काय ? पण कामगारांच्या ध्यानात आलेच, की ह्यामागे कंपनी व सत्तारूढ द्रमुक पक्ष ह्या दोघांची हात-मिळवणी आहे. असंतोषाची लाट उसळली. परिणामी गेल्या तीस ऑक्टोबरला सुमारे सतरा हजार कामगार घरी बसले. मागणी एकच 'तो काटूर गोपाळचा करार रद्द करा. नव्या निवडणुका घ्या. त्यात त्याला निवडून येऊ दे' – संप बारा जानेवारीस तात्पुरता मागे घेण्यात आला आहे.

संपकाळात काय काय झाले, त्यापेक्षा काय झाले नाही तेच विचारा. सभा मोर्चे, घेराओ, उपोषणे, दगडफेक, मशिनरीची मोडतोड, एकमेकांच्या नेत्यांना मारहाण, संपकाळात कामावर जाणाऱ्यास चोप देणे, शिष्टमंडळाच्या वाऱ्या ह्या साऱ्या प्रकारांनी हजेरी लावलीच. शिष्टमंडळे केंद्रिय पोलाद मंत्री, मजूरमंत्री, पंतप्रधानास भेटली. त्यासाठी विमानांनी दिल्लीस खेपा घातल्या. राज्यसरकारने अर्थातच आपला प्रतिनिधी दिल्लीस पाठविला नव्हता. करुणानिधींनी अमेरिकेहून परत येताच कामगारांस कामावर जाण्याचे आवाहन केले, तरीही संप चालूच राहिला. पुढे पाक-युद्ध काळातील इमजर्न्सीचे नावाखाली DIR कलमान्वये संप बेकायदा म्हणून सरकारने जाहीर केला – तरीही संप पुढे महिनाभर टिकला.

बारा जानेवारीस संप मागे घेतला तो कसा ? संपवाल्यांचे प्रतिनिधित्व करणारी सहा जणांची एक समिती नेमली जाऊन, कंपनी तिच्याशी विचार विनिमय करणार. मार्च–७२ मध्ये निवडणुका होतील व युनियनचा जनरल सेक्रेटरी निवडला जाईल. तोवर काटूर गोपाळ करार अर्थातच अधांतरी लोंबकळतच राहणार. ह्या निवडणुकीत सत्ताधारी द्रमुक पक्ष जागा लढवणार आणि पुन्हा हाणामाऱ्या व पुन्हा संप हे सांगण्यास ज्योतिषी नको आहे !

आज, कुणाच्या पदरात काय पडले ? कंपनीचे ४० लाख वाचले, पण रोजी २० लाख प्रमाणे, दोन महिने धंदा बसला, हा तोटा भरून येईतोवर पुढे बोनस मिळण्याची आशा संपली, भागधारकांचा डिव्हिडंड बुडाला, संपकाळात सतरा। अठरा हजार कुटुंबांनी दिवळी। ख्रिसमस कसा साजरा केला असेल ते तेच जाणोत ! तो पगार आता ब्रह्मदेवालाही देता येत नाही. हे सारे कशासाठी ? केवळ पक्षीय राजकारणासाठी ! आणि हेही अशा क्षणी, की जेव्हा सारा देश युद्धाच्या खाईत पडणार होता ! उद्याच्या मार्चपर्यन्त तरी संप मागे घेतला आहे. पण निर्णयात्मक उत्तर मिळालेले नाहीये. तेव्हा, जर का पुन्हा संप होऊन टाळे लागले तर खरो-

खरोखरच त्या अल्लाउद्दीनास जादूं-ई-चिराग घेवून यावे लागेल व म्हणावे लागेल 'खुल जा सिम सन! खुलजा सिम्प्सन!!'

## सिम्प्सन वटवृक्ष आणि पारंब्याचा विस्तार

सिम्प्सन समूहात सुमारे २७ कंपन्या आहेत, त्यांपैकी प्रमुख १०ची ही आकडेवारी. पहिला आकडा, सिम्प्सन् कंपनीने त्या कंपनीत केलेली एकूण गुंतवणूक दर्शवतो, तर दुसरा आकडा ३१ मार्च ७० रोजी झालेला नफा दाखवितो.

| | रुपये | रुपये जमा |
|---|---|---|
| ट्रॅक्टर्स अॅण्ड फार्म इक्विपमेंटस लि. | १ कोटी २ लाख | २८,३८,००० |
| इंडिया पिस्टन्स लि. | ६६ लाख | ४६,४९,००० |
| शॅर्डलो इंडिया लि. | ६० ,, | १९,८१,००० |
| एडिसन अॅण्ड कं. लि. | २८ ,, | १८,४०,००० |
| एडिसन पेन्टस् लि. | २५ ,, | १२,७९,६०८ |
| रामविलास सर्व्हिसेस लि. | १८ ,, | ८,१०,००० |
| रिचहोल्ड केमिकल्स लि. | १७ ,, | २,३९,००० |
| सिम्प्सन जनरल फायनान्स लि. | १७ ,, | ५,७०,००० |
| अॅम्को बॅटरीज लि. | १५ ,, | ४३,१७,००० |
| व्हील अॅण्ड रीम्स लि. | १३,७५,००० | ४,२७,००० |

| खुद्द सिम्प्सन अॅण्ड कंपनी लि. चे आजचे भांडवल | | नफा |
|---|---|---|
| | १० कोटींचे वर | १ कोट ८ लाख |

| **नफ्याला एकुलता एक अपवाद :** | सिम्प्सनची गुंतवणूक | **तोटा रुपये** |
|---|---|---|
| जॉर्ज ओकस् लि. | रु. ४८ लाख | ४,३४,००० |

□ □ □

# डाक्क्याची फत्ते छंबच्या रणांगणावर



## कर्नल आ. भा. जाधव

ग्रेट ब्रिटनच्या दर्यासारंग नेलसनने एके ठिकाणी म्हटले आहे, की ' दि बॅटल ऑफ वॉटर्लू वॉज वन ऑन दि ग्राऊंडस् ऑफ ईटन. '

नुकत्याच झालेल्या भारत-पाक युद्धावर एक ओझरता दृष्टिक्षेप टाकला तर मला वाटते, की ही उक्ती थोडयाफार फरकाने छंबच्या रणसंग्रामाला चपखल बसते.

डाक्क्याचा झंझावाती तडकाफडकी विजय भारतीय जवानांनी आपल्या जिवाची बाजी लावून छंबच्या रणमैदानावर मिळवला. तीन ते सोळा डिसेंबरच्या १४ दिवसांच्या – युद्धात छंबच्या लढ्याला जेवढे महत्त्व लाभले तेवढे इतर आघाडयांवर लढल्या गेलेल्या चकमकींना क्वचितच लाभले असेल.

स्वातंत्र्य मिळाल्यापासून गेली दोन तपे राज्यकर्त्यांकडून पूर्व पाकिस्तानला सावत्र मुलाची वागणूक मिळत गेल्यामुळे बांगला देशाच्या स्वतंत्र निशाणाखाली सवता सुभा उभारण्याचा त्याने घाट घातला व त्या रोखाने दमदार पावले उचलली. पाकिस्तानच्या हातातून बांगला देश निसटल्यासारखा दिसू लागल्यावर जनरल याह्याखानने आपली शक्ती पश्चिम पाकिस्तानच्या शेजारचा काश्मीर प्रदेश घेण्याकडे खर्ची घालायचे ठरवले. काश्मीर जर घशात घालता आला तर बांगला देश गेल्याच्या जखमेवर मलमपट्टी होऊ शकली असती व परराष्ट्रांसमोर पाकिस्तानची

गर्दन खाली झुकली नसती. असा सारासार विचार करून या हुकूमशहाने आपले डावपेच सुरू केले.

## लष्करीदृष्टया छंबचे महत्त्व

छंब ठाणे पाकिस्तान आणि भारत यांच्या इंटर नॅशनल बाउंडरी व कश्मीरची सीझफायर लाईन यांच्या जंक्शनजवळ वसले आहे. पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादपासून हे सुमारे २५० कि. मी. दूर आहे. पाकिस्तानची अमेरिकेच्या मदतीने अत्याधुनिक पद्धतीची बांधलेली खारीया नावाची लष्करी छावणी या ठाण्यापासून केवळ ८० कि. मी. वर आहे. तसेच झेलम, गुजरात, लाला मुसा, वझीराबाद वगैरे शहरे ६०, ७० किलोमीटर्सच्या आत बाहेर आहेत. सियालकोट तर ४० कि. मी. वरच आहे. छंबच्या पश्चिमेकडील प्रदेश मैदानी असून मोठ मोठे रस्ते व रेल्वे मार्गांचे जाळे पाकिस्तानच्या या भागात पसरले आहे. या सोईमुळे पाकिस्तान त्याच्या सैन्याची वहातूक जलदगतीने मोठ्या प्रमाणात करू शकतो.

काश्मीर हे भारताच्या प्रचंड ऐसपैस धडावर एखाद्या छोटयाशा डोक्यासारखे टेकले आहे. आणि छंब, अखनूर, जम्मू ही ठाणी अक्षरशः या धड आणि शीर यांच्यामधल्या मानेसारखी आहेत. छंबपासून अखनूर सुमारे ३० कि. मी. आहे. अखनूर जवळून चिनाब नदी प्रचंड वेगाने वहाते. या नदीवर ओव्हर हेड स्ट्रक्चर पद्धतीने बनवलेला भक्कम लोखंडी पूल आहे. भारतातून येणाऱ्या रस्त्याचा एक फाटा जम्मू–अखनूर मार्गे हा पूल पार करून नौशेरा, राजौरी, पूंच, उरी वगैरे भागात जातो व दुसरा फाटा जम्मूतून सरळ उत्तरेकडे उधमपूर, अनंत नाग, अवंतीपूर मार्गे श्रीनगरला जातो. अखनूर आणि जम्मूचे दरम्यान सुमारे २० कि. मी. चे अंतर आहे. तेव्हा छंबपासून जम्मूपर्यंतचे सुमारे ५० कि. मी. चे अंतर कापून वरील दोन्ही रस्ते व चिनाबवरचा पूल हस्तगत केला, की भारताच्या धडापासून काश्मीरचे शीर वेगळे करायला अवधी लागायचा नाही असा याह्याचा कयास होता.

जोरिया ठाणे अखनूरच्या पश्चिमेला अखनूर-छंब रस्त्यावर सुमारे १५ कि. मी. आहे. जोरियाहून छंबला दोन रस्ते जातात. एक इंटरनॅशनल बॉर्डरला समांतर मैदानातून जातो व दुसरा उत्तरेकडे वळून वळसा घेऊन देवा-मंडियालाच्या डोंगराळ भागातून छंबकडे जातो. मुनव्वर-तवी ही छोटी नदी उत्तरेकडून दक्षिणेकडे वहाते व पाकिस्तानात चिनावला मिळते. मंडियाला जवळ या नदीवर एक छोटा लोखंडी पूल आहे. या भागात तवीचा पूर्व किनारा, पश्चिम किनाऱ्यापेक्षा उंचावर असून लष्करी डावपेचांच्या दृष्टीने जास्त सोईचा आहे. जोरीया आणि तवी यांच्या दरम्यान

लोकी खड नावाचा विस्तीर्ण पात्र असलेला एक ओढा उत्तरेकडून दक्षिणेकड वहातो. या ओढ्याचाही पूर्व किनारा पश्चिम किनाऱ्यापेक्षा उंचावर असून जोरीयाची तटबंदी भक्कम करायला याचा उपयोग होतो.

बुरेजाल हे छंबच्या पश्चिमेला सुमारे ३ कि. मी. वर इंटरनॅशनल बॉर्डर व सीझफायर लाईनच्या जंक्शनवर वसले आहे. येथून सीझफायर लाईन दक्षिणोत्तर जाते व बोकन, मोएल, पीर जमाल, रेडहिल, ललियाली, काळी धार वगैरे लष्करी चौक्या या रेषेवर वसल्या आहेत. बुरेजाल ते काळी धार अंतर सुमारे १७ ते २० कि. मी. आहे.

बुरेजाल-छंब-अखनूरच्या दक्षिणेला आणि जम्मूच्या पश्चिमेला आत घुसलेला पाकिस्तानचा भूभाग ' मुर्गीच्या गर्दन 'सारखा दिसतो. तो ' चिकन्स नेक ' म्हणून ओळखला जातो. सियाकलकोट या मुर्गीच्या मानेच्या धडात आहे.

भौगोलिकदृष्ट्या छंब व पश्चिमेकडील प्रदेश शत्रूच्या डावपेचाला जसा अनुकूल आहे तसाच आपल्या सैन्याला तो अडचणीत टाकणारा आहे.

जम्मूहून छंबला किंवा छंबच्या उत्तरेला सीझफायर लाईनवर आपल्या चौक्या टेकड्या व डोंगरात वसलेल्या असल्यामुळे फौजेला शस्त्रे, दारुगोळा व अन्नपुरवठा चिंचोळ्या मार्गाने करावा लागतो. मोठ्या प्रमाणात जलद हालचाली करता येत नाहीत. रणगाड्यांना मोकाट फिरायला मैदाने नाहीत. त्यामुळे शत्रू मोठ्या ताकदीने आमच्या सरहद्दीवर जितक्या जलदीने तुटून पडू शकतो त्या प्रमाणात आपण त्याच्यावर आक्रमण करू शकत नाही. तसेच बुरेजाल ते ललियाली पर्यंतची सीझफायर लाईन लष्करी डावपेचाच्या व बचावाच्या दृष्टीने निकृष्ट दर्जाची आहे. आक्रमण करणाऱ्या शत्रूला थोपवून त्याच्याशी मुकाबला करून जेरीला आणण्याच्या दृष्टीने मुनव्वर-तवीचा पूर्व किनारा किंवा जोरियाच्या जवळ लोकी खडचा पूर्व किनारा किंवा अखनूरच्या पश्चिमेकडील टेकड्या जास्त सोयीच्या आहेत.

## लढाईची नांदी

शुक्रवार दिनांक ३ डिसेंबर १९७१ रोजी संध्याकाळी ५ वाजून ३५ मिनिटांनी पाकच्या लढाऊ विमानाने भारताच्या एका शहरावर सलामीचा पहिला बाँब टाकला व अर्ध्या पाऊण तासाच्या आत निरनिराळ्या एकूण बारा शहरागावांवर बाँबवृष्टी केली.

त्याच दिवशी संध्याकाळी ६ वाजता बुरेजालपासून ललियाली पर्यंतच्या प्रदेशावर शत्रूचा तोफखाना आग ओकू लागला.

## पहिला हल्ला :

तोफखान्यांच्या गोळ्यांचा पाऊस पाडून देवा व मंडीयाला टेकड्यांवर दोन पायदळ ब्रिगेडस आणि एक टँक रेजिमेंटच्या साह्याने पाक सेनेने रात्री आठ वाजता जोराचा हल्ला चढविला. शत्रूच्या जवानांच्या लाटांवर लाटा एका पाठोपाठ येऊन भारतीय सेनेच्या चौक्यांवर धडका मारू लागल्या. मोक्याच्या जागा पकडून रण-गाड्यांनी तोफांचा मारा चालू केला. मशीनगन्स, ब्रेनगन्स, रायफलींच्या फैरी झडू लागल्या. ग्रिनेडस उडू लागली. रात्रीच्या अंधारात तुंबळ युद्ध झाले. भारतीय जवानांनी शत्रूला थोपवून धरले. त्यांचे सहा रणगाडे बरबाद केले. सीझफायर लाईनवर शत्रूच्या जवानांचा खच पडला. दुसऱ्या दिवशी ४ तारखेला शत्रू आपल्या जखमा चाटू लागला. थोडी माघार घेऊन उसासे टाकू लागला.

## दुसरा हल्ला :

पहिल्याच हल्ल्यात अनपेक्षित दणका बसल्यामुळे शत्रू चिडला. हल्ला सुरू केल्यापासून सहा तासात सीझफायर लाईनवरच्या भारतीय चौक्या हस्तगत करून ३६ तासांत अखनूर काबीज करायच्या त्याच्या स्वप्नाला भारतीय सेनेने थप्पड मारली.

पहिल्या दोन ब्रिगेडस्च्या मदतीला ताज्या दमाची एक ब्रिगेड व चिनी बना-वटीच्या टी ५९ रणगाड्यांची रेजिमेंट दिमतीला देऊन त्या भागात अस्तित्वात असलेल्या साऱ्या तोफखान्याच्या मदतीने रविवार दिनांक ५ डिसेंबरच्या रात्री देवा, मंडीयाला आणि छंबवर पाक फौजेने निकराचा हल्ला केला. शत्रूची एक डिव्हिजन, दोन टँक रेजिमेंटस् व तोफखानाच्या सहा रेजिमेंटस् अशी सुमारे २५००० फौज या १००० मीटरच्या तुकड्यावर तुटून पडली. तुंबळ युद्ध झाले. शत्रूचे २३ रणगाडे तोडले गेले. शेकडो जवान मारले गेले. या निकराच्या लढाई-नंतर शत्रूला चकवून चौक्यांवर दबाव धरून बसलेल्या भारतीय सेनेने माघार घेतली व तवीच्या पूर्व भागावर बचाव फळी उघडली. ६ डिसेंबरला सीझफायर लाईनवरची बुरेजाल ते रेडहिल पिकेटस व छंब, देवा मंडीयाला प्रदेश शत्रूने हस्तगत केला.

खारीया, झेलम, गुजरातच्या दिशेने छंबच्या वायव्येला २७, २८ नोव्हेंबर-पासून रोज रात्री ट्रॅकड व व्हील्ड वाहनांचे प्रचंड आवाज यायचे. ललियाली पिकेट-वरून दुर्बिणीतून पहाणारे भारतीय सेनेचे जवान अधूनमधून मंद प्रकाशाचे पिवळे, लाल दिवे फिरताना पाहू शकत होते. पहाटेच्या अंधूक प्रकाशात अस्मानात उठलेला

धुळीचा पडदा हळूहळू धरतीवर स्थिरावलेलाही ते पाहू शकत होते. १ डिसेंबर पर्यंत हे आवाज व धूळ बरीच जवळ आल्यासारखी दिसत होती. शत्रू या आघाडी-वर मोठ्या ताकदीने एक ना एक दिवस मुसंडी मारणार याचा अंदाज भारतीय सेनानींनी बांधला. शत्रू किती संख्येने येत आहे, त्याची किती ताकद आहे, केव्हा व कोठे धडक मारतो याचा अदमास आपले सेनानी घेत होते. त्याला किती आत घुसू द्यायचा व कोठे पकडून ठोकायचा याचे आराखडे मांडत होते. गेले दोन महिने लुटुपुटुच्या लढाया खेळून या भागातील आमच्या सेनेने आपले डावपेच रचले होते.

बुरेजाल ते काळी धार या चौक्या, व छंब, देवा मंडीयाला आणि जोरिया या भागात आपली एक पायदळ ब्रिगेड, एका टँक रेजिमेंट व तोफखाना रेजिमेंटसह ठाण मांडून बसली होती.

सीझफायर लाईन वरच्या चौक्या आणि तवीच्या पश्चिमेकडची छंब, देवा व मंडीयाला ही ठाणी तात्पुरती लढवायची, शत्रूची ताकद काय आहे, संख्या किती आहे, त्याचे रणगाडे कुणीकडून येत आहेत, तोफखान्याची ताकद किती आहे, याचा चौक्यांवरील पथकांनी अंदाज घ्यायचा, शत्रूला प्रतिकार करून त्याच्या पुढे येण्याचा वेग कमी करायचा, त्याला जमिनीवर पसरायला लावून आपल्या ताकदीचा खोटा अंदाज देऊन सुरुवातीलाच त्याची ताकद जास्तीत जास्त खर्ची टाकायला लावायची व जास्तीत जास्त वेळ त्याला या प्रदेशात घोळवत ठेवायचा ही कामे आमच्या आघाडीच्या बहादूर जवानांनी उत्कृष्टपणे पार पाडली. शत्रूची ३५००० वर फौज त्यांनी ७२ तास या भागात गुंतवून ठेवली त्यांचे २९ रणगाडे बरबाद केले. १००० वर सैनिकांना कंठस्नान घातले. आणि शत्रूला आमची पक्की बचाव फळी कोठे आहे याचा मागमूसही लागू न देता ६ तारखेला पहाटे आघाडीचे जवान तवी पार करून बचाव फळीत सामील झाले. या कामी आपला तोफखाना आणि रणगाडे यांनी पीछेहाट करणाऱ्या जवानांना अत्यंत उत्कृष्ट साथ दिली. आपला एकही जवान वा रणगाडा शत्रूच्या हाती लागला नाही.

याच वेळेला ५ डिसेंबरला या भागातील कोअर कमांडर लेफ्टनंट जनरल सरताजसिंग यांनी जम्मूच्या दक्षिणेकडून एक जबरदस्त पायदळ आणि चिलखती दल ' चिकन्स नेक ' मध्ये ७० किलो मीटर आत घुसविले. या पथकाने पाकिस्तानी मुर्गीची गर्दन चांगलीच मुरगाळली.

## तवी पूर्व किनारा : बचाव फळी

नदीचा अडथळा समोर ठेवून आपल्या सेनेच्या पथकाने छंब आणि मंडीयाला या दोन्ही अॅक्सेसेस्‌वर (रस्त्यांवर) व या परिसरातील महत्त्वाच्या मोक्याच्या

जागांवर पक्के मोर्चे, बंकर खोदून, संगड बांधून डिफेन्स लावला. ठिकठिकाणी अँटी पर्सनल व अँटी टँक माईन्स पेरल्या. रणगाडयांच्या छोटया छोटया टोळया बनवून लपवून ठेवल्या. मशीनगन्स, रॉकेटस् व इतर स्वयंचलित हत्यारांनी शत्रूच्या वाटा रोखल्या. मंडीयालाच्या पुलावर कडक बंदोबस्त ठेवला. उखळी तोफा, पहाडी तोफा, फील्ड आणि मीडीयम गन्सनी शत्रुप्रदेशातील टारगेटस् टिपायची तयारी ठेवली. जेथे हालचाल दिसे तिथे ठोकायला सुरुवात केली. अशा तयारीने शत्रू पुढचे पाऊल कुठे व केव्हा उचलतो याची आपली सेना वाट पाहू लागली.


## पुढील दोन हल्ले :

ताज्या दमाच्या चार पायदळ पलटणी १००० मीटर रुंद असलेल्या आघाडीवर हल्ल्यात पाठवून त्यांच्या मदतीला दुसरी, तिसरी व चौथी लाट अशा बारा पलटणी शिलकीत ठेवून एक पुरी टँक ब्रिगेड आणि संबंध कोअरचा तोफखाना दिमतीला घेऊन सात डिसेंबरच्या रात्री 'अल्ला हो अकबर' च्या गर्जना करत पाक सेना तवीत उतरली. तवीच्या अर्ध्या पात्रात येताच पूर्व किनाऱ्यावर दबा धरून बसलेल्या सेनेने आपली हत्यारे चालवायला सुरुवात केली. तोफखाना आग ओकू लागला. वैजयंता टँक्स वाघिणीसारख्या तुटून पडल्या. टी ५४ टँक्सनी शत्रूच्या टँक्स टिपायला सुरुवात केली. मशीन गन्स, स्टेन गन्स ब्रेन गन्सनी जोराचा मारा केला. रात्रभर चाललेला संग्राम पहाटेपर्यंत चालू होता. तवीचा पूर्व किनारा गाठण्यापूर्वीच शत्रूला परतावे लागले. शत्रूने १३ रणगाडे गमावले. तवीच्या पात्रात शत्रूचे तीनशेच्यावर सैनिक मारले गेले. काश्मीरच्या पहाडातून वितळलेल्या बर्फाचे शुभ्र धवल पाणी वहात असलेली तवी लाल दिसू लागली. पश्चिम किनाऱ्यावर बसून शत्रू पुन्हा आपल्या जखमा चाटू लागला. जनरल टिक्काखान जातीने हा रणसंग्राम लढवत होता. त्याच्या दिमतीला याह्याखानने तो मागेल ती मदत द्यायचे कबूल केले. टिक्का चिडला. त्याने नवी कुमक आणली. जवानांना जोष यावा, त्यांनी निकराने लढावे म्हणून सैनिकांना उद्देशून तो म्हणाला--

" अपने प्यारे वतनके सदरे रियासत जनरल याह्याखान पीछले जंगमे छंब फ्रंट पर कमांड करते थे। और उन्होने छत्तीस घंटेमे जोरियापर कबजा किया था। आज पाच दिन हुवे। तुम लोक तवीभी पार नही कर सकते। बडी शर्म की बात है। "

## चढाई व पीछेहाट

दोन दिवस तयारी करून नव्या दमाच्या चार पलटणी आघाडीवर घेऊन पाकिस्तानने पुन्या डिव्हीजननिशी व टँक ब्रिगेडसह ९ डिसेंबरला रात्री तवीच्या



छंब आघाडी
संदर्भ
पक्का रस्ता
कच्चा रस्ता
नदी-नाले
इंटर नॅशनल बाउंडरी
सीझफायर लाईन
टेकडी डोंगर
N
W
E
S
पाकव्याप्त काश्मीर
पाकीस्तान
कालीधार
देवा
पीर जमाल
मंडीयाला
मोएल
छंब
बुरेजाल
जौरीया
अखनूर
चिनाब
मुनव्वर तवी
जम्मू तवी
जम्मू
खारियां छावणी
झेलम
गुजरात
वझिराबाद
सियालकोट
भारत
पाकीस्तान
लाहोर
अमृतसर

पूर्व किनाऱ्यावर जोराची धडक मारून भारतीय सेनेच्या बचाव फळीला २०० मीटर रुंदीचे व १०० मीटर खोलीचे खिंडार पाडले. तिथे त्यांनी ब्रिज हेड बनवले व ताबडतोब जवानांची व टँकची कुमक आणायला सुरुवात केली. १० तारखेच्या रात्री जादा कुमक आणून हे भगदाड मोठे करून जोरियाच्या दिशेने झेप घेण्याचा शत्रूचा मानस दिसला.

आपल्या सेनेचे कोअर कमांडर लेफ्टनंट जनरल सरताजसिंग यांनी ताबडतोब ताज्या दमाची एक पायदळ ब्रिगेड व टँक रेजिमेंट पाठवून १० तारखेच्या रात्री तवीच्या पूर्व किनाऱ्यावर असलेल्या शत्रूवर जोराचा हल्ला चढवून त्याला मागे रेटला. पश्चिम किनाऱ्यावरून पुढे येणाऱ्या पाक सेनेची व भारतीय जवानांची तवीत गाठ पडली. रायफली, ब्रेन गन्स, स्टेन गन्स, मशीन गन्स, टँकच्या तोफा, तोफखाना, ग्रिनेडस वगैरे प्रकारची सारी हत्यारे उपयोगात आणली गेली. दोन्ही फौजा एकमेकीला इतक्या भिडल्या, की संगिनीचे आणि रायफलच्या दस्त्यांचे वारच काय पण शेवटी गुद्दागुद्दीवरही प्रकरण गेले. दोन्ही बाजूचे अक्षरशः हजारो जवान मारले गेले. तवीत वीरगती पावलेल्या जवानांचा खच पडला.

दोन्ही बाजूंचे रणगाडे पुढे येऊन एकमेकांवर तुटून पडले. बरबाद झालेल्या, जळलेल्या रणगाड्यांचा खच पडला.

११ तारखेला पहाटेपर्यंत शत्रूचा एकही जवान तवीच्या पूर्व किनाऱ्यावर उरला नाही. राहिले ते फक्त त्यांचे मृत जवान, त्यांची हत्यारे आणि जळलेले व निकामी झालेले ६० वर रणगाडे.

११ तारखेला दिवसभर भारतीय फौजेने आपली मोर्चे बंदी पक्की करून १२ तारखेला तवीच्या पश्चिम किनाऱ्यावरील नो मॅन्स लँडवर (निर्मनुष्य प्रदेश) पाळत ठेवली.

१० तारखेच्या लढाईत भारतीय सेनेने पाक सेनेचे कंबरडेच मोडले. त्याचे हात-पाय लुळे पडले. या रणांगणावर एका आठवड्यात पाकिस्तानने ३००० वर जवान गमावले. ९० च्यावर रणगाडे घालवले. यानंतर पुन्हा तवी पार करायचे धाडस टिक्काखानच्या जवानांनी केले नाही.

## सेनानींचे डावपेच

१९६५ साली पाकिस्तानने भारतावर १ सप्टेंबरला हल्ला चढवला व सलामीच्या संग्रामाला छंबचे रणमैदान पसंत केले.

१९७१ साली पाकिस्तानने भारतावर भूदल सेनेचा पहिला हल्ला ३ डिसेंबरला चढवला व जनरल टिक्काखानने बंदुकीचा पहिला बार छंबच्या समरांगणावरच उडवला.

३ डिसेंबर ते १२ डिसेंबर या दहा दिवसात त्याने भारतीय सेनेवर चार प्रचंड हल्ले चढवले. त्यात नाविन्य नव्हते. बदल नव्हता. भारतीय फौजेच्या पोलादी भिंतीवर नुसते डोके आपटून घेतले. ते रक्त बंबाळ होऊन छिन्नविछिन्न झाले.

पाक फौजेने आपली प्रचंड फौज या लढ्यात गुंतवली. या प्रदेशात एकावेळी मोठ्या प्रमाणात पायदळ फौज भाग घेऊ शकत नाही. म्हणून प्रत्येक वेळी ४ पलटणीच उपयोगात आणल्या जात होत्या. या रणांगणावर दीड डिव्हिजन वापरली गेली. या व्यतिरिक्त एक पायदळ डिव्हिजन व एक चिलखती डिव्हिजन (नं. सिक्स्थ आर्मर्ड डिव्हिजन) या गुजरात, झेलम, खेरिया भागात अडकून पडल्या. ही फौज इतरत्र वापरता आली नाही. त्याने आपले रणगाडेही युक्तीने वापरले नाहीत. पायदळ फौज व रणगाड्यांचे सहकार्य या लढाईत दिसून आले नाही. याचा फायदा आपल्या चिलखती दलाने उठवून त्यांना वेगवेगळे गाठून चोपले.

पाकच्या चिनी बनावटीच्या 'टी ५९' टँक्सचा या लढाईत भारतीय वैजयंता टँक्सनी अक्षरशः धुव्वा उडविला. मध्यम वजनाच्या या दोन्ही टँक्समध्ये भारतीय बनावटीचे वैजयंता ताकदीने व बनावटीत चिनी बनावटीच्या टँकपेक्षा वरचढ आहे. टी ५९ ची तोफ १०० मि. मि. कॅलिबरची असून तिचा पल्ला १००० मीटर आहे. वैजयंताची तोफ १०५ मि. मि. कॅलिबरची असून तिचा पल्ला १८०० मीटर आहे

वेस्टर्न कमांडचे जनरल ऑफिसर कमांडर इन चीफ लेफ्टनंट जनरल कँडेथ यांनी या आघाडीवरचा डिफेंस कौशल्याने लावला होता. १९६५ साली झालेल्या चुका आपल्या सेनानींनी पुन्हा केल्या नाहीत ! त्यात योजकता दाखवली. पक्का डिफेंस लावायला योग्य जागांची निवड केली. मुनव्वर-तवीच्या पूर्व किनाऱ्यावर पक्की मोर्चेबंदी करून सीझ फायर लाईनवर शत्रूला किरकोळ अडथळा केला. त्याच्या येण्याची खबर व बित्तंबातमी आपल्या दबा धरून बसलेल्या सेनेला पुरी आली. कबड्डीच्या खेळात ज्याप्रमाणे प्रतिस्पर्ध्याला आत घेऊन दोन्ही बाजूंनी झडप घालून आवळतात तसे टिक्काखानच्या फौजेला आत येऊ देऊन तवीत जलसमाधी दिली. जिथे रसद, कुमक कमी पडली तेथे बेगमी केली. चिकन्स नेक व शक्करगड भागात फौज घुसवून शत्रूच्या फौजा अडकवून ठेवल्या. तोफखाना, रणगाडे व पायदळ फौज यांची योग्य सांगड घालून उत्कृष्ट सहकार्य घेऊन शत्रूला जेरीला आणले.

कोअर कमांडर लेफ्टनंट जनरल सरतार्जसिंग यांनी सतत जागरूक राहून आलेल्या प्रत्येक बाक्या प्रसंगावर मात केली. फौजेचे अमाप नुकसान झाले असताही त्यांच्या जोशेल्या नेतृत्वामुळे डिव्हिजन, ब्रिगेड, बटालियन, कंपनी व प्लटून कमांडरांनी उत्तम प्रकारचे नेतृत्व केले. जवानांनी अतुल धैर्य दाखविले. या लढाईत मराठे, कुमानी, आसामी, गुरखा, डोग्रा, जाट वगैरे पलटणींनी भाग घेतला होता. त्यांनी चोख कामगिरी बजावली.

## डाक्याची फत्ते छंबच्या रणांगणावर

अमेरिकन 'टाईम' सप्ताहिकाच्या ६ डिसें. ७१च्या अंकात पाकिस्तानी सेनेची एकूण संख्या ३ लक्ष ९२ हजार दाखवली आहे. त्यापैकी प्रत्यक्ष या लढयात व राखीव मिळून पाकिस्तानने दोन इन्फंट्री डिव्हिजन, एक आर्मर्ड डिव्हिजन, एक टँक ब्रिगेड, बारा आर्टिलरी रेजिमेंटस, सहा इंजिनियर बटालियन्स व इतर अनेक अॅड-मिनिस्ट्रेटिव्ह युनिटस् मिळून जवळजवळ पाऊण लाख फौज छंब आघाडीसाठी अडकवून ठेवली. १० डिसेंबरला स्वतः याह्याखान व ११ डिसेंबरला जनरल कँडेथ आपआपल्या आघाडयांना भेटी देऊन गेले. यावरून या रणमैदानाला दोन्ही सेनांनी विशेष प्राधान्य दिल्याचे दिसून येते.

या लढयात पाकिस्तानने आपली बरीच हवाई ताकदही वापरण्याचा प्रयत्न केला. पाक एअरफोर्सने मिराज, मिग १९ व एट एफ ८६ बनावटीची विमाने वापरली. पण आपल्या नॅट, हंटर, कॅनबेरा व मिग विमानांनी त्यांचा धुव्वा उडवला. ८ डिसेंबर नतर त्यांने एकही विमान आकाशात उडू दिले नाही.

छंबचे युद्ध १२ तारखेला संपले. दुष्मनाचे अमाप नुकसान झाले. तवीच्या पूर्व किनाऱ्यावर तो पाय रोवू शकला नाही. अखनूर, चिनाब पूल, जम्मू वगैरे सर करण्याचे त्याचे स्वप्न तवीत बुडाले. त्याच्या मोठया सैन्याची, अनेक रणगाडयांची नि तोफांची येथे कबर बांधली गेली. त्याच्या फौजेचा कणाच येथे मोडला गेला. चारी बाजूंनी नाकेबंदी झालेल्या डाक्याला त्याचे हातच पोचू शकल नाहीत. ते लुळे पडले. त्यांच्यात त्राण उरला नाही. जनरल नियाझींचे एक लाख बेशरम सैनिक मान लपवून डाक्याच्या आसपास बंकर, मोर्चातून नुसते बसून राहिले. भारतीय जवान दिसताच त्यांनी हात वर केले. हत्यारे खाली ठेवली.

भारतीय जवानांच्या बंदुकीतून एक गोळीही न सुटता डाक्यातील पाकिस्तानी फौजेने दोन लाख हात वर केले याचे उत्तर छंबच्या सात दिवस लढलेल्या रण-संग्रामात मिळते. साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेणाऱ्या या समरात लढणारे जवान भाग्यशाली होत. त्यांनी केवळ इतिहासच नव्हे तर बांगला देशच्या रूपाने भूगोलही घडविला. त्यांची नावे इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली जातील. या जवानांना मानाचा मुजरा.



# जंजिरा संस्थानचा मुक्ति-लढा



भारत वर्षाच्या इतिहासात मराठ्यांनी इतिहासाची सोनेरी पाने आपल्या पुरुषार्थाने लिहिली. छत्रपतो शिवाजी महाराजांनी तीन तालुक्यांचे राज्य हिंदुपदपादशाहीत परिवर्तित केले. पेशवे, शिंदे, होळकर यांनी स्वराज्याचे जरिपटके अटकेपार नेले. परंतु जंजिरा संस्थानच्या रूपाने महाराष्ट्राच्या काखेत एक काळपुळी होती. तिने या पराक्रमी पुरुषांनाही दाद दिली नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी १६४८, १६६०, १६६१, १६७७ पर्यंत जंजिऱ्याच्या सिद्दीवर स्वाऱ्या केल्या. जंजिऱ्याच्या सिद्दीला त्यांनी जेरबंद केले. परंतु अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर मोंगलांची दर्यारक्षक बनलेली ही शक्ती नष्ट झाली नाही. सिंहाच्या छाव्याने, पराक्रमी संभाजी महाराजांनी जंजिऱ्याच्या सिद्दीला जवळजवळ संपवीत आणले. परंतु दुर्दैव पाचवीलाच पुजलेल्या आणि बारा वाटांनी सुलतानी संकटे कोसळणाऱ्या संभाजी महाराजांना ही मोहीम सोडावी लागली. कान्होजी आंग्र्यांनी मोगलांच्या या पाणघोड्याला कैचीत पकडीत आणले होते. परंतु पेशव्यांना भाऊबंदकी आठवली. त्यांनी सिद्दीची मदत घेऊन तुळोजी आंग्रेचा पराभव केला. इ. स. १८१८ पर्यंत युनियन जॅक हिंदुस्थानच्या सर्व प्रदेशावर फडकवला. इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामानंतर मुलुख राणीचा झाला. परंतु या जंजिरा संस्थानवर इंग्रजांना १८७० सालापर्यंत युनियन जॅक फडकविता आला नाही. १९४७ ला हिंदुस्थान स्वतंत्र झाला. हैद्राबाद खेरीज सर्व संस्थाने विलीन झाली. परंतु जंजिरा संस्थानचा नबाब सामिलीकरणाच्या करारावर सही करावयास तयार होईना. पाकिस्तानात जाण्याचे डोहाळे त्यास लागले. अखेरीस १९४२ च्या चळवळीतील क्रांतिकारक नेते नानासाहेब पुरोहित यांनी मुक्ति-सेना उभारून रक्ताचा एकही थेंब न सांडता जंजिऱ्याच्या किल्ल्यावर स्वतंत्र भारताचा झेंडा फडकविला आणि भारतीयांचे शतकानुशतकांचे हे स्वप्न साकारले.

आणि जंजिऱ्यावर स्वतंत्र भारताचा तिरंगा फडकू लागला.—एकाही मुसलमानाचे रक्त न सांडता, मुसलमान स्त्रियांची प्रतिष्ठा कायम ठेवून—शतकानुशतके सिद्दीच्या जुलमी राजवटीत वाकलेला नागरिक स्वातंत्र्याचा अनुभव घेऊ लागला. त्या प्रदीर्घ लढ्याचे स्मरण—

**प्रा. पुरुषोत्तम शेठ**

१९६१ सालच्या रीडर्स डायजेस्ट या इंग्रजी मासिकाने प्रसिद्ध केलेल्या अ‍ॅटलासमध्ये जंजिरा भारतापासून विभक्त आहे—इस्लाम धर्मीयही आहे असे दाखविले आहे. जंजिरा संस्थानच्या इतिहासाची ही पार्श्वभूमी पाहिल्यावर जिज्ञासा निर्माण होईल, की हे जंजिरा संस्थान आहे तरी कसे ? जंझिराह या अरबी शब्दावरून जंजिरा हे नाव पडले. जंजिरा म्हणजे 'बेट' असा मराठीत अर्थ आहे. जंजिरा संस्थानला पूर्वीपासून 'हबसाण' म्हणतात. 'हबसाण' हा शब्द जंजिऱ्याच्या नबाबाचे बाहेरून येणे सिद्ध करतो. जंजिऱ्याचे नबाब आफ्रिकेतील अ‍ॅबेसिनियातून आले होते. 'अ‍ॅबेसिनियन' या शब्दाचे अपभ्रष्ट रूप 'हबसाण' असे पडले जंजिऱ्याचे नबाब हे सुन्नी मुसलमान होते. मुरुड, श्रीवर्धन, म्हसळा व गुजराथेतील 'जाफराबाद' हे चार तालुके सिद्दीच्या राज्यात येत. ३७७ चौ. मैल क्षेत्रफळाचे व ३२८ गावांचे हे राज्य होते. १९४१ च्या खानेसुमारीनुसार या राज्याची लोकसंख्या १३५५५७ होती. हे जंजिरा संस्थान आपल्या भौगोलिक परिस्थितीमुळेच अजेय राहू शकले. जंजिरा संस्थानच्या पश्चिमेला अरबी समुद्र, दक्षिणेला सावित्रीची खाडी, पूर्वेला काळ नदी व गोरेगावची खाडी, उत्तरेला कुंडलिनी नदी व साळावची खाडी, सह्याद्रीच्या घनदाट जंगलांनी भरलेल्या, आतवर घुसलेल्या डोंगर-दऱ्या यांमुळे जवळजवळ महाराष्ट्राच्या भागापासून हे संस्थान अलिप्तच राहिले. या आलिप्ततेचा फायदा जंजिऱ्याच्या सिद्दीने मोठ्या प्रमाणात उठविला. ब्राह्मण, कायस्थ आणि मुसलमान खोत यांच्या मदतीने तो आपला राज्यकारभार हाकलत होता.

१९३४ ला सिद्दीच्या या राज्याला पहिला स्वातंत्र्याचा धक्का दिला गेला. जंजिरा संस्थानातील श्रीवर्धन हे ९००० वस्तीचे मोठे गाव, हिंदू $\frac{3}{4}$, मुसलमान $\frac{1}{4}$ होते. परंतु नबाबाच्या पाठिंब्यामुळे हिंदूंना धार्मिक सण साजरे करण्याचीही जवळ जवळ मनाई होती. गणपतीसुद्धा झाकून न्यावा लागत असे. कारण मूर्तिद्वेशकांना

मूर्तीचे दर्शन होता कामा नये. याकरिता ही खबरदारी घेतली जाई. या श्रीवर्धन गावी १९३४ साली साली होळीचा सण होता. श्रीवर्धनच्या सोमजाईच्या देवळातील पुढच्या अंगणात लाकडे वाजत गाजत आणून हा सण साजरा करीत. मुसलमान मोहोल्ल्याचा थोडासा भाग मिरवणुकीच्या मार्गावर येत असे. मूर्तिभंजकानी आपण सिद्दीचे बापच आहोत असे समजून मिरवणुकीच्या रस्त्यावर तारेची कुंपणे घातली. गुलामांचे जिणे जगणाऱ्या हिंदूंमधील अस्मिता जागृत झाली. त्यांनी तारेची कुंपणे तोडली. परिणामत: हिंदू पुढाऱ्यांना जंजिऱ्याच्या किल्ल्याची अंधारकोठडी पहावी लागली. समुद्राचे राजे असलेल्या कोळी जमातीला हा अन्याय सहन झाला नाही. त्यांनी विघ्नसंतोषी लोकांना त्यांची घरे जाळून धडा शिकवला व आपल्या धार्मिक भावनांची जपणूक करण्याचा इतरांप्रमाणे आपणांस देखील अधिकार आहे हे कोळी समाजाने बाणेदारपणे दाखवून दिले. या प्रसंगामुळे सवाद्य मिरवणुकीस परवानगी मिळाली. या घटनेने धार्मिक स्वातंत्र्याचाच नव्हे तर दास्यमुक्तीचा पहिला नांदीपाठ जंजिरा संस्थानात सुरू झाला.

जंजिरा संस्थानच्या स्वातंत्र्यलढ्यात दुसरे पाऊल डॉ. आंबेडकरांनी टाकले. ठाणे जिल्ह्यातील वारल्यांच्या रूपाने माणूस जागा झाल्याचे आपण कौतुक करतो. परंतु जवळ जवळ त्याच्या आधी १५ वर्षे आंबेडकरांनी भूहीनांचा मुक्तिलढा जंजिऱ्याच्या भूमीवर खेळून अंशत: विजय मिळवला होता. डॉ. आंबेडकरांच्या कर्तृत्वाचे हे पान अजून अज्ञातच राहिले आहे.

१९३४ सालच्या दरम्यान म्हसळा गावाजवळही चिकलप गावी नबाव सय्यद अहमद याचा चुलत भाऊ राहात असे. गादीवरील वारसा न मिळाल्याने याने वड्यावरचे तेल वांग्यावर काढून हिंदू रयतेस छळण्यास सुरुवात केली होती. सर्व मुसलमान इनामदारही त्याला साथ देत होते. वर्षाला १ महिना मुसलमान खोताकडे महारला वेठबिगार करावा लागे.

एक कोंबडी खोताला द्यावी लागत असे. तसेच पावसाळ्यात भातशेतीच्या हंगामात मुसलमान खोताकडे मोफत नांगर चालवावा लागे. इतकेच नव्हे तर भाजीपाला, अन्न या सर्वांवरच मुसलमान खोताचा अधिकार असे. वर्षाला ७ रु. कर प्रत्येक घरटी मुसलमान खोताला व नबाबाला द्यावा लागे. महार जमात वर्षांनुवर्षे हा अन्याय सहन करीत आली होती. कायस्थ व ब्राह्मण खोतही तोंडात मिठाची गुळणी घेऊन या अन्यायाला मूकसंमती देत होते. १९३५ साली एका महाराची वेठ चुकली आणि मुसलमान खोताने महाराला चाबकाने फोडून काढले. त्यात तो महार मारला गेला. याप्रसंगी भोपी शिंदे याने दु:खाचा नुसता उद्गार काढताच नबाबाच्या त्या भावाने त्याला गोळी घातली. असे असंख्य महार मुसलमानांच्या नरमेधाचे बळी झाले होते.

डॉ. आंबेडकरांच्या कानांवर जुलुमाच्या कहाण्या जाऊन पोचल्या. बुद्धाची

करुणा आणि शंकराच्या तिसऱ्या डोळ्याची आग सामावून घेतलेल्या डॉ. आंबेडकरांना माणुसकीचा हा पडलेला मुडदा बघवेना. त्यांनी आपले सहकारी सु. गो. टिपणीस, भाई चित्रे, चंद्रकांत अधिकारी या तरुणांच्या मदतीने यात लक्ष घालावयास सुरुवात केली. ब्रिटिश हद्दीत सभा होऊ लागल्या. परंतु जंजिऱ्यातील महारवाडे जळू लागले. उभे पीक कापले जाऊ लागले. बायकांचे शील रस्त्यावर उघडे पडले. परंतु महार जमात या पाशवी अत्याचारांपुढे नमली नाही. जंजिऱ्याची हद्द ओलांडून ब्रिटीश हद्दीत ते राहू लागले. डॉ. आंबेडकर यांनी एकाही दाव्याच्या रूपाने, मुसलमान, अत्याचारी खोतांना खंड द्यावयाचा नाही. असा निर्धार प्रकट केला. याप्रमाणे मुसलमान व ज्यांच्यावर अन्याय होत होता असे हिंदू यांच्यात असंख्य चकमकी झडू लागल्या.

डॉ. आंबेडकरांच्या लोकमान्य व राजमान्य नेतृत्वामुळे अखेरीस सिद्दी नबाबाला तडजोडीला बसावे लागले. सात रुपयांचा कर तीन रुपयांवर आला. तीस दिवसांची वेठ बारा दिवसांची झाली. डॉ. आंबेडकरांना या दास्यमुक्तीच्या लढ्यात अंशतः यश मिळाले. हा संघर्ष हिंदूमुसलमानांचा नसून भूमिहीन व भू-स्वामी यांच्यात होता. हा लढा जातीय नव्हता तर दास्यमुक्तीची एक धडपड होती. शोषक आणि शोषितांमधील पहिली सलामी या संस्थानी हद्दीत सुरू होऊन माणूस जागा झाला होता. आणि महार जमातीचा जोहार मायबाप संपला होता.

विष्णुपंत पेंडसे आणि भास्करराव दिघे यांनी प्रजापरिषदेची स्थापना करून जनतेला प्रथम या पोलादी पडद्यात उच्चार स्वातंत्र्य मिळवून दिले. नानासाहेब कुंटे आणि नानासाहेब कुलकर्णी यांनी जंगल सत्याग्रह करून मुक्तिपर्वाचे तिसरे पाऊल उचलले. जंगल सत्याग्रहात हिंदूंची डोकी फुटली. मनगटे पिचली पण मुक्तीचा अभंग आवेश कायम राहिला. विशेष म्हणजे जंगल सत्याग्रहाला मुसलमान जमीनदारांची सहानुभूती होती व यामुळे हिंदूना जंगलातील लाकूडफाटा गोळा करण्याचा अधिकार मिळाला, तर मुसलमान जमीनदारांना जंगलाच्या उत्पन्नात सहा आण्यांची भागीदारी मिळाली. या लढ्यामुळे जंजिऱ्यातील प्रजा निर्भय बनली. संपूर्ण स्वातंत्र्याचा आणि लोकशाही राज्यपद्धतीचा उच्चार करू लागली.

१९४६ सालापर्यंत युद्धजन्य परिस्थितीमुळे मुक्तीचे वारे थंडावले होते. दुर्दैवाने हिंदुस्थानची फाळणी धार्मिक तत्त्वावर झाली. जंजिऱ्याचा नबाब मुसलमान आणि जवळजवळ १/३ प्रजाही मुसलमान. यामुळे प्रतिगामी शक्ती जंजिरा संस्थानला पाकिस्तानच्या दावणीस बांधू लागल्या. हिंदूंचे जीवित आणि वित्त धोक्यात आले. नौखालीची धास्ती हिंदूंच्या पोटात हरिण बनून राहिली आणि त्यातच मुक्तीलढ्याचे नेतृत्व करणाऱ्या नारायण भाई नावाच्या गुजराती तरुणाचा खून झाला. संध्याकाळी हिंदूंना बाहेर पडणेही मुश्किल झाले. प्रजापरिषदही निष्क्रीय बनली. १९४७ च्या डिसेंबरपर्यंत 'जैसे थे' स्थिती होती. बापू राजे, केशव खांबेटे व

दातार या म्हसळ्याच्या तरुणांनी संघटित होऊन, मुक्तिलढ्यासाठी कंबर कसली त्यांच्यासमोर एकच आशा होती, नानासाहेब पुरोहितांची. नानासाहेब पुरोहित एक कुशल संघटक, एक धडाडीचे कार्यकर्ते आणि बेडर छातीचे वेचाळीसचे वीर होते. ब्राह्मण असूनही त्यांनी उपेक्षितांच्या संघटना महाडमध्ये बांधल्या होत्या. नानासाहेबांनी आपले कर्तृत्व म्हसळ्यांच्या या तरुणांच्या पाठीशी उभे केले व त्यांना आश्वासन दिले, की 'एकाही मुसलमानाची हत्त्या न करता जंजिऱ्याचे सामिलीकरण आपण घडवून आणू या.' नानासाहेबांचा महाड तालुका हा सेवानिवृत्त लष्करी जवानांनी भरलेला होता. नानासाहेबांनी २६ जानेवारी १९४८ रोजी तीन हजार सशस्त्र मुक्तिसैनिकांना घेऊन जंजिऱ्यातील खामगाव या गावी पहिला मुक्काम केला. मुक्त भागात नागरी प्रशासन सुरू केले. नानासाहेबांनी आजचे राज्यमंत्री मोहन धारिया यांना म्हसाळ्याला जंजिऱ्याच्या तथाकथित सेनापतीच्या भेटीला पाठविले. त्यांनी विचारले, 'तुमच्या जवळ काय काय शस्त्रे आहेत?' मोहन धारियांनी उत्तर दिले, 'आमच्या जवळ मॉर्टरगन, मशीनगन आणि टॉमीगन आहेत.' (एकही गन प्रत्यक्षात नव्हती!) या उत्तराने जंजिऱ्याचा डी. एस्. पी. घाबरला व त्याने तेथून पळ काढला. त्याबरोबर नानासाहेबांनी व मोहन धारिया, बाबा दळवी या सहकाऱ्यांनीशी म्हसळा कचेरीचा तावा घेतला. नानासाहेबांनी बहुसंख्य मुसलमान असलेल्या या गावी जाहीर सभा घेऊन मुसलमानांना आवाहन केले, की संस्थान सामीलीकरणाची ही पुरोगामी चळवळ आहे. मुस्लीम बांधवांनी धार्मिक अभिनिवेश न बाळगता आम्हास मदत करावी परंतु त्यांचे म्हणणे अरण्यरुदन ठरले. तरीसुद्धा तीन हजार सशस्त्र मुक्तिसैनिक बरोबर असतानाही आपल्या मुक्तिसैनिकांना बजावले, की एकाही मुस्लीमाच्या केसाला धक्का लागता कामा नये. मुसलमानांची जान, जोरू, जायदाद सुरक्षित राहिली पाहिजे. नानासाहेब पुरोहितांच्या मुक्सिैनिकांनी त्यांच्या आदेशाचे ब्रम्हवाक्य मानून पालन केले.

२९ जानेवारीला मुक्तिसैनिकांची संख्या वाढली. स्वयंस्फूर्तीने लोक या दास्यमुक्तीच्या लढ्यात सामील झाले. नानासाहेब पुरोहित यांच्या नेतृत्वाखाली १५००० मुक्तिसैनिकांनी रक्त न सांडता श्रीवर्धन शहराचा ताबा घेतला. ३० जानेवारीला महात्मा गांधींची हत्त्या झाली. त्या दिवशी जाहीर सभा घेऊन महात्म्याला अभिवादन करून प्रामाणिक प्रशासन चालविण्याची प्रतिज्ञा केली. म्हसळा व श्रीवर्धन या दोन तालुक्यांवर आबा चांदोरकर, खांबेटे या तरुणांना प्रशासक नेमले.

जंजिऱ्याच्या नबाबाने मुक्तिसेनेचा रेटा पाहून नानासाहेबांना बोलावून घेतले. लोकप्रतिनिधीक मंत्रिमंडळाची घोषणा केली. नानासाहेबांना मंत्रिमंडळात बोलावले परंतु निर्लोभी, सत्वशील नाना पुरोहितांनी जंजिरा संस्थानातील नेत्यांचे मंत्रिमंडळ बनविण्याचा सल्ला नबाबाला दिला व ते मंत्रीमंडळात गेले नाहीच. ४ मार्च १९४८

रोजी नबाबाने सामिलीकरणावर सही केली. नानासाहेब पुरोहित यांनी कुलाब्याचे कलेक्टर झुबेरीसाहेब यांना २ महिन्यातील खजिन्याचा पूर्ण हिशेब दिला. आणि मुक्तिसैनिकांच्या ताब्यातील सर्व मालमत्ता स्वतंत्र भारत सरकारच्या प्रतिनिधींच्या हवाली केली.

आणि जंजिऱ्यावर स्वतंत्र भारताचा तिरंगा फडकू लागला. नानासाहेबांनी त्वरित कूळ कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी प्रजेला संघटित केले. मुसलमान व ब्राह्मण, कायस्थ खोतांच्या जोखडातून कुणबी, कुलवाड्यांना मुक्त केले. दुर्दैवाने नानासो पुरोहित यांची ही मुक्तिलढ्याची हकीकत अज्ञात राहिली. आणि स्वार्थी, दुष्ट तथाकथित पाकिस्तान धार्जिण्यांनी मुसलमानांचे नंबर एकचे दुश्मन म्हणून नानासाहेबांची प्रतिमा काळ्या स्वरुपात उभी केली. मुक्तिलढा ज्या मुसलमानांनी पाहिला त्यांच्या हृदयातील खुदा त्यांना नक्कीच सांगेल की, नानासाहेबांनी एकाही मुसलमानाचे रक्त न सांडता, एकाही मुसलमानाचे घर न जाळता मुसलमान स्त्रियांची प्रतिष्ठा कायम ठेवून हा मुक्तिलढा चालविला होता. हा लढा केवळ हिन्दु-मुसलमानामधील नव्हता. प्रजा व नबाब यातील नव्हता तर जमीनदारांनी केलेल्या अनन्वित अत्याचारांच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी होता. इंग्रजांना जे जंजिरा संस्थान घेताना १८७० साल उजाडले ते जंजिरा संस्थान रायगडच्या परिसरात वाढलेल्या नानासाहेब पुरोहितांनी सहजपणे जिंकून दाखवले. त्यामुळे छत्रपतींचे अपुरे स्वप्न साकारले. संभाजीच्या पराक्रमाने अर्धविराम बनलेले जंजिरा संस्थान विराम पावले. कान्होजी आंग्र्यांच्या बेडर आत्म्याला समाधान लाभले. आणि संस्थानांच्या विलिनीकरणातील एक प्रश्न मुक्तिसेनेने शांततापूर्ण रीतीने सोडवून डॉ. आंबेडकरांना याचि देही याचि डोळा वेठबंदी अमलात आणण्याचा आनंद मिळवून दिला. शतकानुशतके धार्मिक छळ सोसणाऱ्या प्रजेला स्वातंत्र्याचा आनंद मिळाला. वेठ करणाऱ्या कुणबी कुळवाड्यांना, महारांना याच जन्मी दास्य-मुक्ती संपवून भूमिमालक बनण्याचे कल्पित स्वप्न सत्यात उतरलेले पहाता आले. या लढ्यासाठी खस्ता सोसलेल्या असंख्य अनामिकांना, धुंद वीरांना शतशः प्रणाम !

# रसातळाला जाण्यापूर्वी...



अस्वस्थ करणाऱ्या
एका बंगाली कथेचा अनुवाद

| | | |
|---|---|---|
| मूळ बंगाली | हिन्दी | मराठी |
| लेखक | अनुवाद | अनुवाद |
| गौरकिशोर घोष | कृष्णचंद्र चौधरी | लक्ष्मण लोंढे |

---

त्या वेळी असित सेन कामात पार गढून गेला होता. दिल्लीच्या आयात-निर्यात विभागाकडून अतिशय तातडीचं पत्र आलं होतं. "टॉप प्रॉयॉरिटी रेफरन्स. ॲप्लिकेशन फॉर एक्स्पोर्ट ऑफ मँगनीज ओअर टू सॉफ्ट करन्सी कंट्रीज.' जरी पत्र फार लेट आलं होतं तरी ठराविक तारखेपूर्वी त्याचं उत्तर निर्यात विभागाच्या कचेरीत पोचतं झालं नाही तर त्याला भला लठ्ठ पगार आणि इतर सुखसोई देऊन नोकरीवर ठेवण्यात कंपनीला काहीच हशील नव्हतं. काही झालं तरी दोन दिवसांत उत्तर रवाना झालंच पाहिजे. फायलींच्या ढिगाऱ्यांतून आवश्यक ती माहिती मोठ्या सावधगिरीने गोळा करीत असतानाच घाईघाईनेच तो आपल्या स्टेनोग्राफरला पत्राचा मजकूर सांगत होता. इतक्यात फोनची घंटा वाजली.

–हॅलो ! इच्छा नसताना त्याच्या आवाजात चिडचिड आली.

–मी लिली बोलत्ये. स्वर खूप शांत आणि कोमल होता. मी लिली आहे. परत आल्ये.

मागचा पुढचा विचार न करता असित सेन किंचाळला. – लिली ! तू आलीस ! गुड गॉड !

गेले पाच दिवस छातीत घुसमटलेल्या टाइम बॉंबचा त्या क्षणी एकदम स्फोट झाला.

असितला गुदमरल्यासारखं झालं. त्याने डोळे मिटून घेतले. दाट अंधार. त्या गडद अंधारात तीन पिशाच्यांचे चेहरे उभे राहिले आणि त्यांनी गडगडाटासारखे हास्य केलं. काय होतंय् याचा विचार न करता त्या भयाण किर्रर्र रात्री तो निर्जन रस्त्यावरून धावू लागला. पुढे पुढे धावतच राहिला. त्याने डोळे उघडले. रंगरंगोटी केलेल्या चेहऱ्यावरील सुरमा घातलेले दोन डोळे आपल्याकडे कुतुहल आणि विस्मयाने टकमका पहात असलेले त्याला दिसले.

–लिली ! त्याच्या आवाजात अजूनही कंप होता. एक सेकंद प्लीज ! त्याने फोनच्या तोंडावर हात ठेवला आणि आवश्यक तेवढ्या धीम्या सुरात स्टेनोग्राफरला

फर्मावलं – मिस् नंदी, आताच्या वेळ इतकं टाइप करून ठेवा. मी पुन्हा बोलावीन.

त्याला भयंकर तहान लागली. टेबलाच्या बाजूची कळ दावत त्यानं कॉलबेल वाजवली. शिपाई येऊन उभा राहिला. असितने त्याला खुणेनं पाणी आणायला सांगितलं. पाण्याचा भरलेला ग्लास त्यानं एका घोटात घशाखाली उतरवला. खोली एअरकंडिशन्ड असूनही असितला घाम फुटू लागला.

–लिली ! त्याचा आवाज अजूनही कापरा होता. मग त्यानं स्वतःला थोडंसं सावरलं. अतिशय महत्त्वाच्या गोष्टी विचारल्या– लिली, तू कुठे आहेस ? कुठून बोलत्येस ? तू, तू, तुझं, तुझं...पुढे त्याला काही बोलता आलं नाही. एक महत्त्वाचा प्रश्न त्याला विचारायचा होता. पण त्याचे शब्द ओठांतच अडखळले.

लिलीने उत्तर दिले –मी घरी आहे. घरूनच बोलत्ये. तिचा आवाज पूर्वी इतकाच शांत आणि कोमल होता.

–घरून ! गुड गॉड ! आवेगाची एक लाट असितला गदगदा हलवून गेली. थोडा दम खाऊन त्यानं साध्या स्वरात विचारलं– घरी कशी पोचलीस लिली ? कुणी पोचवलं ?

–मी स्वतःच आल्ये. आपली कार स्वतःच ड्राइव्ह करीत आल्ये.

असितचा विश्वास बसत नव्हता. पण हे स्वप्न नव्हतं. पलीकडून येणारा आवाज लिलीचाच होता. गेले पाच दिवस त्याने कसे घालवले हे सांगता आलं असतं तर किती बरं झालं असतं !

–तुम्ही आता फार कामात आहात ?

–छे, छे ! एक पत्र डिक्टेट करीत होतो. आजच्या डाकेनं चालू झालं असतं तर बरं झालं असतं. पण जाऊ दे मी येतोच.

–घाई कशाला करता ? लिली म्हणाली. आता ताबडतोब आलात काय किंवा थोड्या वेळानं आलात काय, काही फरक पडणार नाही. तुम्ही तुमचं काम संपवूनच या.'

–नाही. आता मला इथं थांबवत नाही. आता, या वेळी, या क्षणी तुला पहावंसं वाटतंय, असित म्हणाला आणि भयंकर अस्वस्थ झाला. त्याच्या स्वरात कॉलेज-जीवनातली चंचलता भरून आली.

–नाही. आता, ज्याअर्थी मी परत नाहीशी होण्याची शक्यता नाही, त्याअर्थी तुम्ही तुमचं काम संपवूनच या.

–लिली, गेले पाच दिवस मी कोणत्या घोरात घालवले हे तुला सांगणं कठीण आहे ! तू खरं सांगत्येस ना लिली ? घरूनच फोन करत्येस ना ? तुझी सुटका झालीय् ना ? तुझ्या पाठीमागे सुरा परजीत कोणी उभं नाही ना ? रिव्हाल्व्हर रोखून फोनवरून माझ्याशी बोलायची तुझ्यावर कोणी बळजबरी तर करीत नाही ना ?

पलीकडून उत्तर आलं, नाही. भयानं असितच्या अंगावर शहारा आला. फोन-वरच तो ओरडला, लिली, लिली !

—लिली ही इकडे आहे आपली कार. ओह् ह्या गुंडांनी जीवन नकोसं करून सोडलंय्. ह्या डॅम्ड कलकत्त्यात आजकाल कसलीच सिक्युरिटी राहिली नाही. चावी दे.

—तुम्ही फार थकला आहात. मी ड्राइव्ह करते. पण तुम्ही चाकातली हवा चेक करून पहा. त्या मुलानं दाखवली नसती तर आपल्याला आपली कार शोधूनही सापडली नसती. मी त्याला एक रुपया दिला तर तुम्ही चिडलात.

—बास्टर्ड. ती एक गँग आहे. समजलं ? नो मरसी. दिसता क्षणी एकेकाला गोळी घातली पाहिजे. माझ्या हाती सरकार असतं तर मी हेच केलं असतं.

—ओह किती काळोखी गल्ली आहे.

लिलीनं सरावलेल्या हातांनी दरवाजा उघडला. आणि ती स्टिअरिंगपाशी बसली. दुसऱ्याच क्षणी कोणीतरी तिला धक्का देऊन आडवी पाडली आणि मानेवर सुरा ठेवून म्हटलं —थोडासा जरी आरडाओरडा केलास तर याद राख. दोन तुकडे करून टाकीन. तुला वाचवायची कुणाच्या बापाची हिम्मत होणार नाही !

घाबरून लिली जवळजवळ बेशुद्ध पडली.

—अरे त्या साल्याला पकडलं का ? कुणाचा तरी आवाज आला.

अंधारातच कुणीतरी उत्तर दिलं —हा हा धरून ठेवलाय.

—साला कधीचा बकवास करतोय. एक लाथ हाण त्याच्या अंडावर. मोठा सरकारच्या गप्पा मारत होता. हाण लाथ.

असितने चटकन पँटवरून आपल्या दोन्ही मांड्यांच्या मधे हात ठेवले. —नाही नाही, प्लीज ! काय पाहिजे ते सांगा. सगळं देतो पण मारू नका !

—बस्. हातसुद्धा लावला नाही तोच गव्हर्मेंटच्या बच्च्याची गांड फाटली. अंधारात तिघांचं विकाळ हास्य घुमलं. —अच्छा ठीक आहे ! चिंचुदरीके बच्चे. तुला मारून आम्ही आमचे हात नाही घाण करीत. साल्या काढ तुझ्यापाशी काय आहे ते ?

—एक एक करून असितने सगळं काढून त्यांच्यासमोर ठेवलं. त्यांनी सगळं ताब्यात घेतलं. हे सारं आवाज न करता पार पडलं.

—आता ऐक. एकदम शांत सुरात एकानं सांगितलं —मी डबल मार्च म्हणेन आणि तू तावडतोब इथून चालायला लागायचं. मागे वळून पहायचं नाही. धावायचं नाही. तुझी गाडी आणि हा माल – कोण आहे रे ही ? बायको आहे, का असाच कुठे डल्ला मारलायस ? ते असू दे. तर ही दोन्ही आम्ही घेऊन जातो. पाच दिव-सांनी ह्याच ठिकाणी नेमक्या ह्याच वेळी येऊन परत घेऊन जा. खबरदार पाच दिवस हूं की चूं केलंस तर. पोलिसात रिपोर्ट करण्याचा प्रयत्न केलास, कुणाला

कळवलस तर याद राख. साल्या, हा माल तुझ्या दृष्टीस पुन्हा कधीच पडणार नाही.

असित अजिजीनं काहीतरी सांगणार होता तेवढ्यात त्या आवाजाने धमकावले–चूप साल्या, थोबाड उघडलंस तर सारी दातकडं घशात घालीन. मग त्याने मिलिटरीच्या थाटात हुकूम सोडला – तोंड फिरव. असितने गल्लीकडे तोंड वळवलं. –डबल मार्च. ताबडतोब असित चालू लागला. थोडासा जलदच.

गाडी स्टार्ट करता करता एकजण म्हणाला– ह्याला ऑलिंपिकला पाठवलं पाहिजे. साला, जलद चालण्याचं सुवर्णपदक जिंकून आणील. साल्याची चड्डी ओली झाली असणार. घरी गेल्यावर पहिल्यांदा कपडे बदलेल मग बाकी सगळं...

– हॅलो, हॅलो. साहेब, मी रियाजुद्दीन बोलतोय्.

– रियाजुद्दिन ? कुठून बोलतोयस् ? असितच्या तळहाताला असा घाम फुटला होता, की फोनचा रिसीव्हर हातातून निसटत होता.

– घरून बोलतोय् साहेब. रियाजुद्दीनने उत्तर दिले.

– रियाजुद्दीन ? हां हां, समजलं. मेमसाहेब कुठे आहेत ?

– शेजारीच उभ्या आहेत. त्यांनीच मला तुमच्याशी बोलायला सांगितलं.

लिलीनं पुन्हा रिसीव्हर हातात घेतला. ती थोडी हसली. मग हळूहळू म्हणाली– आता तरी तुमचा विश्वास बसला ना, की मी घरूनच बोलत्ये आहे म्हणून ? सिनेमातल्या गुंडांप्रमाणे माझ्या पाठीशी कुणी सुरा किंवा रिव्हॉल्व्हर घेऊन उभं नाही !

– ओह्, आलं लक्षात. असितनं मोठा निःश्वास टाकला. त्याला वाटलं, त्याच्या शरीरातलं सारं रक्त कोणीतरी शोषून घेतलं आहे. त्यानं मान्य केलं–मी फार भित्रा आहे लिली. उगाचाच घाबरलो होतो. □

लिली शॉवरखाली आंघोळ करीत होती. तिनं साबणाची एक नवी वडी काढली आणि हळूहळू साऱ्या शरीराला साबण चोळू लागली. असला साबण सहजासहजी बाजारात विकत मिळत नाही, कारण त्याच्या आयातीवर बंदी आहे. पण काळ्या बाजाराच्या रस्त्याने तो बऱ्याच चढ्या भावात लिलीसारख्यांच्या घरी येतो. रंध्रारंध्रांतून मळ नाहीसा करून तो त्वचेला ताजगी देतो. त्या व्यक्तीला आणि त्याच्या घरादाराला सुगंधित करून सोडतो. असलाच एक साबण अंगावरून फिरवीत फिरवीत लिली आपलं पूर्वपरिचित शैथिल्य परत आणण्याचा प्रयत्न करीत होती. गेले पाच दिवस तिच्या अंगावर एकच साडी–पेटीकोट आणि ब्रा होते. या क्षणी तिला वाटलं, गेल्या पाच दिवसांतील हीच जणू सर्वांत शरमेची बाब होती. साबणाच्या फेसाने आणि शॉवरच्या थंड फवाऱ्यानं जेंव्हा तिच्या

शरीराच्या गात्रागात्राला आराम मिळाला तेव्हा ती थंड फरशीवर चवडे टकत टेकत आरशासमोर येऊन आपलं विवस्त्र शरीर न्याहाळू लागली. योनीपाशी थोडी सूज होती. अजूनही दुखत होतं. दोन्ही स्तन आणि बेंबीच्या खालचा ओटीपोटाचा भागही थोडा दुखत होता. ह्याशिवाय शरीराच्या कोणत्याच भागावर बाह्य आक्रमणाच्या कोणत्याच खुणा नव्हत्या. तिने शॉवर बंद केली आणि ती आपलं शरीर हळुवारपणे टॉवेलने टिपू लागली.

कपडे बदलल्यावर तिला पुरेसं हलकं हलकं वाटू लागलं. वेताची खुर्ची ओढून घेऊन ती बाल्कनीत बसली. इथून दुरून येणारा असित दिसला असता. लिलीनं ह्याच कारणासाठी दुसऱ्या मजल्यावरचा हा फ्लॅट निवडला होता. असितच्या स्वरात ओघळलेला आवेश आणि उद्वेग खरा असला तर तो आता कोणत्याही क्षणी तिथे येण्याची शक्यता होती. प्रयत्न करकरूनही असित आपल्यासमोर येऊन कसा उभा राहील ह्याचा अंदाज तिला बांधता येईना.

– मेमसाब, चहा आणू, रियाजुद्दीनने येऊन विचारले.

– आता नको. साहेबांना तर येऊ दे.

ती परत आलेली पाहून कुठेच खळबळ माजली नव्हती. जणू काही ती मार्केटिंग करून किंवा एखाद्या पार्टीहून किंवा माहेराहून परत आली होती. असितनं कुणालाच काही सांगितलं नव्हतं हे उघड होतं. फोनवर असितशी बोलताना तिला फार गळल्यासारखं वाटत होतं. पण आंघोळ केल्यावर तिला तरतरी आली होती. रॅकवरून जुनी वर्तमानपत्रं काढून तिनं चाळली. नाही. ती बातमी कुठे आली नव्हती. असितनं त्या लोकांची आज्ञा तंतोतंत पाळली होती. लिलीला हसू आलं. ती विचार करू लागली, असितचं आणि माझं नातं काय ? सात वर्षांपूर्वी आम्ही प्रियकर–प्रेयसी होतो. पाच वर्षांपूर्वी पति-पत्नी झालो. पाच दिवसांपूर्वीसुद्धा तेच नातं होतं का ?... होतं तर ह्या गेल्या पाच दिवसांत त्याचा काहीच पडताळा का आला नाही ? ह्या घरात तिचं स्थान कोणतं आहे ? हा बिछाना, हा वॉर्डरोब, प्रसाधनाची ही सारी साधनं. ह्या साऱ्यांना गेल्या पाच दिवसांत तिचा स्पर्श झाला नाही. कारण ती इथे नव्हती. ती फक्त इथे नव्हती. पण त्यामुळे कसलाच अभाव किंवा त्रुटी नव्हती. कुठे आरडाओरडा झाला नाही. तिला वाचवण्यासाठी कोणी त्रास घेतला नाही. आणि तिला वाटलं होतं, की तिला वाचवण्यासाठी असित आकाश-पाताळ एक करील. वाटलं होतं, की ज्या ओसाड घरात त्या लोकांनी तिला डांबलं होतं त्या घराला कोणत्याही क्षणी पोलिसांचा वेढा पडेल. पोलिसांची कुत्री रस्त्याचा वास घेत घेत त्या घरापर्यंत पोचतील. ह्याच विचार मनात येऊन मोठ्या हुषारीने आणि सावधगिरीने तिने आपली पर्स आणि रुमाल रस्त्यात टाकले होते. काळवंडलेले डोळे आणि अस्ताव्यस्त केस अशा अवतारात पोलिसांबरोबर असितही येईल आणि तिला पाहून ओरडेल–लिली, तू जिवंत आहेस ना ?

त्या बेफिकीर घरात बसून हा सगळा विचार करण लिलीला इतकं विसंगत वाटलं, की तिला हसू आलं. परंतु गेल्या पाच दिवसांतील पहिल्या दोन दिवसांत तर तिला असा विश्वास वाटत होता, की असित येईल. इतक्या सहजपणे तो त्या लोकांना निसटू देणार नाही. तिला वाचवण्यासाठी तो नक्कीच काहीतरी करील. पण तो गैरसमज होता हे सिद्ध झालं. कदाचित अनेक सिनेमांतून पाहिलं असल्यामुळे तिला असा विश्वास वाटत असावा.

असित आला. एरवी जसा ऑफिसातून घरी येतो तसाच आजही परत आला. हातात उंची अॅटॅची. चेहऱ्यावर थोडासा थकवा, पण तसा टुकटुकीत. जवळच्या तिपाईवर अॅटॅची ठेवून टायची गाठ सैल करीत तो वाकला आणि तो काही विचारणार इतक्यात रियाजुद्दीन चहा घेऊन आला. असित गप्प बसला. रियाजुद्दीन निघून गेल्यावर त्याने हलक्या आवाजात विचारलं–ह्या लोकांना काही कळलं नाही?

लिली ह्यावेळी गंभीरपणे शांत होती. तिनं आपल्या साऱ्या शरीराला एकदम ढिलं सोडलं होतं. एकदा असितकडे पाहून न बोलताच ती कपात चहा ओतू लागली.

असितने आपल्या स्वरात अगतिकता दाखविण्याचा प्रयत्न करीत म्हटलं – उफ् हॉरिबल्! कुणाला काही सांगताही येत नव्हतं. एकदा मनात आलं होतं की पोलिसांना –

लिलीने चहाचा कप असितपुढे केला.

असितने चहाचा घुटका घेत म्हटलं–पण सेकंड थॉटनंतर वाटलं, तसं करणं शहाणपणाचं होणार नाही. दीज बास्टर्डस् डोंट डू देअर ड्यूटीज नाउ अ डेज्, अॅण्ड आय् पे टॅक्सेस्.

असित उत्तेजित होऊन टाय सोडू लागला. म्हणाला–काय सांगावं, पोलिसांत-सुद्धा गुंडांची माणसं असतील. असणारच, नाहीतर त्यांची इतकी हिम्मत कशी झाली असती! मी पोलिसात खबर दिली असती आणि ते गप्प बसले असते. इकडे गुंडांनासुद्धा कळलं असतं, की मी त्यांचं म्हणणं ऐकलं नाही. कदाचित गोष्ट वर्तमानपत्रांत आली असती. मग त्यांनी काय केलं असतं, ह्या विचारानंच माझ्या काळजाचं पाणी पाणी होतंय्, होत होतं.

लिलीनं शांत स्वरात सांगितलं–ते दररोज वर्तमानपत्रं वाचत होते.

– वाचत होते ना? असित ताठ होऊन बसला. म्हणजे माझा अंदाज बरोबरच होता. मला माहीत होतं, ते पेपर वाचत असणार. पोलिसांतल्या त्यांच्या साथीदारां-कडून बातमी काढीत असणार......

लिली निर्विकार होऊन चहाचे घुटके घेत होती. असितच्या मनातील खळबळीचा आपल्याला स्पर्शही होत नाही, यानंच ती हैराण झाली होती.

– इतकंच काय, असित सांगत होता, मला माहीत होतं, की ते लोक माझी प्रत्येक मूव्हमेंट क्लोजली वॉच करीत असतील. सगळीकडे त्यांचं जाळं पसरलेलं

असतं. म्हणून खूप विचार करून मी हेच ठरवलं, की त्या लोकांनी सांगितलं तसंच वागावं. इट् वॉज ए गॅंबल्; पण दुसरा मार्गच काय होता ?

– खात्री बाळग लिली, असित खराखुरा मनापासून विनवीत होता. असं करून मला स्वस्थता लाभली नाही. नरकयातना म्हणजे काय असतात हे या पाच दिवसांत मला कळलं. मला काहीतरी करावंसं वाटत होतं. समथिंग पॉझिटिव्ह. पण मी एकटा काय करू शकत होतो ? वन अगेन्स्ट सो मेनी. मी काय करू शकणार ? इट्स् ए बिग रॅकेट्.

लिलीनं तसंच शांत आणि कोमल स्वरात म्हटलं–त्या लोकांची कोणतीच गॅंग नव्हती. ते फक्त तिघंच होते.

– व्हॉट् ? तिघं...च होते ? आश्चर्याच्या धक्क्याने असित एकदम सुन्न झाला. अस्पष्ट आवाजात तो पुन्हा पुटपुटला, तिघंच होते–फक्त तिघं !

लिलीनं म्हटलं–त्यांच्यापैकी एकाचंही वय तेवीसहून जास्त नव्हतं. सर्वांत छोटा तर नुकतीच मिसरूड फुटत असलेला बच्चा होता, साधारण एकोणीस वर्षांचा असेल. सगळे मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगे होते, असित. त्यांच्यात धंदेवाईक गुंड कोणीच नव्हता.


थोडं थांबून लिली म्हणाली– मी जेवण तयार करते. तुम्ही कपडे बदला. बाकी मग बोलू.

□

ते लोक धंदेवाईक गुंड नाहीत हे खुद्द लिलीलासुद्धा अगोदर समजलं नव्हतं. भीतीनं तीसुद्धा गोठून गेली होती. अचानक झालेल्या हल्ल्यानं तिची विचार-शक्ती नष्ट झाली होती. शरीरावरचा तावा सुटला होता. आणि नाड्या थंडावल्या होत्या. तिला त्यावेळी, आपण असितबरोबर फिरायला निघालोय, असित आपल्या बरोबर आहे, असितने गुंडांबरोबर थोडीसुद्धा झटापट केली नाही, उलट एखाद्या आज्ञाधारक पोरासारखा तो त्यांचे आदेश पाळत राहिला, त्यांनी त्याला डबल मार्च करायला सांगितलं आणि असित तिला–स्वतःच्या बायकोला–गुंडांच्या हातांत सोपवून, तालात डबलमार्च करीत गेला ह्या गोष्टींचा विचारसुद्धा त्यावेळी तिच्या मनात आला नाही. भीतीने डोळे बंद करून ती पडून राहिली.

गाडी स्टार्ट केल्यावर त्यांतल्या दोघा तरुणांनी तिला एखाद्या गाठोड्यासारखी पुढच्या सीटवरून मागच्या सीटवर फेकून दिलं. मग दोघे उडी मारून तिच्याजवळ आले. आणि तिला खेटून बसले. ते लोक आपले विकार लपविण्याचा खूप प्रयत्न करीत होते.

फिक्कट अंधारात जेव्हा गाडी चालू झाली तेव्हा डोळे बंद असूनही लिलीला एक चेहरा तिच्या अंगावर झुकल्याचं जाणवलं. तिच्या अंगावर कांटा आला. घाम



# आता एल.आय.सी.च आपले स्वप्न साकार करील

स्वतःचं घर अथवा फ्लॅट असावा असं सर्वांनाच वाटतं. ते केवळ 'वाटणं' आता एल्. आय्. सी. च्या घरबांधणी योजनेमुळे प्रत्यक्षात उतरवणं शक्य आहे.
घरबांधणीसाठी एल्. आय्. सी. आपल्या पॉलीसीवर माफक दरानं कर्ज देते. त्याची परतफेड देखील सोयीस्कर छोट्या हप्त्यांनी करता येते.

ह्या योजनेखालील भारतातील सर्व मोठ्या व कांही छोट्या शहरांतील विमेदारांना फायदा घेता येईल. अधिक माहितीसाठी जवळच्या एल्. आय. सी. च्या शाखाधिकाऱ्यांना भेटा.

*आयुर्विम्याला पर्याय नाही!*

PRATIBHA 1611-

फुटला. पाठ, कंबर आणि पोटात पीळ पडला. मासिक पाळीपूर्वी ज्या प्रकारची भीती आणि वेदना तिला वाटायची, तशाच प्रकारची वेदना तिला आता जाणवली.

तिच्यावर ओणवलेल्या तोंडातून दबलेला आवाज आला— शक्य होईल तेवढं रक्तपाताच्या भानगडीत आम्हाला पडायचं नाही. कुठल्याही प्रकारचा आवाज करू नको आम्ही जे सांगू ते चुपचाप कर. त्यानं तुझंच कमी नुकसान होईल.

—काय उस्ताद, पार्टीला भूलथापा देतोय्स काय ? लिलीच्या पायांच्या बाजूने धातूच्या भांड्यासारखा आवाज खणखणला.

ड्रायव्हरच्या सीटकडून आवाज आला—मस्त माल मिळालाय् ना, म्हणून उस्ताद जरा हळुवार झालाय्.

धातूचा आवाज पुन्हा खणखणला—हातीपायी धड जायचं असलं तर तोंड बंद ठेव. थोडासा जरी आवाज केलास तरी तुझं शरीर एका हप्त्यात परत जाणार नाही. शरीराची चामडी सोलून चामडी आणि हाडं निरनिराळ्या पार्सलनं पाठवून देऊ... मेल मेंबर आतापर्यंत टॅक्सीनं घरी पोचून कॉफी पीत असेल, नाही ?

—हॅट् साल्या, तुला तर माल ओळखतासुद्धा येत नाही. साला मिलिटरीका बच्चा आहे. डबल मार्चचा हुकूम मिळाला तर डबल मार्च करीतच घरी जाईल बटा.

—साला तो हरामी नाही याची गॅरंटी काय ? एकदा भोसकला असता तर झंझट संपली असती. पण नाही, साल्याला उगागच सोडला. साला भेकडारखा कटला आणि आता पोलीस इन्स्पेक्टरकडे तक्रार नोंदवीत असेल.

ड्रायव्हर म्हणाला—उस्ताद, हा बेअकली इसम कुठून पैदा केलात ? रस्त्यात मजेत वासूगिरी करीत होता, तिथेच सोडून द्यायचा. या लायनीत पडायचं कुठून सुचलं याला ? गांडू साला—

अरे हॉ रे, मी वासूगिरी करतो आणि तू मोठा साधूसंन्याशीच की नाही लागून गेलास. तू नाही तुझ्या घुशीवर लाईन मारत ? गमजा बस कर. काय उस्ताद, ह्याला दम द्या.

उस्तादचा भारी आवाज आला— ए सोडून दे साल्याला. बस ! आता हरामी-पणा पुरे.

ड्रायव्हरने तोंडाने खच्च आवाज केला आणि ॲक्सिलरेटरवर पाय दाबला. गाडीची गती वाढवीत तो म्हणाला— टाकी फुल आहे उस्ताद. बोला कुठून काढू ?

—रेड रोड.

काही मिनिटांतच तुफानी वेगाने गाडी लोअर सर्क्युलर रोडवरून रेड रोडवर आली.

रेड रोड, उस्ताद.

—सीधी. टॉप स्पीड.
—सत्तर आहे उस्ताद.
—आणखी वाढव.
—ऐंशी, उस्ताद.
—हं तू वाढवीत रहा.
—नव्वद उस्ताद.
—जाऊ दे आता.
—चल रे उडनखटोले चल.

ॲक्सिलरेटरवर जास्तीत जास्त दाब पडल्यामुळे गाडी हवेत उडू लागली होती.

लिलीच्या लक्षात आलं, की गाडीच्या गतीबरोबर तेही जास्त जास्त उत्तेजित होत होते. लिलीला भीती वाटू लागली. घशाला कोरड पडली. ॲक्सिडेंट झाला तर शोधूनसुद्धा कुणाचा पत्ता लागला नसता. हे लोक फक्त दरोडेखोर नाहीत, पागलही आहेत.

पार्कस्ट्रीट आयलॅंड ज्या प्रकारे मागे पडलं, कार धक्के खात खात ज्या प्रकारे दौडत होती ते पाहून आपण अजूनही जिवंत आहोत याचंच लिलीला आश्चर्य वाटलं ! त्याहूनही आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते तिघे शिळेवर कोणतसं गाणं म्हणत होते.

एक शीळ थांबली.
—रेड रोड संपला, उस्ताद.
ती शीळ पुन्हा सुरू झाली.
दुसरी थांबली.
—डावीकडे.
शीळ वाजू लागली. गाडी डाव्या बाजूला वळून पुन्हा उडू लागली.
पुन्हा एक शीळ थांबली.
—स्ट्रॅंड रोड, उस्ताद.
ती शीळ कोरसमध्ये मिसळून गेली.
थोड्या वेळाने पुन्हा एक शीळ थांबली.
—डावीकडे.
पुन्हा कोरसमध्ये तिन्ही शिळा वाजू लागल्या.

वेड्यासारखी सुसाट धावणारी ती कार. तीन शिळांचं ते संगीत. अपार भय. भयंकर थकवा. ह्या सर्वांच्या संयुक्त परिणामानं लिलीचं काळवेळेचं भान हळूहळू पुसलं गेलं. ते लोक अनादि कालापासून असेच वेड लागल्यासारखे फिरत होते. लोअर सर्क्युलर रोड, रेड रोड, स्ट्रॅंड, हेस्टिंग्ज, लोअर सर्क्युलर रोड, रेड रोड

स्ट्रँड, हेस्टिंग्ज, लोअर सर्क्युलर रोड, –डावीकडे, –रेड रोड–डावीकडे–स्ट्रँड, –डावीकडे–हेस्टिंग्ज–सरळ–लोअर सर्क्युलर रोड डावीकडे–शिळेचा कोरस–डावीकडे–कळोख, काळोख मध्येच उजेड पुन्हा काळोख.

–अरे, अरे, ब्रे...क् !

क्रा अ-अ-अ-आ च् ! अचानक ब्रेक लावल्यामुळे जोरदार धक्क्याने गाडी चक्रासारखी गोल फिरून थांबली. धक्क्यानं ती सगळी एकमेकांवर आदळली. लिली भीतीनं किंचाळली. छातीची धडधड इतकी वाढली की ती फुटून जाईल असं वाटलं. कमरेत, पोटात, पाठीत एक तीव्र ताण पडला. भीतीने जोराची लघवीला लागली. घसा कोरडा पडला. सारं शरीर घामानं डबडबलं. समोरून बांबूचं ओझं लादून एक बैलगाडी खिरीदपूरहून ट्रामलाईनला समांतर असलेल्या रस्त्यावरून हळूहळू एस्प्लनेडकडे जात होती· पण त्या लोकांनी चटकन् स्वतःला सावरलं.

उस्ताद म्हणाला–शाबास, पार्टी जरा भडकली होती. ताबडतोब गाडी चालू करून त्या लोकांनी लोअर सर्क्युलर रोडने टॉप स्पीडमध्ये काढली.

ड्रायव्हरने म्हटलं–मामूची गाडी आहे. फॉलो करीलसं वाटतं.

–करू दे त्याला पाठलाग करायचा असला तर तू हाकलीत रहा. आता आणखी किती भटकणार, सीधा पॅलेसकडे चल.

पुन्हा ते थोडेसे उत्तेजित झाल्यासारखे वाटले. त्यांचा जोश पुन्हा उफाळून आल्यासारखा वाटला. पुन्हा कोरसमध्ये त्यांच्या शिट्ट्या सुरू झाल्या.

उस्तादने भसाड्या आवाजात गायला सुरुवात केली – तेरे पीछे पडे है राजा के अनुचर.'

ड्रायव्हर उत्तरला – जभी तो निकला हूँ मैं देशांतर.

आणि त्या विचित्र अवस्थेतही ते चांगलं गातायत् हे लिलीला जाणवलं. मध्येच तिला संशय येई. वाटे, ती गुंडांच्या तावडीत सापडलेलीच नाही. कसलातरी सिनेमाच पहात आहे. किंवा आपल्याच खोलीत झोपलेली आहे आणि तिला कसलं तरी वाईट स्वप्न पडत आहे.

ते लोक धंदेवाईक गुंड असोत किंवा नसोत. पण आपल्या अनुभवावरून लिलीनं मनाशी खूणगाठ बांधली, की क्रौर्य आणि निर्दयता यात ते कमी नव्हते.

असित जेव्हा सगळं आवरून जेवणाच्या टेबलापाशी बसला तेव्हा त्याला पाहून लिलीला वाटलं की असितचा आणि मनोव्यापारांचा संबंध पार तुटलेला आहे. एवढ्या वेळात त्याने पुन्हा एकदा दाढी केली होती. आणि स्नान केलं होतं. विलायती आफ्टरशेव्ह लोशनचा सुवास त्याच्या गालांना येत होता आणि सगळ्या खोलीत दरवळत होता. त्याच्या चेहेऱ्यावर आत्मतृप्तीचे भाव ओघळले होते.

अचानक लिलीच्या मनात आलं, की त्याला विचारावं –असित त्या दिवशी

तुम्ही खरोखरच चालत आला होता की गल्लीच्या तोंडाशी आल्यावर धावू लागला होता; की रस्त्यात तुम्ही टॅक्सी केली होती ? ◻

अशाप्रकारे आग्रह करवून घेऊन असितनं खाल्ल्याचं लिलीला कधी आठवत नाही.

सकाळी हेवी ब्रेकफास्ट घेऊन असित ऑफिसला जातो. विलायतेहून परत आल्यावर तो बेकन आणि अंड्याचा समतोल नाश्ता घेऊ लागला होता. अशा नाश्त्यामुळे पोटाचं दोंद वाढत नाही, पण पुरेशी एनर्जी रहाते. दुपारी तो कॉफी-क्लबमध्येच लंच घेतो. सँडविच आणि कॉफी. ह्यामुळे त्याचं वजनावर नियंत्रण राहिलं होतं. डिनर ही एकच गोष्ट तो जरा थाटामाटात करीत असे. नेहमी तो आपल्या दोस्तांना इन्व्हाइट करीत असे. तो स्वत: मोजकंच खायचा. पण दुसऱ्यांना मात्र आग्रह करकरून खायला घालण्याची त्याला हौस होती.

प्रथम प्रथम असित फक्त टॉप एक्झेक्युटिव्ह लोकांनाच इन्व्हाइट करीत असे. डिनरपूर्वी ड्रिंक्स् व ट्विस्ट, शेक किंवा बीट वगैरे म्यूझिकसह नाच होई. पुन्हा ड्रिंक्स. डिनरनंतर थोडावेळ गप्पांनाही रंग चढे. असितचं गृहस्थी जीवन एवढंच होतं. पण गेल्या काही दिवसांत त्याच्या ह्या जुन्या मित्रमंडळींचा राबता बंद झाला होता .. आपल्या ऑफिसातील अधिकाराच्या जागेचा उपयोग करून असितनं एका सुंदर परदेशी फ्रीजची सोय केली होती. ते विकून त्याला पैसे करावयाचे नव्हते, उलट स्वत:च्या उपयोगासाठी ठेवून घ्यायचं होतं. पण त्याचं हे रहस्य फुटलं होतं आणि हेवी इंपोर्ट ड्यूटी देऊन ते त्याला सोडवून घ्यावं लागलं होतं. असितला असा दाट संशय होता, की नेहमी आढळणाऱ्या बूर्झ्वा ईर्षेमुळे त्याच्या एक्झेक्युटिव्ह समाजांतील कोणातरी मित्रानंच हे रहस्य फोडलं असावं. एकतर हायर इन्कम-घाल्यावर इन्कम टॅक्स फारच लादला जातो. पगाराशिवाय कंपनीकडून मिळणाऱ्या इतर सुखसोईंवरही इन्कमटॅक्स लादल्यावर असितला ह्या बेकार समाजरचनेचा राग आला. वर मित्रांनी केलेल्या ह्या विश्वासघाताने तर त्याला एकदम मार्क्सिस्ट बनवून टाकलं.

ह्याच कारणामुळे अलीकडे त्याच्या डिनर पार्टीत लेखक, चित्रकार, कवी, नाटककार इत्यादी लोकांची वर्णी लागू लागली. प्रस्थापित समाजरचनेवर ह्या साऱ्यांचाच राग होता. त्यांची पुस्तकं विकली जात नव्हती, चित्रांना भाव येत नव्हता. त्यांना दारू प्यायला मिळत नव्हती आणि या बूर्झ्वा समाजव्यवस्थेतील पोकळ नीतिनिय-यांमुळे त्यांना मनात येईल त्या बाईबरोबर झोपताही येत नव्हतं. ह्या पोटेन्शियल प्रतिभावंतांना एक असह्य जीवन जगणं भाग पडत होतं.

– नथिंग कॅन बी वर्स दॅन धिस्. ह्याच डिनर टेबलावर उत्तेजित होऊन असित कित्येक वेळा म्हणाला होता – क्रांतीशिवाय या देशाची मुक्ती होणार नाही. बूर्झ्वा

लोकशाही म्हणजे निव्वळ एक विश्वासघात आहे. दुसरं काही नाही.

पाच दिवसांपूर्वीसुद्धा ह्याच टेबलावर जेवताना असितनं प्रस्थापित हितसंबंधाविरुद्ध आपला राग व्यक्त केला होता. आणि त्यानंतर ती दोघंजण नटूनथटून एका लोकप्रिय म्यूझिकल कंपनीचा नाईट शो बघायला गेली होती. लिलीला आठवतं, की असितच्या जेवणाची पद्धत अतिशय नागरी आणि सोफिस्टिकेटेड होती. तो खाताना थोडं तोंड उघडी आणि काटचाने छोटे छोटे तुकडे तोंडात सरकवी. नंतर मोठ्या कौशल्याने ते तो असे दाढेखाली सरकवी, की बोलताबोलताच घास आपोआप चावला जाई.

आज तो एखाद्या गांवढळ शेतकऱ्याप्रमाणे जेवणावर तुटून पडला होता. लिली मोठ्या साक्षेपाने त्याच्या खाण्याच्या ह्या पद्धतीचं निरीक्षण करीत होती.

—वाटतं, तुम्हाला इकडे खाणंसुद्धा गेलं नाही. आणखी घेणार का? एखादं आम्लेट किंवा फ्राईड एग? लिलीनं विचारलं.

तोंड पुसत असित म्हणाला —इनफ. आणखी नको.

असित सोफ्यावर जाऊन बसला आणि त्याने सिगारेट शिलगावली. लिलीचा स्थिरपणा आणि थंड शैथिल्य पाहून त्याला आश्चर्य वाटत होतं. लिलीचं हे साधेपण त्याला फार आवडलं. लिलीच्या जवळ जाऊन बसण्याची इच्छा झाली. तिला ओढून मिठीत घेण्याची वासना तीव्र होऊ लागली. अचानक त्याच्या मनात कामविकार बळावला. एक क्षणभर लिलीशी आपण संभोग घेत असल्याचं चित्र त्याच्या मनःचक्षूंसमोर तरळलं आणि लगेच अदृश्य झालं. तो स्वतःवर चिडला. स्वतःला चावकानं फोडून काढावसं वाटलं त्याला. मग त्याच्या मनात एक प्रश्न उभा राहिला आणि प्रबळ होत गेला. त्या लोकांनी लिलीला काहीच केलं नाही? त्याला विचारावसं वाटलं, पण हिम्मत झाली झाली नाही. तिच्याकडे पाहिल्यावर असं वाटत होतं की थोडाफार मार तिला बसला असावा, पण मारपीट होऊनही लिली इतकी अविचल राहिली असती?

लिली आपण होऊन पुढाकार घेत नाही, आस्था दाखवीत नाही हे पाहून असितलाच बोलावं लागलं —काय ग, तुला नक्की माहीत आहे की त्यांची गँग नाही? ते तिघंच आहेत?

— हं, त्या तिघांचीच एक गँग आहे.

— आणि ते गुंड नाहीत?

— ते गुंड नाहीत असं काही मी म्हटलं नाही. मी म्हटलं, त्यांच्यापैकी कोणीच धंदेवाईक गुंड नाही.

असित म्हणाला —नेमकं हेच माझ्या लक्षात येत नाही. अखेर त्यांचा मोटिव्ह काय होता? त्यांनी तुला पळवून नेलं आणि पांच दिवसांनी परत पाठवलं. तू तर कारसुद्धा घेऊन आलीस.

लिलीला हसू आलं.

— तुम्हांला काय वाटलं होतं असित ?

— मला ? इतक्या वेळानंतर जणू असितला आपल्या आस्तित्वाचं भान आलं.

— खरं सांगायचं तर मी एखाद्या चिठ्ठीची किंवा फोनची वाट पहात होतो. वाटलं होतं, की तुला सोडण्यासाठी ते एखाद्या मोठ्याश्या रकमेची रॅन्सम मागतील!

— आणि तुम्ही बँकेतून पाच-पाच दहा-दहाच्या नोटा मागवून त्यांच्यावर खुणा करून ठेवल्यात. नंतर तुम्ही त्या नोटा त्यांच्या हातावर टेकवल्या असत्या आणि त्यांनी मला सुखरूप परत दिलं असतं. तुम्ही मग पोलिसांत कळवलं असतं. खुणा केलेल्या नमुन्याच्या नोटा सी. आय्. डीं. ना दिल्या असत्या. पोलिसांनी सी. आय्. डी. च्या मदतीने साऱ्या गँगला अटक केलं असतं. आपण निश्चित होऊन डिनरनंतर रात्रीचा शो बघायला गेलो असतो. अशा तऱ्हेने नंतर अनंत काळपर्यंत आपण सुखानं जीवन घालवलं असतं. असंच ना ?

लिलीचं बोलणं ऐकून थोडावेळ असितच्या तोंडून शब्दच उमटला नाही. नंतर त्यानं आश्चर्यानं — तुला कोणी सांगितलं मी बँकेतून पैसे काढले होते आणि त्यांच्या वर खुणा केल्या होत्या म्हणून ?

— प्रथम सांगा तुम्ही असं केलं होतं की नाही ?

— हो, केलं होतं. त्यात काय चुकलं ? तुझ्या इज्जतीचा प्रश्न जिथे उपस्थित होतो तिथे रुपये-पैसे किस झाड की पत्ती ? तुझ्या सुरक्षिततेच्या बदल्यांत त्यांनी जे मागितलं असतं ते मी दिलं असतं. लिली तूंच माझं सर्वस्व आहेस.

लिलीला विचारावंसं वाटलं — असित, त्या दिवशी तुम्ही डबल मार्च करीत परतलात की धावत आलात; की टॅक्सी करून पळालात ? पण तिनं विचारलं नाही. ती फक्त खळखळून हसली.

— तुला हा सगळा खेळ वाटत असेल, लिली. उघड होतं, असित दुखावला होता. पण माझ्यासाठी ती जीवनमरणाची समस्या होती.

—अच्छा ? लिलीचे डोळे चमकले. तुम्ही ह्या बंदिस्त सुरक्षित खोलीत दडून बसलात. ज्यामुळे तुमच्या जिवाला धक्का लागेल अशी एकही गोष्ट तुम्ही केली नाही. हे तुमच्या जीवन मरणाच्या समस्येचं चित्र. आणि मी ? या पाच दिवसांत मी अशा तीन इसमांच्या तावडीत सापडले होते, की ज्यांनी नुकताच एक भयानक गुन्हा केला होता, ज्यांच्या हातांत लखलखत्या धारेचा सुरा परजलेला होता. कोणत्याही क्षणी तो सुरा माझ्या मानेत, छातीत किंवा पोटात भोसकला गेला असता. अशा परिस्थितीत तुमची ही पेरी मॅसन छापाची कथा मला खेळ नाही तर काय वाटणार ?

—नाही नाही, लिली गैरसमज करून घेऊ नकोस, प्लीज. माझ्या म्हणण्याचा तसा अर्थ नव्हता.

असित अचानक थांबला.

–तुमच्या परिस्थितीशी माझ्या परिस्थितीची तुलना करताच येणार नाही.

–मीसुद्धा तुलना करीत नव्हतो. माझं फक्त एवढंच म्हणणं होतं की–थोडं थांबून तो पुन्हा बोलू लागला–रिडिक्युलस. ह्या सगळ्या गोष्टींना आता काही अर्थच उरला नाही. लिली तुला मला एवढंच सांगायचंय, की पाच दिवस मी भयंकर यातनात घालवले. विश्वास ठेव, लिली. ऑनेस्ट. खाणं पिणं सुचत नव्हतं. झोप लागत नव्हती. कुणाशी काही बोलता येत नव्हतं. काय ॲक्शन घ्यावी काही समजत नव्हतं. आणि हे सगळं स्वतःच्या विचारांमुळे नव्हे. बिलीव्ह मी. इनफॅक्ट, माझ्या सेफ्टीचा प्रश्नच नव्हता. मी तर घरीच होतो. माझ्या पाठीशी काही एखादा गुंड सुरा घेऊन उभा नव्हता. माझ्यावर विश्वास ठेव लिली. तुझ्या सेफ्टीच्या विचारामुळेच मी एखादी रॅश ॲक्शन घेतली नाही. घरात, ऑफिसात प्रत्येक वेळी हाच विचार मनात येई, की अखेर त्यांना पाहिजे तरी काय ? त्या लोकांनी तुला का पळवलं ? त्यांचा मोटिव्ह काय होता ? असितचा स्वर उत्तेजित होता.

–विचार करून तुम्ही कोणत्या निष्कर्षाला पोचलात, असित ? त्यांचा हेतू समजला ?

–नाही. त्यानं हताश होऊन मान हलवली. प्रथम वाटलं होतं, की ते लोक रॅन्सम मागतील. मी एखाद्या चिठ्ठीची वाट पहात होतो चिठ्ठी कोणत्याही क्षणी मिळाली असती. पेरी मॅन्सन छापाची गोष्ट म्हणून तू हवं तर माझी टिंगल कर. खरं सांगायचं तर आता मलाही सारं हास्यास्पद वाटू लागलंय्. पोरखेळच म्हण ना. पण त्यावेळी जे काही केलं ते ऑनेस्टली सांगतो. ते फोन करतील अशा अंदाजान मी सारी रात्र फोनपाशी बसून काढली. बँकेतून पैसे काढून ठेवले. डिटेक्टिव्ह कथात लिहिलेलं असतं त्याप्रमाणे त्यांच्यावर खुणासुद्धा करून ठेवल्या. दिवस गेले. रात्री उलटल्या, पण चिठ्ठी आली नाही; की फोनही खणखणला नाही. तू जिवंत आहेस का ? की तुला त्या लोकांनी मारून टाकलं ? का पैशासाठी त्यांनी तुला पळवलंच नाही ? का त्यांच्या पाठीमागे काही व्यक्तिगत व्यथा आहे ? का हा एखादा प्रॅक्टिकल जोक आहे ? सर्व दृष्टिकोनातून मी ह्या घटनेवर विचार केला. एकदम तुझा फोन आला. तू परत घरी आली आहेस ? याच्यावर विश्वास ठेवायला फार कष्ट पडले. त्याची खात्री पटली तो अधिकच गोंधळात पडला. इतक्या सहज जर त्यांनी तुला सोडून दिलं तर मग तुला त्यांनी तशा तऱ्हेनं पळवलंच का ?

लिली निर्विकारपणे म्हणाली–आजकाल दुसऱ्यांच्या बायका पळवून नेणं किती सहज शक्य आहे हे त्यांना पहायचं असेल ? हासुद्धा एक मोटिव्ह होऊ शकतो ?

–थट्टा करू नको, लिली.

–नाही, असित. लिली ठाशीव स्वरात म्हणाली–जे काही घडलंय् तेच सांगत्ये.

सहज पळवणं शक्य झालं म्हणूनच त्यांनी मला पळवलं. आपण जर प्रतिकार केला असता तर त्यांनी मला पळवलं नसतं. कदाचित सुऱ्यानं भोसकून बेशुद्ध स्थितीत त्यांनी आपल्याला तिथेच फेकून दिलं असतं. फक्त कारच घेऊन ते पळाले असते. आपण प्रतिकार केला असता तर आपल्यापैकी एकाचा किंवा दोघांचाही कदाचित जीव गेला असता. त्यात मोठं रिस्क होतं यात संशय नाही.

—माझ्या काहीच लक्षात येत नाही, लिली. त्या लोकांना काय पाहिजे होतं ? असितच्या दुबळ्या स्वरात एकाच प्रश्नाचं उत्तर शोधण्याची धडपड होती.

लिली म्हणाली—त्या लोकांची कोणतीच सूत्रबद्ध योजना नव्हती. पहिल्या प्रथम तर कार लांबवायची आणि पेट्रोलसाठी तुमच्याकडून काही पैसे लुबाडायचे एवढाच त्यांचा बेत होता.

—कशाला ?

—जॉय राईडसाठी.

—एवढ्याचसाठी ? लिली कमाल आहे—

—मी थट्टा नाही करीत असित., सत्य सांगते. तिन्ही पोरं खानदानी कुटुंबांतली होती. म्हणजे मध्यमवर्गीय होती. आपल्या वासनांची, इच्छांची भूक भागवण्यासाठी त्यांना कुठे काही मिळालं नव्हतं. त्यांना काहीच मिळत नाही. सुखोपभोगाच्या साऱ्या वस्तू त्यांच्या आवाक्याच्या बाहेर आहेत. दूर उभं राहून त्यांनी फक्त पाहिलंय आणि डोळ्यांनी पिऊन घेतलंय. जोपर्यंत समाजात न्यायाअन्यायाची चाड होती, सरकारी यंत्रणेबाबत लोकांच्या मनात धास्ती होती, पोलिसांचा जोपर्यंत लोकांवर वचक होता तोपर्यंत ह्या वंचितांच्या प्रवृत्ती विविध बंधनात जखडलेल्या होत्या. त्यामुळेच आपण सुखोपभोगी लोक जगात अविरोध वावरत होतो. आज



शासनयंत्रणा मोडकळीस आलेली आहे म्हणून त्यांच्या प्रवृत्तीवरची बंधनं गळून पडली आहेत. त्या लोकांनी ही बंधनं तोडली आहेत–ह्याच कारणानं आज जे त्यांना हवं असेल त्याच्यावर झडप घालून तें ते हिसकून घेतात.

थोडं थांबून लिली म्हणाली–पाच दिवसापूर्वी एखाद्यानं मला अशी गोष्ट सांगितली असती तर तुमच्या प्रमाणेच माझाही विश्वास बसला नसता. एका निद्रिस्त ज्वालामुखीच्या तोंडावर आपल्यासारख्या लोकांचं घर उभं आहे–आपल्याला असं वाटतं, की चारी बाजूंनी आपण सुरक्षित आहोत. आपल्यावर कोठूनही संकट कोसळणार नाही. ह्याच विचारानं आपण आत्मतृप्तीत गुंग असतो. पण एक दिवस हा ज्वालामुखी भडकेल आणि एका फटक्यात साऱ्याचा विध्वंस करून टाकील याचा आपण कधीच विचार केलेला नाही. पाच दिवसांपूर्वी मीही हा विचार केला नव्हता. ज्वालामुखी अजून जागा झालेला नाही. एका दीर्घ निद्रे-तून जागं होण्यापूर्वी तो फक्त एक जांभई आणि आळोखेपिळोखे देतोय. आणि फक्त इतक्यातच परिणामी इतकं घडतंय्. मी आणि तुम्ही म्हणजे पतिपत्नीनं ह्या एका फालतू प्रसंगानं सिद्ध करून दिलं, की आपण कोणी कोणाचे नाही. या घटनेनं एवढंच सिद्ध झालं की मी माझी आहे आणि तुम्ही तुमचे आहात. आपलं परम पवित्र वैवाहिक बंधन किती कमजोर आहे याचा क्षणार्धात प्रत्यय आला. वेदमंत्र, लाजाहोम म्हणजे सरळ साधं थोथांड आहे. ह्या फ्लॅटच्या साजाइतकंच अर्थहीन. हे सारं व्यर्थ आहे. एवढा थाटमाट करून घर सजविण्यासाठी आपण कष्ट घेतो. थोडंस इकडे तिकडे झालं, एखादी वस्तू हरवली की आपण किती अपसेट होतो. पण जराशी कुठे आग लागली तर आपण ह्या सगळ्याकडे पाठ फिरवून झटक्यात रस्त्यावर येऊ. ह्या थाटामाटाचा मोह असूनही त्याच्याबरोबर जळून जायची आपली तयारी नाही. हो की नाही असित ? आपण एकमेकांनासुद्धा असंच ठोकरून दिलं आहे. तुम्हीं मला आणि मी तुम्हाला.

–ते लोक मला का घेऊन गेले, कुठे घेऊन गेले, मला नेऊन त्यांनी काय केलं हे एकायची तुमची इच्छा नाही ?

–ते नंतर सांग लिली. डिनर नंतर.

–नाही असित. लिली शांत स्वरात म्हणाली. उलट तुम्ही आधीच ऐका. तुमच्याशी परिचय करून देण्यासाठी त्या लोकांना मी आज डिनरसाठी बोलावलं आहे. ते येण्यापूर्वीच सारं ऐकून घ्या.

–त्यांना ? कुणाच्या विषयी बोलत्येस ?

–ज्या तीन व्यक्तींनी मला नेलं होतं त्यांच्याचविषयी.

–नो. असित उसळला. तुला...तुझं...

–नाही. माझं डोकं फिरलं नाही. बसा खाली. तमाशा करू नका.

–व्हॉट डु यू मीन ? तमाशा करू नको ? असित रागाने थरथरू लागला. दोज

बास्टर्डस् स्वाइन्स्. मी त्यांचा खून करीन. त्यांना फासावर चढवीन.

लिलीला दिसलं, असितचा चेहेरा हळूहळू हिंस्र बनत चालला. आता त्याचा चेहेरा त्या तीन अत्याचाऱ्यांशी एकदम मिळताजुळता झालेला दिसत होता. थोडासा सुद्धा फरक नव्हता.

रास्कल्स.

असितचे दांत सुऱ्यासारखे चमकले.

—सारी गुंडगिरी नष्ट करतो.

असित तावातावाने येऊन लिलीसमोर उभा राहिला.

—एका घावात तुकडे तुकडे करतो त्यांचे.

तो कार चालवणारा मुलगा लिलीसमोर सुरा परजून उभा होता—हिंस्र चेहेऱ्यावर खून चढलेला.

—ज्यादा नखरे करशील तर एका घावात तुकडे तुकडे करून टाकीन. तो मुलगा म्हणाला होता.

लिलीच्या डोळ्यांसमोरून त्यानं सुरा घुमवला. त्या मोठ्या हॉलमध्ये एकमेव बल्बच्या फिक्कट प्रकाशात लिलीला वीज चमकल्याचा भास झाला. लिली भिंतीला पाठ टेकून उभी होती. भीतीच्या लाटांमागून लाटा पोटात उठून छातीकडे सरकत होत्या. सारा चेहरा घामानं डबडबलेला. श्वास घशात कोंडू लागला. पण ह्यावेळी तिने डोळे बंद केले नव्हते. भीतीने अंग चोरून मागे मागे सरकत ती भिंतीपर्यंत पोचली होती. पण आता आणखी मागे सरकायला जागाच नव्हती. त्या हिंस्र चेहेऱ्यावर, त्याच्या पिसाळलेल्या डोळ्यांवर आपली दृष्टी रोखून ती उभी होती.

मग अडखळत तिनं विचारलं—तुम्हा लोकांना काय हवंय ?

बाकीचे दोघे तमाशा बघावा तसं बघत, खिदळत होते.

काशाचा आवाज खणखणला—बाप रे, खारकुंडी दम देत्ये! म्हणत्ये तुम्हाला काय पाहिजे. उस्ताद, काय पाहिजे हो ?

उस्तादाने करड्या आवाजात सुनावले—ए भडव्या, तुझा सुरा संभाळ. साल्याला चटकचांदणीशी बोलाव कसं तेसुद्धा कळत नाही. इतका का भडकतोय्स ?

लिलीनं पाहिलं त्या पोराच्या दादागिरीला थोडा आळा पडला. त्याने सुरा मिटून खिशात ठेवला. पण तो तिच्यापुढून दूर झाला नाही. तिच्या तोंडाकडे न्याहाळून पहात राहिला.

काशाचं भांडं पुन्हा खणखणलं—विचारत्ये काय पाहिजे. उस्ताद बोला काय पाहिजे ?

उस्ताद बोलला—मुस्कट फोडून घ्यायचं नसेल तर आता बकवास बंद कर.

लिलीच्या समोरचा पोरगा एकदम थंड पडला. पार विझला. शीळ घालीत

म्हणला – फिट पार्टी नंबर वन, उस्ताद.

तिघे गडगडाटासारखे हसले.

– माझ्या इथे डिनर पार्टीला ते तीन स्काउंड्रल्स येणार ?

असित सिनेमातल्या खलनायकासारखा खदखदला. मग काही क्षणातच म्हणाला,

– नाऊ आय अंडरस्टुड. ए ग्रेट आयडिया. लिली, तू ग्रेट आहेस. शाबास.

असितने चटकन रिसीव्हर उचलला. लिलीने चित्याच्या चपळाईने त्याच्यावर झडप घेतली आणि असितच्या हातातून तिने रिसीव्हर हिसकून घेतला.

–काय करता आहा, इडियट ? चेतलेल्या स्वरात लिलीने धमकावले – जा तिकडे निमूटपणे बसून रहा.

असित आ वासून लिलीकडे पहातच राहिला. म्हणाला – मी पोलिसांना फोन करीत होतो. लालबाजार पोलीस चौकीमधला डे. कमिशनर माझ्या ओळखीचा आहे. लिली तू त्याला ओळखत नाहीस ? कॅ. बोसच्या पार्टीत मी त्याची तुझ्याशी ओळख करून दिली होती.

– डोंट गेट नर्व्हस लिली. तिचे दोन्ही खांदे पकडून भुताच्या भीतीने घाबरलेल्या एखाद्या लहान मुलीला समजावावं तसं असित म्हणाला.

–घाबरण्यासारखं काही नाही, आता गुंड तुझ्या केसालाही धक्का लावू शकणार नाहीत. फोन दे माझ्याकडे. डी. सी.ला सांगितलं, की तो ताबडतोब येईल. फोर्स घेऊन येईल. हरामखोरांना हातकड्या घालील. साल्यांना असा धडा शिकवील की आयुष्यात विसरणार नाहीत. पोलिसांपाशी बरोबर उपाय असतात. फोन दे.

लिली पुन्हा शांत झाली. तिने फोन असितच्या हातात दिला.

– तुमच्या त्या डी. सी. ला काय सांगणार आहात ? माझ्या बायकोनं प्रेमानं तीन गुंडांना डिनर पार्टीला इन्व्हाइट केलंय्; कृपा करून फोर्स घेऊन या आणि त्यांना अटक करून घेऊन जा ?

– काय बोलत्येस लिली तू ? तू काय प्रेमानं त्या गुंडांना इन्व्हाइट केलंयस् ?

– मग तुमचा तो डी. सी. फोर्स घेऊन धावत पळत येईल. विचारील, तुमच्या बायकोची या गुंडांशी कशी ओळख झाली ? तुम्ही सांगाल, त्यांनी माझ्या बायकोला पळवून नेलं होतं. डी. सी. आश्चर्यचकित होऊन विचारील, काय म्हणता? मग तुम्ही त्यावेळी कुठे होता ? तुम्ही सांगाल –मी तिच्याबरोबरच होतो. डी. सी. चिडून विचारेल – मग तुम्ही काहीच कसं केलं नाही ? तुम्ही सांगाल, काहीच कसं नाही केलं ? त्यांनी पैसे मागितले, मी दिले. त्यांनी बायको मागितली, तीही देऊन टाकली –

असितने धाडकन फोन खाली आदळला.

तो किंचाळला – लिली प्ली...ज्

धीम्या स्वरात लिली बोलतच राहिली — मग गुंडांनी मला हुकूम केला, डबल मार्च.

— स्टॉप इट् लिली, प्लीज स्टॉप इट.

— आणि मी डबल मार्च करीत घरी परत आलो.

— स्टॉप इट यू स्लॉट.

असितने वेड लागल्यासारखी लिलीची मानगुट पकडली. लिलीने त्याला कसलाच विरोध केला नाही. मग असितने धक्का देऊन तिला सोफ्यावर पाडलं. आणि आपलेच केस ओढीत तो म्हणाला–लिली मला माफ कर. मी भित्रा आहे, कॉवर्ड आहे याची पुनःपुन्हा आठवण करून देऊ नकोस. मी आयुष्यात कधी मार खाल्ला नाही. मार खायची मला भीती वाटते. हात उगारायला मी कधी शिकलोच नाही. फक्त पळून जायचं शिकलोय्. मी कॉवर्ड आहे. लिली मी कॉवर्ड आहे.

लिलीनं पाहिलं, दोन्ही हाताच्या तळव्यात तोंड झाकून असित मुसमुसून रडत होता. लिलीला भरून आलं. डोळ्यांत पाणी आलं. तिला राहवलं नाही. धावत जाऊन तिनं त्याला छातीशी कवटाळलं. असितनं काही न बोलता तिला वेड्या-सारखं घट्ट आवळून धरलं आणि तो तिची चुंबनं घेऊ लागला. लिलीसुद्धा चुंबनं घेऊ लागली. अचानक दोघांची शरीरं तापली. झोपायच्या खोलीत शिरता शिरता लिलीनं म्हटलं–तो दरवाजा तरी बंद करून घ्या. ¤

अस्ताव्यस्त झालेल्या बिछान्यावर दोघंजण आडवारली होती. लिली उपडी झोपली होती. तिनं अंगावर एक पातळ चादर पांघरली होती. असितने आपले आळसावलेले डोळे बंद करून घेतले होते आणि तो एक विलक्षण सुख अनुभवीत होता. त्याला सिगरेट शिलगवायची इच्छा झाली. त्यानं जरासा हात लांबवला असता तर त्याला सिगरेट आणि माचिस घेता आली असती, पण सिगारेट पेटविण्याचे कष्ट घेणंसुद्धा त्यावेळी त्याला फार जड वाटत होतं.

तो कुशीवर वळला आणि लिलीच्या शरीराला त्यानं आपलं शरीर लावलं. असितनं लिलीच्या मानेवरून पाठीपर्यंत हात फिरवला. जिथं जिथं त्याचा हात फिरला तिथून स्पर्शसुखाच्या लाटा असितच्या शरीरभर पसरल्या. ही लिली हरवली होती. असितला ती पुन्हा मिळाली आहे. फक्त पाच दिवसांनंतर नाही, तर कित्येक वर्षांनंतर !

असितन डोळे उघडले. खोली चारी बाजूंनी पडद्यांनी बंद होती. एअर कंडि-शनिंगच्या यंत्रातून एक प्रकारच्या मधुर संगीताचा आणि मोजक्या थंडाव्याचा साऱ्या खोलीभर शिडकावा होत होता. इथे त्याला पूर्ण सुरक्षितता वाटत होती. ह्या आरामाचा पुरेपूर आनंद उपभोगायचा म्हणजे एक सिगरेट पेटविण्याची फार

आवश्यकता होती. तो हळूच उठून बसला. तक्क्यांला पाठ टेकवली. चादर छाती- वरून कमरेपर्यंत खाली घसरली. पायाच्या बाजूला असलेल्या मोठ्या आरशात त्याला आपलं अर्धं अनावृत शरीर दिसलं. छाती आणि दंडाचे स्नायू पुष्ट होते. आपला चेहरा पाहून तो खूष झाला. चेहऱ्यावर रुबाब होता.

असितने सिगरेट पेटवला. धूर हवेत सोडून लिलीच्या तोंडाजवळ तोंड नेऊन तो म्हणाला – माहीतं आहे लिली, मी काही वाटतो तितका दुबळा पुरुष नाही. आता, आत्ताच मी पाहिलंय्.

लिली त्याच्याजवळ सरकली. त्याच्या केसाळ छातीत तिनं आपलं तोंड लपवलं. ती जराशी हसली. स्वप्नात हसावं तसं.

– लिली मी वचन देतो, आता तुला माझ्यापासून कोणी हिरावून नेऊ शकणार नाही. वाटतं, लवकरच मला जुडो किंवा कराट किंवा तसंच काहीतरी शिकलं पाहिजे.

लिलीनं भारावलेल्या स्वरात म्हटलं – आज खूप मजा आली ना, असित ?

असितचा चेहेरा खुलला. म्हणाला – आज खूप मजा आली. अशी मजा पूर्वी कधीच आली नव्हती. नेव्हर.

– पण मी आज सावधगिरी बाळगळी नाही.

असितने मूर्खासारखं विचारलं – म्हणजे काय ?

लिलीला त्याची खूप मजा वाटली. असितकडे टक लावून पहात ती हसू लागली. म्हणाली – गेले काही दिवस मी पिल्स घेतल्याच नाहीत आणि आज तर इतकं अचानक झालं की सावधगिरी घ्यायचं लक्षातच राहिलं नाही.

– ओहो, हे होय ? माझ्या मनात कसले कसले विचार आले. ही काय मोठी समस्या थोडीच आहे ? सिगरेटचा एक झुरका घेत असित म्हणाला. त्याला फार हलकं हलकं वाटलं.

तू त्याची चिंता करू नको लिली. नाहीतर उद्या अमीयकडे जाऊ. वन ऑफ् द बेस्ट गायनी. नो प्रॉब्लेम.

लिली पुन्हा हसली.

–हसत्येस का ? मी काही हसण्यासारखं बोललो नाही.

–यावेळी प्रॉब्लेम हा आहे, की मला एक मूल पाहिजे. लिली एकाएकी गंभीर झाली. म्हणाली– खरंच असल्या रूटलेस जीवनात काही अर्थ नाही. आपल्याला आपल्या ह्या संसारात एक मूल होण्याची गरज आहे. तरीही ही साधी गोष्ट आपण मान्य करीत नाही. कधी तुम्हाला मूल हवं असतं तेव्हा मला नकोसं वाटतं. कधी मला हवंसं वाटतं तेव्हा तुम्ही पाठ फिरवता. ह्या गेल्या पाच दिवसांत माझ्यात खूप उलथापालथ झालीय्, असित. आतापर्यंत आपण फक्त हवेत उडत होतो. वास्तवाच्या जमिनीवर पाय रोवून उभं रहायला कचरत होतो. आणि

याचमुळे प्रत्येक ठिकाणी आपण माघार घेतो, झगडू शकत नाही.

आतापर्यंत ओघळलेल्या साऱ्या सुखाला, तृप्तीला लिलीनं एका फुंकरेत उडवून लावलं. असितचा चेहरा काळवंडला. लिली पुन्हा बोलू लागली– असित, तुम्हाला माहीत आहे ? आपण आपल्या मुलाला असं वाढवलं पाहिजे, की लहानपणापासूनच त्याला पायाखाली जमिनीचा घट्ट आधार मिळेल. तरच तो निर्भय होईल, संकटां-पासून भित्रेपणानं पळणार नाही; तर घट्ट पाय रोवून त्यांच्याशी सामना देईल.

लिलीच्या बोलण्यानं असितमध्ये पुन्हा उत्साह संचरला. त्याला मी लहानपणा-पासूनच कराट शिकवीन. अर्थात मुलगा झाला तर...

–मुलगी झाली तरी काय हरकत आहे ? लिली हसली. तिलासुद्धा अशी शिकवण दिली पाहिजे, की ती स्वतःला दैवापेक्षाही ताकदवान समजेल. तिच्यात असा आत्म-विश्वास निर्माण झाला पाहिजे की कितीही मोठ्या अन्यायी शक्तीसमोर ती आपली मान झुकवणार नाही.

असितला आता हसू आलं– कराट म्हणजे काय हे तुला माहीत नाही. म्हणून तुला समजत नाही मी काय म्हणतोय् ते. काही दिवसांपूर्वी डॉ. सोमच्या पार्टीत एक अमेरिकन पोरगा भेटला होता. आपल्या गर्लफ्रेंडला घेऊन इंडियात आला होता. काशीला जवळ जवळ आठ दहा गुंडांनी त्या पोरीला पळवून नेण्यासाठी त्यांच्यावर अॅटॅक केला. मग ते कसे बचावले माहीत आहे ?

असितने लिलीला सस्पेन्समध्ये ठेवण्यासाठी मोठ्या थाटात सिगारेट पेटविली. मग जणू काही आपलीच बहादुरी वर्णन करतोय अशा थाटात तो सांगू लागला, – त्याला कराट येत होतं. त्यानं एकदम उडी घेऊन समोरच्या गुंडाच्या नाकावर लाथा मारल्या. त्या गुंडाची मानच तिरकली. परमनंट डॅमेज. नंतर दुसऱ्या गुंडाच्या मानेजवळच्या नर्व्हसेंटरवर असा जोराचा फटका दिलान् की तोपण फिनिश् झाला. तिसऱ्याच्या डोळ्यात हाताचा आंगठा असा फिरवलान् की अलगद त्याचं बुबुळ सॉकेटमधून बाहेर आलं. एकच डोळा फोडून त्यानं त्याला सोडून दिलं. डु यू नो व्हाय ? त्यानं सांगितलं, की त्याला दुसरा डोळाही असाच बाहेर काढता आला असता. पण त्यानं तसं केलं नाही. त्याचा इंडियन मेंटॅलिटीचा अभ्यास होता. त्याला माहीत होतं इथले लोक आंधळ्यांवर दया करतात. त्यांना भीक देतात. पण एकाक्ष माणूस अपशकुनी समजला जातो. लोक त्याला हेट करतात. आणि लिली त्या अमेरिकन पोराच्या निर्लिप्त आणि उदासीनपणं बोलण्याच्या ढंगाने तर मी भलताच इंप्रेस झालो.

असित खुशीत येऊन सिगारेट ओढू लागला.

लिलीनं म्हटलं– आपला मुलगा दिसायला कुणाच्या वळणावर गेलेला तुम्हाला आवडेल ?

असित सिगारेटचा झुरका ओढताओढता गालांत हसला. म्हणाला– आधी तूच

सांग, तुला काय आवडेल ?

—तो माझ्या वळणावर गेला तर सर्वच दृष्टीने चांगलं होईल.

असित जोरानं हसला— मलाही तसंच वाटतं. तुझ्यासारखा झाला तरच चांगलं, यात काही संशय नाही. माझ्यासरखा झाला तरीसुद्धा काही खास अग्ली दिसणार नाही तो. असितने डोकं उचलून मोठ्या आरशात पाहिलं. आपला चेहेरा त्याला फारसा खराब वाटला नाही. त्यानं लिलीचा चेहेरासुद्धा पाहिला. तिच्या चेहेऱ्यावर स्वप्नील भाव होते. लिलीचा एक पाय चादरीतून बाहेर आला होता. असित त्या नग्न पायाकडे पहात राहिला. लव्हली. शी इज अ रिअल ब्यूटी. त्यानं लिलीच्या पायावरून हळुवारपणे हात फिरवला. लिलीच्या शरीरावर रोमांच उभे राहिले. असितला आता स्वत:ला आवरणं शक्य होईना. एका झटक्यात त्यानं चादर फेकून दिली आणि तो तिच्या छातीवर लवंडला.

लिली त्याला अडवू लागली— आता आणखी नको. असित पुन्हा कधी.

असित तिचा विरोध मानायला तयार नव्हता. हलक्या आवाजात तिची विनवणी करू लागला— प्लीज, प्लीज, एकदाच.

—नाही, नाही असित, तुमच्या बरोबर मला थोडं महत्वाचं बोलायचंय्. सीरियस्. पोरकटपणा करू नका. लिली चिडली होती.

—लिली, अडवू नको. माझं ऐक ना.

—नाही असित. माझं ऐका. उठा.

लिली दोन्ही हातांनी त्याला दूर सारू लागली. असितने चटकन् तिचे दोन्ही हात पकडले. आणि तक्क्यावर जोराने दाबून धरले.

—नाही, नाही, नाही ती किंचाळली. पण त्याचं जड शरीर ती दूर सारू शकली नाही.

एकदम लिलीनं दोन्ही गुढग्यात पाय मोडून जोराने एक झटका दिला. आणि तो गडगडून खाली पडला. लिली चटकन् उठली आणि वेड्यासारखी धावू लागली. मग भिंतीला पाठ टेकवून धापा टाकू लागली.

लिलीच्या गुढग्यांचा मार खाऊन तो जमिनीवर आदळला होता. त्याला असं होईल असं वाटलंच नव्हतं. तो बुचकळ्यात पडला होता आणि बाकीचे दोन गुंड मोठमोठ्याने हसत होते.

—हॅट साल्या. पोरीच्या एका लाथेत तुझं वांग्याचं भरीत झालं. ह्या मर्दाला कुठून मिळवलंत, उस्ताद ?

—अरे पाहीन पाहीन, तुझी तरी काय ताकद आहे ते ?

तो ड्रायव्हर समोर उडी मारून उभा राहिला. नंतर फुत्कारत म्हणाला—अरे तुझी तर गांड केव्हांच फाटलये. उस्तादकडे पाहून सारं सहन करतोय्. उस्ताद

त्याला संभाळा अगोदर.

–आधी सांगतोय बकवास बंद कर नाहीतर भोसकीन. माहीत नाही तुला.

–अरे भडव्या, उस्तादचा भक्कम आवाज घुमला. धमक्या पुरे झाल्या. रात्रभर भांडतच राहाणार आहात का काही करणार आहात ? जा, पार्टीला पकड आणि बिछान्यावर आडवी पाड. मी प्रथम तिचं सील तोडतो. मग साल्या रात्रभर चालू दे तुझं.

दोघांनी जाऊन लिलीला दाबून धरलं.

कांशाचं भांडं खणखणलं–चल पार्टी, उशीर कशाला करत्येस ? उस्तादबरोबर तुझी पहिला मधुचंद्र होऊ दे. मग आम्ही आहोच.

ड्रायव्हरने लिलीच्या गालावर नाक ठेवून एक दीर्घ श्वास घेतला–यार काय भारी सेंट लावलायन, आय शप्थ पहा. काय सुगंध येतोय्. वा !

लिलीने थरथर कापत म्हटले– किती रुपये पाहिजेत तुम्हाला बोला. मागाल तेवढे देईन पण मला सोडा.

–रुपये नाही, पार्टी, आम्हाला तूच पाहिजेस. हा...हा !

लिलीने पाहिलं. पहाता पहाता त्यांचे चेहेरे बदलले. त्यांच्या डोळयांत वासनेची


# केंद्रीय हिन्दी निदेशालय

(शिक्षण व समाजस्वास्थ्य मंत्रालय)

सन १९६९ ते १९७१ या मुदतीत प्रसिद्ध झालेल्या हिन्दी पुस्तकांच्या पारितोषिक-स्पर्धेसाठी प्रवेशिका (अर्ज) मागविण्यात येत आहेत. प्रथम पारितोषिक प्रत्येकी रु. १००० चे १३ पुस्तकांकरता व द्वितीय पारितोषिक प्रत्येकी रु. ५०० चे १३ पुस्तकांकरता आहे. तरी बिगर–हिन्दी प्रांतातील व ज्यांची मातृभाषा हिन्दी नाही अशा लेखकांनी दिनांक ३१ जानेवारी १९७२ पर्यंत 'केंद्रीय हिन्दी निदेशालय' (शिक्षण व समाजस्वास्थ्य मंत्रालय) यांजकडे अर्ज करावेत.

**अधिक तपशिलासाठी पुढील पत्त्यावर लिहावे–**

साहाय्यक संचालक

**केंद्रीय हिन्दी निदेशालय**

पश्चिमेकडील ब्लॉक नं. ७

आर. के. पुरम. नवी दिल्ली.

[ davp 71/481 ]

आग भडकली. तेही थरथरू लागले. त्यांचे डोळे तारवटले. ते तिला पकडून पलंगाकडे खेचू लागले.

पलंगापाशी आल्यावर लिलीच्या अंगात परत प्रतिकाराचं बळ संचारलं. ती पुन्हा अचानकपणे आपल्या साऱ्या ताकदीनिशी झगडू लागली. ओरखाडीत, बोचकारीत, चावत आणि हातपाय झाडत तिनं स्वतःला मुक्त केलं. ती आता पळणार इतक्यात एकानं तिच्या पायावर लाथ झाडली. ती जमिनीवर तोंडघशी पडली. त्या लोकांनी ताबडतोब तिच्यावर झडप घातली. एकाने तिच्या केसाना धरून जोराने तिचं डोकं फरशीवर आपटलं. लिलीच्या डोळ्यांपुढे काजवे चमकले.

–पार्टीला उचलून पलंगावर ठेवा. गंभीर आवाज ऐकू आला.

लिलीच्या डोळ्यांपुढच्या अंधार अधिकच गडद होऊ लागला. तरीही तिने प्रयत्न थांबवले नाहीत. बुडून रसातळाला जाण्यापूर्वी पुन्हा निकराची लढाई सुरू केली. हालचाल करून, कंबर इकडे तिकडे हलवून शक्य होईल तितका ती विरोध करीत राहिली.

गंभीर आवाज गरजला– पार्टीचा जोर बराच दिसतोय. अरे चंडूल तू दोन्ही हात पकडून ठेव.

ड्रायव्हरने लिलीचे हात डोक्याच्या बाजूला एका झटक्यात खेचले आणि तो ओरडला–जादा नखरे केलेस तर चामडी लोळवीन.

गंभीर आवाजाने पुन्हा हुकूम दिला– तू पाय पकडून ठेव.

लिलीच्या छातीवर एका भारी शरीराने झडप घातली.

–नीच, नालायक, रेपिस्ट, लिली किंचाळली.

असित अपराध्यासारखा चुळबुळत उठून बसला. म्हणाला– फरगेट इट लिली. प्लीज ! तू इतकी नाराज होशील असं मला नव्हतं वाटलं.

तीव्र भावनावेगाने लिली बोलून गेली– स्काउंड्रल, तुमच्यात आणि त्या लोकांत काय फरक आहे ? त्या लोकांनी सुद्धा माझ्यावर...रागाने लिली फुत्कारत होती. असितचा चेहरा पांढरा फटक पडला होता.

–तुला त्या लोकांनी रेप केलं लिली ?

लिलीनं उत्तर दिलं नाही. तीक्ष्ण नजरेनं ती त्याच्याकडे पहात राहिली.

**अपूर्ण : उत्तरार्ध पुढील अंकी**

# हिंदू रहित सिंध आज सुना सुना झाला आहे....


'मला माझ्या गुन्ह्यांची जाणीव आहे. मी आज असे दिवस कंठीत आहे याचे कारणही तेंच आहे. राजकारणाच्या कुटिल डावात अडकून मी इस्लामचा खरा अर्थ विसरलो आणि हिंदू व मुसलमान यांना वेगवेगळे समजून भेदभाव केला. डाकू, बदमाश, व द्वेश फैलावणाऱ्या मुसलमानांना ते मुसलमान होते म्हणून चांगले समजू लागलो आणि चांगल्या, सभ्य, सर्वांच्या ठाई ईश्वर पाहणाऱ्या प्रेमळ अशा हिंदूंना, ते हिंदू म्हणून, वाईट समजू लागलो.

आमच्या घराशेजारीच घरे असणाऱ्या, जन्मापासून आमचे सवंगडी असणाऱ्या आणि हजारो वर्षे आमच्या सुखदु:खांत दुधात विरघळलेल्या साखरेप्रमाणे साथ देणाऱ्या हिंदूंना अनोळखी परके समजू लागलो. ◻

'हिंदूंकडे मी प्रामाणिक व प्रांजळ कबुली देतो म्हणून जातीभेद मानणाऱ्यांनी मला लाखोली वाहिली तरी माझ्या स्वभावात काही बदल घडणार नाही. आजतागायत मी हे सारे ऐकत आलो आहे. हिंदू सिंध सोडून गेल्याने सिंधची अपार हानी झाली आहे हे सांगितल्याशिवाय माझी बेचैनी संपणार नाही. ही हानी अनेक वर्षे पर्यंत भरून येणार नाही. श्रेष्ठ वैज्ञानिक, डॉक्टर्स, साहित्यिक, इंजिनिअर्स, व्यापारी आदींना आपण गमावून बसलो आहोत. सिंधमधील कारखाने, शाळा, महाविद्यालय ग्रंथालये, छापखाने आणि धर्मशाळा आज उजाड झाल्या आहेत. सिंधमधील गावे व सुंदर इमारती नष्ट झाल्या आहेत.

हिंदू रहित सिंध आज सुना सुना झाला आहे. ते कुठेही असोत, आनंद, ऐश्वर्यात नांदोत. आम्ही त्यांना कधीही विसरू शकणार नाही. त्यांचेही हे कर्तव्य आहे, की आपल्या प्याऱ्या सिंधला त्यांनी विसरू नये. जर ज्यू लोकांनी दोन हजार वर्षेपर्यंत आपली राष्ट्रीयता कायम राखली तर मग त्यांना (सिंध सोडून) फक्त तीनच वर्षे झाली आहेत. कदाचित एक दिवस असा उजेडला की हा विरह नाहीसा होईल आणि ते पुन्हा आमच्यात परत येतील.'

[ जी. एम्. सैय्यद ]



# सिंध देश पुरवणी

संकलन : अनुवाद

---

माणूस प्रतिनिधी, मुंबई

# जिये सिंध आंदोलन

## धर्मनिरपेक्षता व स्वातंत्र्याची ही ज्योत सिंधुदेशात कशी प्रज्वलित झाली ?

बांगला देशने स्वातंत्र्याची मुहुर्तमेढ रोवल्यामुळे स्वातंत्र्यासाठी चळवळ करणाऱ्या पाकिस्तानातील इतर प्रांतांकडे अलम दुनियेचे लक्ष वेधले गेले आहे. सिंध हा यांपैकी आघाडीवरील प्रांत.

सिंधी भाषा, संस्कृती, सिंधचे स्वतत्र अस्तित्व, राजकीय व आर्थिक अधिकार मिळविण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सिंधमध्ये संघर्ष सुरू आहे.

'जिये सिंध' (जय सिंध) नावाने चाललेल्या या आंदोलनाला तशी उणीपुरी चार पाच वर्षेच झाली आहेत तरीही या आंदोलनाने सिंधमध्ये चांगलाच आकार घेतला आहे. का आणि कसा ?......

......साल १९६७. ४ मार्चचा दिवस. हैद्राबाद (सिंध) येथील जामशोसे हे सिंधुनदीच्या किनाऱ्यावरील ठिकाण. सिंध विद्यापीठाचे हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनी प्रचंड निदर्शने करण्यासाठी तेथे जमले होते. त्यांच्या विद्यापीठाच्या उपकुलगुरूंकडून सक्तीनं राजीनामा लिहून घेण्यात आला होता. याला विरोध करण्यासाठीच ही निदर्शने होती. विद्यार्थी उच्चरवाने निरनिराळ्या घोषणा देत होते. पण तरीही सारा आसमंत भरून गेला होता तो 'जिये सिंध' या घोषणेने. विद्यापीठाच्या कारभारात हस्तक्षेप करणाऱ्या पाकच्या हुकुमशाही सत्ताधीशांचा निषेध करणाऱ्या या विद्यार्थ्यांचे स्वागत लाठ्या, गोळ्या आणि तुरुंगवास यांनी झाले. येत्या मार्च-मध्ये या घटनेला पाच वर्षे पूर्ण होतील. घटना तशी छोटी पण तेव्हापासून 'जिये सिंध' चळवळीचा जोर दिवसेंदिवस वाढतच आहे. खरे बोलायचे तर या चळवळीचे बीज २५ वर्षांपूर्वीच पेरले गेले होते. पाकिस्तानच्या निर्मितीबरोबर भारतातील

ए. जे. उत्तम

उत्तर प्रदेश, पंजाब व इतर प्रांतातील मुस्लीम निर्वासित मोठ्या संख्येने सिंध प्रांतात गेले आणि त्यांनी तेथील हिंदूंना घालवून देण्यास व त्यांच्या जमिनी, घरे, स्थावर मालमत्ता व नोकऱ्या बळकावण्यास सुरुवात केली. सिंधमधील हिंदू हे तसे सधन होते. त्यावेळच्या सिंधच्या ४१ ते ४२ लाख लोकसंख्येपैकी सुमारे १२ ते २४ लाख हिंदू होते. फाळणीनंतर त्यापैकी १० ते ११लाख हिंदू निर्वासित होऊन भारतात आले. सिंध प्रांताची आजची लोकसंख्या साधारणपणे कोटीच्या घरात आहे आणि त्यांपैकी सुमारे ७० ते ७२ लाख हे सिंधी भाषिक आहेत. भारतात सर्वसाधारणपणे २२ लाख सिंधी आहेत.

भारतातून सिंधमध्ये गेलेल्या निर्वासितांनी, सिंधी मुसलमानांवर इस्लामचा घोष करून अशी काही भुरळ घातली की ते या निर्वासितांबद्दल मोठा आदर बाळगू लागले. पण हळूहळू याच निर्वासितांनी, सर्वस्व मागे टाकून गेलेल्या हिंदू सिंध्यांच्या घरादारांबरोबरच सिंधी मुस्लीमांच्या जमिनीही बळकावण्यास सुरुवात केली. थोड्याच कालावधीत सिंधी मुसलमान शेतकरी भूमिहीन झाले.

आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातच फक्त सिंध्यांना मागे सारण्याचे प्रयत्न या असिंधी मुसलमानांनी केले असे नाही तर सिंधच्या सांस्कृतिक जीवनातही त्यांची घूसखोरी चालू राहिली. इस्लामी संस्कृतीच्या नावाखाली सिंधी भाषा, वाङ्मय आणि संस्कृती उखडून टाकण्याचा त्यांच्याकडून प्रयत्न चालू झाला. या सर्व गोष्टींना विरोध होणे आवश्यकच होते आणि तसा तो झालाही.

फाळणीच्या काळातच काही प्रतिथयश प्रागतिक सिंधी साहित्यिकांनी 'सिंध्यांसाठी सिंध' ची घोषणा केली होती. 'नयी दुनिया' (आता हे मासिक भारतातून प्रकाशित होते.) या सिंधी मासिकाने सत्तेचाळीस सालच्या ऑगस्टच्या अंकातील संपादकीयात यासंबंधी लिहिताना म्हटले होते, "सिंधमध्ये एक नवी घोषणा दुमदुमू लागली आहे, सिंध्यांना स्वयंनिर्णयाचा अधिकार नसल्याने बिगरसिंधी व पंजाबी लोक सिंध्यांच्या जमिनी, नोकऱ्या व राजकारण यात वर्चस्व गाजवू लागले आहेत." "या सर्वाला प्रतिबंध झालाच पाहिजे." अशीही मागणी संपादकीयात करण्यात आली होती.

जवळ जवळ याच काळात केव्हातरी महान सिंधी कवी शेख मुबारक 'अयाज' यांनी 'जय हिन्द'च्या धर्तीवर 'जय सिंध'ची घोषणा केली. सर्वप्रथम ही घोषणा फाळणीनंतर त्यांनी 'पांडेसरी' ही जी कथा लिहिली त्यात होती. 'जय सिंध' आणि 'सिंध्यांसाठी सिंध' या दोन्ही घोषणांकडे पाक सरकारने दुर्लक्षच केले. सिंधमधील सिंधी लोकांना पुढे येण्यास प्रोत्साहन देण्याऐवजी कराची सिंधचे लाडके शहर सिंधपासून वेगळे करण्यात येऊन ते केंद्रशासित केले गेले. याला विरोध केल्याबद्दल सिंधच्या मुख्यमंत्र्यांना अर्धचंद्र देण्यात आला. बरं याची नुकसान भरपाई तरी सिंधला मिळाली का? त्याचे तर नावच नको. पण सिंधकडून ३०

कोटी रुपयांची रोकड आणि ५० कोटी रुपयांची इतर मालमत्ता वळकावण्यात आली. एवढेच नाही तर कराची वरील सिंधी भाषा व संस्कृतिचा प्रभाव कमी करण्यासाठी सिंध विद्यापीठ कराचीतून हलविण्यात आले.सिंधी शाळा बंद करण्यात आल्या आणि नव्या सिंधी विद्यापीठात सिंधी भाषेच्या शिक्षणाची काही व्यवस्था करण्यात आली नाही.

सिंधी भाषा आणि संस्कृती यांवर हा जबर आघात होता. ही खोल जखम भरून येण्याचे दूरच राहो पण ११ डिसेंबर १९५४ रोजी वायव्य-सरहद्द प्रांत, बलुचिस्तान, पंजाब व सिंध हे सर्व प्रांत एक करण्यात येऊन, त्यांचे पश्चिम पाकिस्तानमध्ये रूपांतर करण्यात आले. सिंधवर झालेली ही दुसरी गहिरी जखम! नव्या व्यवस्थेनुसार सिंधचा नकाशा दाखविणे व पत्त्यावर सिंधचा नामनिर्देष करणे गुन्हा ठरविण्यात आले. सिंधमधील झाडून सारे रस्ते, स्टेशने, कचेऱ्यांवरील सिंधी भाषेतील नामफलक काढून टाकण्यात आले आणि त्यांची जागा उर्दू नामफलकांनी घेतली. यातून ऐतिहासिक नावेही सुटू शकली नाहीत. शिवाय त्यांचे सिंधी उच्चारण बाद ठरविण्यात येऊन ते उर्दू करण्यात आले. सिंधी भाषेची गळचेपीच करण्यात आली. शिक्षणात उर्दू भाषा सक्तीची झाल्यामुळे सिंधमधील शाळा, ग्रंथालये, विश्वविद्यालये आणि कचेऱ्यांतून सिंधी भाषाच जणू निर्वासित झाली. काही सिंधी प्रकाशने व वर्तमानपत्रेही बंद करण्यात आली.

सिंध विधानसभेत चार प्रांतांचे 'एक युनिट' करायला मान्यता देणारा ठराव मांडण्यात आला पण सहजासहजी तो मंजूर होऊ शकला नाही. सिंधचे पीरजादा अब्दुल सत्तार मंत्रिमंडळ यासाठीच बरखास्त करण्यात येऊन त्या जागी खुर्रो (सिंधी उच्चार खुहिडो आहे.) यांची स्थापना करण्यात आली. यातला मजेदार प्रकार म्हणजे श्री. खुर्रो यांच्याविरुद्ध एक फौजदारी खटला चालू असतानाही त्याची सिंधचे मुख्यमंत्री म्हणून नेमणूक झाली. मुख्यमंत्रीपदावर आरूढ होताच त्यांनी जुलुम-जबरदस्तीला सुरुवात केली. सैन्य व पोलीस दल या दडपशाहीत त्यांना मदत करीत होते. केवळ यामुळेच सिंध-विधान सभेंत पश्चिम पाकिस्तानचे 'एक युनिट' बनविण्याचा प्रस्ताव मंजूर होऊ शकला. ज्यांनी ठरावाला विरोध केला त्यांना तुरुंगाची हवा खाण्यासाठी पाठविण्यात आले. शेख मुजिबुर रेहमान यांनीही श्री. खुर्रो यांच्या दडपशाहीला व 'एक युनिट' प्रस्तावाला कसून विरोध केला होता.

१९४७ ते ५४ या काळात सिंधमध्ये अकरा मंत्रिमंडळे येऊन गेली व पाच राज्यपाल अधिकारावर आले त्यांपैकी फक्त एकच राज्यपाल सिंधी होते. पश्चिम पाकिस्तानच्या 'एक युनिट' प्रयोगातील १५ वर्षांच्या अवधीत एकाही सिंधी व्यक्तीची कमिशनर, इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस किंवा इतर तत्सम बड्या जागेवर नेमणूक झाली नाही. मुहम्मद व गिद्दू या सिंध प्रांतातच बांधण्यात

आलेल्या दोन धरणांचे प्रकल्प-व्यवस्थापक म्हणूनही एकाही सिंधी माणसाला संधी देण्यात आली नाही. एवढेच काय पण हैद्राबाद (सिंध)च्या रेडियो केंद्राचे विभागीय केंद्राधिकारी म्हणूनही सिंधी माणसाची नेमणूक करण्यात आली नाही. अभावनेच काही जागांवर सिंधी भाषिक व्यक्ती होत्या. याचेच उत्तम उदाहरण म्हणजे या काळात सिंधच्या दहा सरकारी विश्वविद्यालयात ६४ प्राचार्य झाले. त्यांत फक्त दोघेच सिंधीभाषिक होते. आर्थिक शोषणही जबरदस्त होते. पश्चिम पाकिस्तानच्या एकूण आयातीपैकी ८० टक्के फक्त एकटया पंजाबच्या वाटयास येत असे.

श्री. शेख अयाज यांनी सिंधच्या दुर्दशेचे मार्मिक वर्णन एका छोटया कवितेत केलं आहे :—

देशी हो गये परदेशी
परदेशी बन गये देशी
आय घरमें अनजाने
निकल गये जो थे नेही
गैर आये घुसकर
और हड़प गये सिंधडी !

श्री. अयाज यांनी येथे 'नेही' हा शब्दप्रयोग केला आहे तो सिंध प्रांतातून निर्वासित म्हणून भारतात गेलल्या हिंदू-सिंध्यांच्या संदर्भात आहे.

'एक युनिट'च्या दोन परस्पर विरोधी प्रतिक्रिया झाल्या. एक म्हणजे सरकार-कडून भाषा व संस्कृतीचा प्रभाव जास्तीत जास्त लवकर कमीकमी करण्याच्या कारवाया सुरू झाल्या तर जनतेच्या मनात सिंधी भाषा, संस्कृती, साहित्य या बाबतचे प्रेम पुन्हा जागृत झाले, यातूनच सिंधमध्ये 'एक युनिट' विरोधी जन-आंदोलनाने आकार घ्यायला सुरुवात केली. या आंदोलनाचे अध्वर्यू नामांकित सिंधी मुसलमान साहित्यिक होत.

फाळणीमुळे सिंधच्या सांस्कृतिक जीवनावर जबरदस्त आघात झाला होता. तेथील हिंदू साहित्यिक, प्रकाशक, शिक्षणशास्त्रज्ञ वगैरे विद्वान भारतात गेल्यामुळे सिंधी साहित्यात शिथिलता आली होती, पोकळी निर्माण झाली होती. 'एक युनिट' मुळे ही परिस्थिती बदलू लागली. त्याचवेळी 'महिराण' (सिंधू नदी) या सिंधी त्रैमासिकाचा जन्म झाला. सिंधी भाषेतील विख्यात साहित्यिक विद्वान श्री. इब्राहीम जोयो हे त्यामागचा प्रेरणा होते. फाळणीच्या काहीकाळ अगोदरच श्री. जोयो यांनी 'सेव्ह सिंध, सेव्ह कॉन्टिनंट' या नावाचे पुस्तक लिहिले होते. याच पुस्तकात त्यांनी 'सिंध्यांसाठी सिंध'च्या घोषणेचा प्रामुख्याने उल्लेख केला होता.

श्री. जोयो यांना मांडलेल्या स्पष्ट विचारांमुळे त्यांना अनेक अडचणींना तोड द्यावे लागले. पण 'महिराण'ने सिंधी भाषा, साहित्य-संस्कृती, समृद्ध करण्याच्या

दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. अनेक साहित्यिकांना त्यामुळे प्रोत्साहन मिळाले. ' महिराण ' अजूनही प्रकाशित होते.

यानंतर सिंधमधून प्रकाशित होणाऱ्या ' वतन ' ' आवाजे-सिंध ' वगैरे साप्ताहिकातूनही ' एक युनिट 'च्या विरोधात लिहिल्या जाणाऱ्या रचनांना प्रसिद्धी मिळू लागली. ' एक युनिट 'चा पाठपुरावा व तरफदारी करणाऱ्यांचा या साप्तहिकातून खरपूस समाचार घेण्यात येत असे. असाच समाचार घेताना सिंधीभाषी कवी श्री. अब्बन हयात पंव्हर यांनी एक कवन लिहिले. –

– ऐ सिंध के सौदागर, तुमपर हजारो–लाखो लानतें, तुमने जिल्लतका व्यापार किया है. सिकंदर, मुहम्मद बिन कासिम, अहमदशाह अब्दाली आये और चले गये लेकिन सिंध सदा जीवित रहा है और जीवित रहेगा.'

तर दुसऱ्या एका कवितेत तथाकथित ' सिंधी ' नेत्यांना सुनावले –

' सिंध को सिंधियों के हाथ से निकालकर सुख से कैसे बैठोंगे,
मिनिस्टर बनकर भी पंजाबीयों के जूते सिरपर सरपर सहोंगे,
न अपनों मे न गैरों मे ही तुम इज्जत पाओंगे,
डरे हुअे गीदड़ से तुम अपने साये से भी घबराओंगे.

सिंधी कवीच नाहीत तर कथाकारांनीही ' एक युनिट 'वर कथा लिहून या प्रयोगाची टर उडविली. यातील जमाल रिंद यांची ' रेतके महल ' ही उल्लेखनीय कथा आहे. वाळूच्या किल्ल्याप्रयाणे ' एक युनिट ' असलेले पश्चिम पाकिस्तानही एक दिवस ढासळेल अशी भविष्यवाणीही त्यात उच्चारण्यात आली होती.

सिंधी संस्कृती नष्ट करण्याचे प्रयत्न करणाऱ्या पाकिस्तानी सत्ताधीशांविरोधी जन-आंदोलन उग्र होत चालले होते आणि मातृभाषेच्या प्रेमाला उमाळा येत होता. यातूनच सिंध सोडून भारतात गेलेल्या हिंदूंबद्दलची आत्मीयतेची नवी भावना मूळ धरू लागली. ' जिये सिंध ' चळवळीचे नेते श्री. गुलाम मुर्तजा सैयद यांनी या दृष्टीने महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. धर्मनिरपेक्षतेवर त्यांनी भर दिला. ' नये सिंधके लिये संघर्ष ' या पुस्तकात त्यानी लिहिले ' हिंदू भारतात गल्याने सिंधची इतकी प्रचंड हानी झाली आहे, की ती अनेक वर्षे भरून येणे शक्य नाही. श्रेष्ठ वैज्ञानिक, डॉक्टर्स, इंजिनियर्स, प्राध्यापक, व्यापारी, सिंधी साहित्यिक आदी विद्वानांना आपण गमावून बसलो आहोत. त्यामुळे अनेक व्यवसाय, उद्योगधंदे, शाळा, कॉलेजे, धर्मशाळा उजाड झाल्या आहेत. त्यांच्या जाण्याने सिंध सुनासुना झाला आहे. आम्ही त्यांना विसरणार नाही... कदाचित, कदाचित एक दिवस असा उजाडेल की ते सारे आपापल्या घरी परत येतील ' त्यांनी आपल्या पुस्तकात अगदी स्पष्टपणे नमूद केले, की सिंधी हिंदू व मुसलमान हे पाकिस्तानपेक्षा वेगळे आहेत. त्यांची भाषा, संस्कृती, साहित्य, परंपरा, समस्या आणि आकांक्षा एक आहेत. (सिंध) बाहेरून आलेल्या शासकीय वर्गाच्या आधीन होण्यानेच सिंध देशचा विनाश ओढवेल. याच

संदर्भात इस्लाम व पाकिस्तान धोक्यात आहे अशा प्रकारच्या घोषणा करणे म्हणजे शुद्ध पाखंडीपणा आहे असेही ते म्हणत.

श्री. सैयद यांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांत अनेक हिंदू संत, साहित्यिक, नेते यांचा नुसता उल्लेखच केला आहे असे नव्हे तर त्यांनी मोकळेपणे त्यांची तारीफही केली आहे.

'आधुनिक राजनीती के नवरत्न' या त्यांच्या पुस्तकात त्यांनी गांधीजी, नेहरू, सरदार पटेल, मौलाना आजाद, जिना आदींवर लिहिले आहे. यात काही व्यक्तींची तुलनाही केली आहे. उदा. मौलाना आजाद आणि मोहंमदअली जिना यांच्या राजनीतीची तुलना करताना ते लिहितात, "मुहंमदअली जिना यांनी भारतीय मुसलमानांना दाखवलेली दिशा व मौलाना आजाद यांनी दाखवलेली दिशा यांत योग्य कोणती या विवाद्य मुद्द्याचा फैसला इतिहासालाच करावा लागणार आहे. अनन्यसाधारण व्यक्तिमत्वे असलेले हे दोघेही आपापल्या लोकांच्या प्रति प्रामाणिक होते. मात्र जिना यशस्वी झाले आणि मौलाना आजाद अयशस्वी ठरले.दयनीय अपयशात त्यांचा मृत्यू झाला. भावी इतिहासकार यापैकी यशस्वी व्यक्तीचे कौतुक करतात की अयशस्वी व्यक्तीच्या प्रति सहानुभूती दाखवितात ते आता पाहायचे."

त्यांनी गांधींबद्दल लिहिले, 'दुनिया के मुख्य पैगंबरों के भी इनकी जिन्दगीमें इतने सूखीर अनुयायी नही हुए थे जितने इस कमजोर साधुपुरुष और राजनैतिक नेता के हुए...'

आयुबखानाच्या हुकूमशाही राजवटीला सैयदसाहेबांच्या पुस्तकातील वरील विधाने मान्य होणे शक्य नव्हते; म्हणून त्यांचे हे पुस्तक जप्त करण्यात आले आणि त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले. राजवटीचे असेही म्हणणे होते की पुस्तकात एके ठिकाणी गांधीजींची अशी काही प्रशंसा करण्यात आली होती, की जी पाकिस्तानच्या संदर्भात अनुचित होती.

श्री. सैयद यांच्यावरील खटलां चालविण्यासाठी ६८ साली पश्चिम पाकिस्तानच्या उच्च न्यायालयाच्या संपूर्ण बेंचची नेमणूक झाली. शासनाचा आदेश मानून बेंचने त्यांचे पुस्तक जप्त करण्याची आणि त्यांना तीन वर्षे कैदेची शिक्षा सुनावली. याही परिस्थितीत जी. एम्. सैयद आपल्या भूमिकेबद्दल ठाम राहिले.

'जिये सिंध' चळवळीचे दुसरे एक अध्वर्यू हैदरबक्ष जनोई यांनी १९५५ साली 'हारी हकदार' या प्रकाशनाचा हुतात्मा विशेषांक काढला आणि त्यात लोक गायक कंवर राम, राष्ट्रीय नेते हासाराम पमनाणी, (या दोघांचा जातीय मुसलमानांनी खून केला होता.) ४२ च्या साम्राज्यविरोधी आंदोलनात मातृभूमीसाठी हसत हसत फासावर गेलेला वीर हेमू कालाणी, मृत्युशैयेवर असूनही सायमन कमिशनविरोधी मतदानासाठी सेंट्रल असेंब्लीत गेलेले आणि १६ फेब्रुवारी २८ रोजी इंग्रजांविरुद्ध मतदान करताना प्राण सोडलेले सेठ हरचंदराय यांच्यावर खास लेख

प्रकाशित केले. त्यांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली होती. फाळणीनंतर प्रथमच सिंधच्या हिंदू हुतात्म्यांचे स्मरण केले गेले होते. आता या सर्वांचे स्मरण सिंधी जनतेच्या मनात कायम कोरले गेले आहे.

शेख अयाज हे या चळवळीचे तिसरे महत्त्वाचे नेते. सिंध सोडून भारतात गेलेल्या का कविमित्राची कविता वाचून त्यांनी लिहिले 'केवल मर्ग (म्हणजे तो कविमित्र) रेत के लिये नही तडपता है, पर रेत भी (म्हणजे स्वत: शेख अयाजसाहेब सारखे इतर सिंधी लोकसुद्धा) मर्ग के लिये तडपती है, यह पारस्परिक तडप एक ऐसा दिल कंपा देनेवाला सवाल है, जो इतिहास के कानों में गुंजता रहेगा और इतिहास निरुत्तर को कयामत तक अपना सिर शर्म से झुकाये रहेगा।'

**'एक युनिट' व्यवस्थेला विरोध, सिंधी भाषा व संस्कृतीवद्दलचे प्रेम आणि हिंदूची आठवण या तीन गोष्टी या चळवळीच्या प्रेरणा बनल्या.** या प्रेरणाच हळूहळू जोर धरू लागून १९५७ साली पश्चिम पाकच्या विधानसभेत 'एक युनिट' बरखास्त करण्याचा ठराव मंजूर झाला आणि राष्ट्रीय असेंब्लीला या दिशेने पावले टाका अशी शिफारस करण्यात आली. पण त्याची अंमलबजावणी होण्यापूर्वीच १९५८ साली पाकिस्तानात लष्करी कायद्याचा अंमल सुरू झाला.

लष्करी कायद्याच्या अंमलामुळे 'जिये सिंध' चळवळ थोडी थंडावली पण हळूहळू पुन्हा चळवळ जोर करू लागली.

१९६३ साली सिंधी साहित्यिक शेख अयाज व श्री. रशिद भट्टी हे भारतातील सिंधी साहित्यिकांना भेटावयास आले तर ६४ साली भारतातून श्री. व सौ. उत्तम हे साहित्यिक दांपत्य सिंधच्या दौऱ्यावर गेले. जी. एम्. सैयद, अयाज, जनोई, भट्टी, जोयो बेगम, चन्ना आदी सिंधी साहित्यिकांशी त्यांच्या भेटीगाठी झाल्या. कराची, सक्खर, शिकारपूर, लाड्खाना, मोहन-जो-दडो, हैद्राबाद (सिंध) या शहरांना त्यांनी भेटी दिल्या. कराचीत त्यावेळी जिनांच्या कबरीवर इमारत उभारण्यात येत होती. सुरक्षिततेसाठी तेथे पहारेकरी होता. कारण सिंधमधील अनेक लोक जिनांच्या विरुद्ध होते. हैद्राबाद (सिंध)च्या किल्ल्यात, इंग्रजांशी निकराने लढलेल्या होश मुहंमद यांची कबर आहे. त्यालाही त्यांनी भेट दिली. आज होश मुहंमद हा सिंधचा राष्ट्रीय नायक म्हणून गणला जातो.

या दोन्ही सदिच्छा भेटींमुळे दोन्ही देशांतील सिंधी भाषिकांच्या दृष्टीने साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात एक नवी गती प्राप्त झाली. ६५ साली पाकने भारतावर युद्ध लादले नसते तर अशा अनेक सदिच्छा भेटींचा योग येता. एवढे मात्र खास की 'जिये सिंध' आंदोलनाच्या प्रभावामुळे बऱ्याचश्या सिंधी साहित्यिकांनी भारतविरोधी द्वेषाची मोहिम उभारली नाही. शेख अयाज यांनी तर भारतातील सिंधी कवी श्री. नारायण श्याम यांना उद्देशून एक कविता लिहिली. त्या कवितेत ते लिहितात –

'मैं अपने हिंदुस्थानी भाईपर गोली कैसे चलाऊ ?'

या 'अपराधा'बद्दल त्यांची पुस्तके जप्त करण्यात आली व त्यांना तुरुंगाचा रस्ता दाखविण्यात आला. काही जातीयवादी जहालांनी तर त्यांना फासावर लटकविण्यात यावे अशीच मागणी केली. पण 'जिये सिंध' आंदोलनाच्याच प्रभावामुळे असं करण्याची हिंमत पाकच्या लष्करशहांना झाली नाही. सिंधी काव्याला लाभलेले शेख अयाजसारखे रत्न फासावर जावं असं जाणकार सिंधी भाषिकाला कसे रुचावे?

याच संदर्भात आणखी एक गोष्ट सांगणे जरुरीचे आहे. ६६ साली भारतात सिंधी भाषेला मान्यता देण्याची घोषणा झाली. या घोषणेचे मनमोकळे स्वागत भारताबरोबरच सिंधमध्येही झाले. ज्यावेळी ६७ साली मार्चमध्ये भारतीय संसदेत सिंधी भाषेला मान्यता देण्याबाबतच्या विधेयकावर विचार चालू होता त्यावेळी 'जीये सिंध' आंदोलन सामान्यजनातही भिनले होते आणि पाकिस्तानी लष्करशहांशी ते टक्कर देत होते. आता ते आंदोलन साहित्यिकांपुरतेच राहिलेले नव्हते. विद्यार्थ्यांची विराट शक्तीही त्यांच्या मागे होती. अनेक विद्यार्थी आंदोलनांत पोलिसांच्या बेछूट गोळीबाराला बळी पडले, त्यांनी हौतात्म्य पत्करले. अनेक जण जखमी झाले. ५०० पेक्षा अधिक विद्यार्थी एकटया जामशोरोंत पकडले गेले. पकडल्या गेलेल्या विद्यार्थ्यांवर खटले न चालविता त्यांची नंतर सुटका करण्यात आली. आंदोलनाच्या ताकदीचेच हे प्रतीक होते. (गेल्या काही दिवसांत, ढाक्का येथील हुतात्मा स्मारकाप्रमाणेच जामशोरों येथेही शहीद मिनार उभारले जावे अशी सिंधमध्ये जोरदार मागणी होऊ लागली आहे.)

पाकिस्तानच्या लष्करी राजवटीविरुद्ध विद्यार्थी टक्कर देतच होते. लढ्याबरोबरच हैदरबक्ष जतोई यांनी सिंधला दिलेली 'जिये सिंध'ची घोषणाही घराघरांतून निनादू लागली. अरबी पद्धतीच्या 'सलाम', 'सलाम आले कुम' ह्या धर्माधिष्ठित स्वागत पद्धतीऐवजी सिंधी भाषिक 'जिये सिंध, सदा जिये सिंधी' या पद्धतीने स्वागत करू लागले.

आंदोलनाच्या काळातच श्री. जतोई यांची 'जिये सिंध' ही कविता हळूहळू 'सिंध राष्ट्रा'ची प्यारी कविता गणली जाऊ लागली. या कवितेचीही एक मजेदार गोष्ट आहे. कवितेत 'जिये सिंध जिये हिंद' अशी एक ओळ आहे. शेख अयाज यांच्याशिवाय पाकिस्तानमध्ये अशा प्रकारची कविता करण्याचे कोणी धाडस दाखवू शकला नसता.

श्री. जतोई यांची ही कविता सिंधमधील कोणत्याही मासिकाने छापण्याची हिम्मत दाखवली नाही. ही कविता सर्व प्रथम मुंबईतून प्रकाशित होणाऱ्या 'नयी दुनिया' या मासिकाच्या जून ६७ च्या अंकात प्रसिद्ध झाली. दुसरी अशीच कविता लिहिल्याबद्दल श्री. जतोई यांच्याकडून सरकारने २० हजार रुपयांचा जामीन मागितला. पण तो स्पष्टपणे नाकारून त्यांनी तुरुंगवास पत्करला. पाक तुरुंगातील अत्याचाराचा त्यांच्यावर परिणाम होऊन त्यांची प्रकृती ढासळली आणि

त्यांचे ७० साली निधन झाले. पण त्यापूर्वी 'एक युनिट' तोडण्याची घोषणा झाली होती. ती ऐकण्याचे भाग्य त्यांना लाभले.

४ मार्च ६७ सालची घटना सिंधच्या जीवनातील एक महान पर्व ठरली. सिंधी साहित्यिकांनी या विषयावर इतक्या कथा, कादंबऱ्या, कविता, निबंध वगैरे लिहिले की दुसऱ्या इतर कोणत्याही विषयावर एवढे लिखाण आजपर्यंत झाले नाही. हमीद सिंधी यांच्या 'रूह रिहाण' या मासिकावर या प्रकारचे साहित्य प्रकाशित केल्याच्या कारणांमुळे बंदी घातली गेली. पण हे काम पुढे चालू ठेवण्यासाठी 'सुहिणी' 'अगते कदम' 'सुबह सिंध' 'सच' आदी प्रकाशने पुढे आली.

४ मार्च ६७ पासून आंदोलनाचे स्वरूपच बदलून गेले. 'एक युनिट' मोडून टाकणे एवढेच आंदोलनाचे उद्दिष्ट न रहाता एका नव्या राष्ट्रासाठी स्वयंनिर्णयाचा हक्क मागणारे हे आंदोलन असेही ठरू लागले. सिंधचे बुद्धिवादी, प्राचीन भारतीय साहित्य, वेद यामध्ये आलेल्या सिंधु नदीच्या व सिंध देशच्या वर्णनाचे आदरपूर्वक स्मरण करू लागले. एका राष्ट्राच्या स्वरूपातच स्वतःची वेगळी भाषा, साहित्य, संस्कृतीचा वारसा विराजमान होऊ शकतो. मोहन जो दडो व राजा दाहर (सिंधी उच्चार डाहर) यांना मानाचे स्थान प्राप्त करून देऊ शकतो.

मोहन जो दडो येथील पुढारलेल्या नागरी जीवनाचे खरेखुरे वारस म्हणजे आपण सिंधचे लोकच, राजा दाहर हा आपला राष्ट्रीय नायक असून मुहंमद बिन कासिम हा आक्रमक होता. असे आंदोलनाचे नेते स्पष्टपणे म्हणू लागले. राजा दाहरची जयंती प्रतिवर्षी सिंधमध्ये साजरी होऊ लागली. त्यावर बंदी घातली जावी अशी आरडाओरड उर्दू वर्तमानपत्रे करू लागली. पण आंदोलनचा जोर आता फारच पुढे गेला होता. अशा आरडाओरडीने, दडपणाने वा दडपशाहीने हे सारे बंद होण्याइतके का तकलादू असते ? म्हणूनच तर हैद्राबाद (सिंध) येथील सरकारी कॉलेजातील इंटर सायन्सच्या वर्गात शिकत असलेली एक विद्यार्थिनी यास्मिन सिंधी, कराचीहून प्रकाशित होणाऱ्या 'बानो' या उर्दू साप्ताहिकात ठणकावून लिहू शकली— 'सिंध की अजमत (महानता) मोहन जो दडो के कारण है...हम लडकियोंने फैसला किया है की अपने बच्चोंके नाम राजा दाहर और हेमू कालाणी रखेंगे ..'

यास्मिनसारख्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची संख्या सिंधमध्ये दिवसेंदिवस वाढते आहे. मोठ्या संख्येत ते 'जिये सिंध' आंदोलनात भाग घेत आहेत. सामुदाईक उपोषणे करीत आहेत. 'एक युनिट'च्या विरोधी आणि मतदारांच्या याद्या सिंधी भाषेत छापल्या जाव्यात या मागणीसाठी उपोषण सत्याग्रहाचा मार्ग सहारा मारूई, रियाज मेमन आणि आक्रम सुलताना यांनी जाहीरपणे पत्करला आणि त्यालाही यश मिळविले.

'जिये सिंध' आंदोलनामुळे तुरुंगात जाणाऱ्या महिलांशी, पाकचे अधिकारी खुनी, रानटी, लुटारूंप्रमाणे वागतात. अनेक विद्यार्थिनींनी याचा कटु अनुभव

घेतला. १४ फेब्रुवारी ७१ रोजी हद्राबाद (सिंध) येथील सिंधी भाषा संमेलनात बोलताना कुमारी अख्तर बलोच म्हणाली, 'आमच्यासारख्या मुलींशी पोलीस खुनी व लुटारूंप्रमाणे वागले. आमच्या कमरेला दोरखंड बांधण्यात आले आणि अनेक प्रकारे आम्हाला छळण्यात आले...यावेळी आपल्या पुढे आपला देश, राष्ट्र आणि भाषा यांचे रक्षण करण्याचा मोठा प्रश्न आहे. आपली दुकाने, घरे मालमत्ता जाळण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या पुस्तकांची होळी करून त्यांना, कारकुनांना, शेतकऱ्यांना मारहाण करण्यात आली आहे. गोळ्या घातल्या गेल्या आहेत, चाबकाने फोडण्यात आले आहे...पण मातृभूमीसाठी गोळ्या झेलण्याचीही आमची तयारी आहे.'

मध्यंतरी सिंधच्या राज्यपालांनी सहा महिन्यात आपण सिंधी भाषा शिकणार असल्याची घोषणा केली. कराची विद्यापीठात सिंधी भाषेचा अभ्यास करण्याची व्यवस्था करण्यात आली. त्या विद्यापीठाचा कारभार सिंधीतून सुरू झाला पण हैद्राबाद (सिंध)च्या त्या संमेलनामधील बातम्यांवरून असं दिसतं की 'एक युनिट'ची व्यवस्था नाहीशी होण्यानेही सिंधी भाषेवरील संकट दूर झाले नाही. संमेलनात ४१ मागण्या सादर करण्यात आल्या आणि सिंधी जनता आपले अधिकार प्राप्त करून घेतल्याशिवाय आता स्वस्थ बसणार नाही अशी घोषणा करण्यात आली.

बांगला देशात पाकिस्तानने केलेल्या अत्याचारांचा परिणाम होऊन, सिंधु देशातही स्वातंत्र्य आणि स्वयंनिणयाची जोरदार मागणी होऊ लागली आहे. 'जिये सिंध' आंदोलनाचे नेते श्री. जी. एम्. सैयद व शेख अयाज यांना नजरकैदेत ठेवण्यात आले आहे. अवामी लीगच्या सक्खर शाखेचे चिटणीस श्री. रशीद भट्टी यांना तीन वर्षांची कैदेची शिक्षा सुनावण्यात आली.

पाकचे लष्करशहा अशा सर्व लोकांना व संघटनांना जेरीस आणण्याचे, नष्ट करण्याचे प्रयत्न करीत आहेत. या जुलूम जबरदस्तीमुळे विद्यार्थी व कामगारसंघटनांना काम करणे मुश्किल होऊ लागले आहे.

ज्याप्रमाणे बांगला देशमध्ये राजकारणी तसेच बुद्धिवादी लोकांवर पाक लष्करशहांनी अत्याचार व जुलूम केले तसेच ते सिंधी राजकारणी व बुद्धिवादी यांच्यावरही करीत आहेत.

जुलूम-जबरदस्ती व अत्याचार यांवर विश्वास ठेवणाऱ्या पाक सत्ताधाऱ्यांचे अजूनही डोळे उघडलेले नाहीत.

बांगला देशापासून त्यांनी अजून योग्य तो धडा घेतला नाही. काही विचारांनी प्रेरित झालेली जनशक्ती पुढेच जात असते. ती दुबळी जात नसते हे ते अजून समजू शकले नाहीत.

सिंधुदेशातही स्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्षतेची ज्योत आता प्रज्वलित झाली आहे. सैय्यद, अयाज, जतोई यांच्या क्रांतिकारक विचारांनी प्रेरित झालेली सिंधची जनता शेवटी स्वातंत्र्याची आकांक्षा पूर्ण केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. □

# जिये सिंध आंदोलनाच्या प्रेरक शक्ती

## सैय्यद, जतोई आणि अयाज

श्री. जी. एम. सैयद, पैगबरवासी हैदरबक्ष जतोई आणि श्रो. अयाज या तीन व्यक्तींनी 'जिये सिंध' चळवळीचे नेतृत्व केले. या चळवळीतील राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अंगांचे त्यांनी अलगपणे व संयुक्तपणेही नेतृत्व केले. तिन्ही नेत्यांचा हा थोडक्यात परिचय.

### गुलाम मुर्तजा सैयद

यांचे पूर्वज आक्रमकांबरोबर सिंधमध्ये आले. सिंध जिंकण्याऐवजी सिंधनेच त्यांना जिंकले. एवढेच नव्हे तर श्री. सैयद तर प्रत्येक आक्रमकाचा सक्त तिरस्कार करतात. सिंधच्या हिताआड येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीशी वा गोष्टीशी झुंज द्यायला ते सदैव तयार असतात. मग ती कॉंग्रेस असो वा मुस्लीम लीग नाही तर जिना असोत वा आयुबखान असो.

सिंधच्या दादू जिल्ह्यातील सन या गावी १९०४ साली त्यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच त्यांना राजकारणात रस वाटत होता. वयाच्या २४ व्या वर्षी ते कराचीचे नगराध्यक्ष झाले.

१९३० साली सैयद कॉंग्रेसचे सदस्य झाले आणि क्रियाशील कार्यकर्ते म्हणून त्यांनी लौकिक मिळवला. पण १९३८ साली काही मतभेद झाले म्हणून ते कॉंग्रेस सोडून मुस्लीम लीगमध्ये गेले. १९४५ साल उलटेपर्यंत ते लीगचे अध्यक्षही होते.

अखिल भारतीय राजकारणाकरिता सिंधच्या हिताच्या गोष्टींचा बळी द्यायला

ए. जे. उत्तम

ते तयार नव्हते तसेच जिनांची हांजी हांजी करायला ते तयार नव्हते. म्हणून त्यांना लीगमधूनही काढून टाकण्यात आले.

लीगमध्ये असताना सैयदसाहेबांनी, जिना-पाकिस्तान आणि मुसलमान यांच्यासाठी जे काही शक्य होते ते सारे केले. हिंदूंच्या विरुद्ध द्वेष पसरवला एवढेच नव्हे तर हिंदूंना यहुदी म्हणायलाही त्यांनी कमी केले नाही. पाकिस्तानच्या निर्मितीबद्दलचा एक प्रस्ताव १९४३ साली सिंध विधान सभेत यांच्यामुळेच मंजूर झाला होता. पाकच्या निर्मितीनंतर त्यांना दहा वर्षेपर्यंत नजर कैदेत व तुरुंगात रहावे लागले. १९६९ साली त्यांची तुरुंगातून सुटका झाली आणि एक्काहत्तरच्या मे महिन्यात त्यांना पुन्हा पकडण्यात आले.

त्यांनी राजकारण व सांस्कृतिक विषयांवर अनेक पुस्तके लिहिली आहेत. 'नये सिंधका संघर्ष' 'आधुनिक सिंधकी राजनीतिक समस्याए' व 'आधुनिक राजनीतीके नवरत्न' ही त्यांची तीन पुस्तके जप्त करण्यात आली आहेत. सिंधच्या सांस्कृतिक परंपरांबद्दल त्यांना अभिमान असून महंमद बिन कासिमला ते आक्रमक मानतात. १० ऑगस्ट १९६९ साली त्यांनी शेख मुजिबना कराचीला बोलावून त्यांना मानपत्रही दिले. निवडणूकीत त्यांनी शेखसाहेबांना पाठिंबा दिला. हल्ली 'युनायटेड फ्रंट'शी त्यांचे संबंध आहेत.

जिनांच्या द्विराष्ट्रवादाला विरोध करून पाकिस्तान हे बंगाल, सिंध, पंजाब, बलुचिस्तान व पख्तुनिस्तान या पाच राष्ट्रांचा संघ असल्याचे ते मानतात हाच त्यांचा मोठा अपराध म्हणूनच त्यांना पुन्हा तुरुंगवास पत्करावा लागला.

या पाच 'राष्ट्रां'ची भाषा, संस्कृती,



शेख अयाज



हैदरबक्ष जतोई

इतिहास व परंपरा वेगवेगळ्या आहेत यावर त्यांचा भर असतो. म्हणूनच त्यांना स्वयंनिर्णयाचा हक्क मिळावा या पक्षाचे ते समर्थक आहेत.

त्यांच्या स्वतःच्या क्रांतिकारी विचारांनुसार ते कोणताही धर्म परिपूर्ण असल्याचे न मानता प्रत्येक धर्मात ग्रहण करण्यायोग्य अनेक गोष्टी आहेत व त्यांचे आचरण केले पाहिजे असे ते समजतात. त्यामुळेच मानवता शांततेने प्रगतीकडे वाटचाल करू शकेल यावर त्यांचा विश्वास आहे व याच पायावर आज ' जिये सिंध 'ची चळवळ चालू आहे.

## ' बाबा–ए–सिंध ' हैदरबक्ष जतोई

हे सिंधचे पहिले कवी. १९४५ साली त्यांनी आपल्या डेप्युटी कलेक्टर पदाचा राजीनामा दिला आणि शेतकरी आंदोलनाचे ते नेते बनले. हैदर या नावाने ते कविता लिहीत तर अर्थकारणावरील लिखाण ते जतोई या नावाने करीत असत.


कॉलेजच्या प्रथम वर्षात असताना त्यांनी ' सिंधु-दरिया ' ही कविता केली. येथूनच त्यांच्या कवी-जीवनाला आरंभ झाला. ही कविता एक श्रेष्ठ व लोकप्रिय कविता म्हणून गणली जाते.

लाड्खाना, मोहन-जो-दडो जवळील भगोदेरो येथे १९०० साली त्यांचा जन्म झाला. २७ साली कराची येथून ते ऑनर्ससह बी. ए. उत्तीर्ण झाले आणि त्यांची एका सरकारी कचेरीत हेड क्लार्क म्हणून नियुक्ती झाली. अंगच्या हुशारीने ते प्रगती करीत डेप्युटी कलेक्टरच्या पदापर्यंत पोचले.

कॉलेजात त्यांनी अनेक कविता केल्या. त्यात धर्मांधतेवर त्यांनी कडाडून हल्ला केला. ' तुहफ-ए-सिंध ' या नावाचा त्यांचा कविता संग्रह १९३० साली प्रकाशित झाला. त्यांच्या कवितेविरुद्ध मुल्ला मौलवींनी काहूर माजविले व त्यांना काफरही म्हटले. ' आजादी-ए-कौम ' हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह. त्यात भारताच्या स्वातंत्र्यावर त्यांनी समाजवादी दृष्टिकोनातून कविता लिहिल्या आहेत.

१९४५ साली त्यांनी ' हारी हकदार हलचल ' (शेतकरी चळवळ) या चळवळीत उडी घेतली. तेव्हापासून त्यांचे काव्य करणे थोडे मागे पडले. ' हारी हकदार ' हे प्रकाशन त्यांनी सुरू केले. १९५८ साली लष्करी प्रशासनाने त्यावर बंदी घातली.

पाकच्या निर्मितीनंतर तुरुंगातील तिसरा वर्ग हेच जणू त्यांचे घर झाले. भाडेकरी कायदा किंवा ' एक युनिट ' किंवा सरकारी धोरणाविरुद्ध लिखाण करण्यामुळे वा ' जिये सिंध ' सारखी कविता केल्यामुळे त्यांना सारखा तुरुंगवास घडत होता. त्यांचे लिखाण प्रसिद्ध करायला कोणी धजावत नसे म्हणून ते स्वतःच ते प्रकाशित करीत असत. त्यांनी सुमारे २५ पुस्तके लिहिली. त्यांनी कुराणावर टीका



जी एम्. सैयद — ए. जे. उत्तम

लिहिली असून तीही छापायला कोणी धजावत नाही म्हणून ती लंडनमध्ये छापली जावी अशी त्यांची इच्छा होती.

शेतकरी आंदोलनामुळे मागे पडलेले त्यांचे काव्य ६७ साली ' जिये सिंध ' चळवळीच्या निमित्ताने पुन्हा बहरले. या विषयावर त्यांनी बऱ्याच रचना केल्या. ' जिये सिंध ' कवितेत तर ' जिये हिंद ' लिहिण्याचीही त्यांनी हिम्मत दाखविली. अशा कविता केल्याबद्दल त्यांच्याकडून सरकारने २० हजार रुपयांचा जामीन मागितला, पण तो साफ नाकारून त्यांनी तुरुंगवास पत्करला.

याचवेळी त्यांनी ' जिये सिंध'ची घोषणा त्या चळवळीला दिली आणि त्यांची शेतकरी चळवळ या कार्यातही सहभागी केली.

६८ च्या डिसेंबरात त्यांना बलुचिस्तानच्या एका तुरुंगात डांबण्यात आले पण तिथेच त्यांची प्रकृती बिघडली आणि ती कधीच सुधारू शकली नाही. २१ मे १९७१ रोजी त्यांचे निधन झाले.

सिंधचे पिता (' बाबा-ए-सिंध) म्हणूनच सिंध त्यांना ओळखतो.

## शेख अयाज

काव्यातून सत्यस्थिती मांडल्याबद्दल अनंत यातना भोगव्या लागणारे भारतीय

उपखंडातील बहुधा ते एकमेव कवी असावेत. यामुळेच ते 'काफिर' झाले. शिव्या-शापाचे धनी झाले. त्यांचे पुतळे जाळण्यात आले आणि त्यांना खुनाच्या धमक्याही देण्यात आल्या. त्यांच्या विरोधी लिखाण करणाऱ्यांनी ही संधी साधून हजारो पाने खर्ची घातली. त्यांच्यावर अनेक खटले लादण्यात आले. तुरुंगात त्यांना तिसरा वर्ग देण्यात येत असे व छळवादाला तर अंत नसे. सिंधच्या अनेक शहरांतून त्यांच्यावर प्रवेशबंदी टाकण्यात आली होती. प्रतिगामी आणि जहालांनी तर त्यांना फासावर लटकवण्यात यावे अशी जोरदार मागणी करायला सुरुवात केली होती. ६५ सालच्या भारत-पाक युद्धाच्या वेळी त्यांनी आपले भारतीय कविमित्र श्री. नारायण श्याम यांना उद्देशून 'मैं तुमपर कैसे बंदूक उठावू ? उसपर कैसे गोली चलावू ?' ही कविता लिहिली. या कवितेने त्यांनी पाक शासनाचा रोष ओढवून घेतला. शेख मुबारक गुलाम हुसेन 'अयाज' यांचा जन्म २८ मार्च १९२३ रोजी सिंधमधील शिकारपूर येथे झाला. ते सिंधतील सक्खर येथे रहातात आणि तेथेच वकिली करतात. ते एक नामांकित वकील आहेत.

वयाच्या आठ-दहा वर्षांपासूनच ते कविता करू लागले. बेचाळीसच्या आंदोलच्या वेळी ते कॉलेजमध्ये शिकत होते. तेव्हापासून त्यांच्या कवि-जीवनाला आरंभ झाला. त्याकाळात त्यांनी लिहिलेल्या कविता व गीते आजही अनेकांच्या कानांत घुमत आहेत. 'ओ बागी भारतमे बल्वे जा बानी' व 'इंकलाब ! इंकलाब !! गाइ इंकलाव !!!' ह्या त्यांच्या रचना प्रत्येक सभा-संमेलनात हमखास गायल्या जात असत. त्याच काळात त्यांनी काही अविस्मरणीय कथाही लिहिल्या.

फाळणीमुळे हिंदूंना सिंधमधून निर्वासित म्हणून बाहेर पडावे लागल्यानंतर सिंधी साहित्याला एक प्रकारची अवकळा आली होती. पश्चिम पाकिस्तानचे 'एक

---

## स्मृती पुराणी

कंवरराम यांची गीते ऐकण्यासाठी हजारो हिंदू-मुसलमान एकत्र येत असत. दुरून दुरून येऊन रात्र रात्र लोक त्यांची गीते ऐकण्यासाठी थांबत असत....'आऊ कांगा कर गाल्ह, मुंखे तिन मारू अडन जी' ही त्यांची 'काफी' आजही कधी काळी रेडियोवर ऐकली की कसलेही काम करीत असलो तरी त्या साऱ्याचा विसर पडून मी त्यात (काफीत) तल्लीन होतो. कोणत्यातरी गहन विचारात मी स्वतःला हरवून बसतो. कितीतरी विचारतरंग मनात येऊन जातात. मन आक्रंदून उठते, जखमा वाहू लागतात...

माझे जन्माचे साथी असलेले ते मित्र. त्यांच्याबरोबर मैत्रीपूर्ण वातावरणात होत असलेली प्रेमळ संभाषणे, त्यांनी मागे सोडलेली मंदिरे, ग्रंथ, चीजवस्तू, या सर्वांची आठवण मला सतावते...आणि मग चक्षूंपुढे आजचा जमाना येतो !'

[ जी. एम्. सैयद ]

---

युनिट' झाल्यानंतर त्याविरुद्ध चळवळ सुरू झाली आणि मग अयाज यांनी पुन्हा एकदा काव्याच्या रूपाने त्या साहित्याला तजेला दिला. त्यांनी सिंधी काव्यातील मागल्या काळातील रूपो, दोहे, बैत व वाई (एक प्रकारचे गीत) यांची नवनिर्मिती करून सिंधच्या पुराण्या संस्कृतीशी सांगड घातली. त्यांनी फारसी वजन (फारसी काव्यातील एक प्रकारचा छंद) न वापरता हिन्दी छंदात काव्य लिहिले. सिंधीत गझली लिहिल्या. शुद्ध सिंधी, सिंधी म्हणी व वाक्प्रचार आदींचे पुरुज्जीवन केले. सिंधी भाषेला त्यांनी समृद्ध बनविले. त्यांच्याइतके जोशपूर्ण व सुंदर सिंधी कश्चितच एखादा लिहू शकत असेल. त्यांच्याच लिखाणांनी 'जिये सिंध' चळवळीला जोर चढला.

१९६२ साली 'भंवर भिरे आकास' हा त्यांचा पहिला काव्य संग्रह प्रकाशित झाला आणि ६४ साली तो जप्तही झाला. ६३ साली 'कुल हे पातम कनिशे' हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह पुस्तक रूपाने साकार झाला. 'जे काक ककोरिया कापडी' हा पत्र-संग्रहही त्याच वेळी प्रकाशित झाला. ६८ साली ही दोन्ही पुस्तके जप्त करण्यात आली. या दोन्ही पुस्तकांत त्यांनी राजा दाहर आणि त्यांच्या कन्या यांच्या विषयीची अपार श्रद्धा प्रकट केली आहे. ७० साली त्यांचा, 'की जो ब्रोजल बोलियो' हा तिसरा काव्य संग्रह प्रकाशित झाला. तो आता कधी जप्त होते ते पहायचे.

ते नुसते कवीच नाहीत तर विद्वानही आहेत. जगातील अक्षर वाङ्मयाचा व आधुनिक साहित्याचा त्यांनी अभ्यास केला आहे.

७० साली त्यांनी शेख मुजिब यांच्या अवामी लीगमध्ये प्रवेश केला. सक्खरच्या वकील संघाचे ते अध्यक्ष आहेत. ताज्या वार्तेवरून असे दिसते सध्या ते कराचीपासून सुमारे दोनशे तीस मैलावरील सक्खरमध्ये नजर कैदेत आहेत. ◻

---

## तुलनाच करायची तर....

'महात्मा गांधींनी आपली विचारशक्ती, राजकारणपटुता, मनाचा सच्चेपणा हिम्मत आणि त्यांनी राजकारणात केलेला अहिंसेचा, असहकार व सत्याग्रहाचा नवा प्रयोग याद्वारे देशात जी नवजागृती निर्माण केली त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही.

पैगंबरांनाही त्यांच्या आयुष्यात मिळाले नसतील एवढे चांगले अनुयायी, गांधीसारख्या मवाळ, साधुपुरुष व राजकारणी नेत्याला मिळाले.

पश्चिमी साम्राज्यशाहीच्या जोखडातून स्वतंत्र होण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या आशियाई, आफ्रिकी देशांनी याच साधुपुरुषाच्या अहिंसा व सत्याग्रह या नव्या अस्त्रांचाच उपयोग स्वातंत्र्य मिळविण्यासाठी केला.'

[ जी. एम. सैयद ]

# सिन्धु संस्कृतीची परंपरा

बांगला देशाच्या आंदोलनाने सिद्ध झाले आहे, की धर्म किंवा जातीच्या आधारावर कोणत्याही देशाच्या साहित्याचे, नागरी संस्कृतीचे किंवा संस्कृतीचे विभाजन करता येत नाही. खरे म्हटले तर फाळणीमुळे पाकिस्तान अस्तित्वात आल्याबरोबरच हा प्रश्न निर्माण झाला होता. या देशाची संस्कृती कोणती आहे ? ह्या देशातील जनतेच्या नागरी संस्कृतीची परंपरा भारतीय नागरी संस्कृतीचा भाग आहे, की त्यापेक्षा ती अगदीच निराळी आहे ? या प्रश्नावर पाकिस्नानात आजपर्यंत वादविवाद चालूच आहे.

काही पाकिस्तानी लोकांच्या मते त्यांच्या नागरी संस्कृतीची सुरुवात १९४७ साली झाली तर इतर काहींच्या विचाराप्रमाणे तिची सुरुवात इस्लामच्या जन्मापासूनच आहे. काही लोक या संस्कृतीचा उगम 'मोहन-जो-दडो' (मोहन-ज-दारो)च्या काळापासूनच मानतात. हे लोक सिंध देशाच्या परंपरेला स्वतःची नागरी संस्कृती व संस्कृती मानतात. आजकाल या तिसऱ्या प्रकारच्या विचारांचे लोक सिंधमध्ये बहुसंख्य आहेत आणि हा विचार वाढत चालला आहे. 'सिंधु'वरूनच भारताला 'हिंदुस्तान' हे नाव पडले. सिंधची भूमी ही प्राचीन आणि पवित्र भूमी आहे, इथे जगातील सर्वांत जुन्या नागरी संस्कृतीचा मोहनजो द-डोचा जन्म झाला, इथे वेदांची रचना झाली; ज्यात सिंध देश आणि सिंधु नदीचा महिमा गायिलेला आहे त्या सर्वांचा या लोकांना अभिमान आहे. संतांच्या सिंधला धर्मनिरपेक्षतेची परंपरा आहे, समृद्ध आणि प्राचीन भाषा आणि साहित्य आहे, असे हे लोक मानतात.

स्वतःला मोहन-जो-दडोचे वारस म्हणविणारे मुसलमान आज सिंधच्या इतिहासाला आणि परंपरेला धर्मनिरपेक्ष, समाजवादी आणि लोकशाही दृष्टिकोणातून पाहतात. ज्या कोणी ऐतिहासिक किंवा राष्ट्रीय नेत्यांनी सिंधूच्या स्वतंत्रतेसाठी, प्रगतीसाठी व सुधारणांसाठी त्याग केले आहेत त्यांना ते आपले राष्ट्रीय नेते मानतात आणि ज्या परदेशीयांनी सिंधला आपल्या ताब्यात ठेवण्याचे किंवा पिळवणूक करण्याचे प्रयत्न केले आहेत त्यांना ते आपले राष्ट्रीय शत्रू मानतात. ज्या साहित्यकारांनी व कलाकारांनी मानवतेचे संदेश दिले त्यांच्यापासून प्रेरणा घेतात व ज्या इतिहासकारांनी सिंधचा इतिहास मोडून तोडून लिहिला आहे, त्यांची सिंधी मुसलमान निंदा करतात. मग ते मुसलमान असोत, हिंदू असोत किंवा इंग्रज असोत. आज ते

नुसता सत्य इतिहास लिहीत आहेत असेच नाही तर नवीन इतिहासही घडवीत आहेत.

समृद्ध सिंध देशावर शेकडो वर्षांपासून कित्येक परदेशी राज्यकर्त्यांनी सिंधला आपल्या ताब्यात ठेवण्याचे अयशस्वी प्रयत्न केले. आज त्या आक्रमकांचे नावसुद्धा राहिले नाही. सिंध मात्र अजूनही जिवंत आहे. त्या आक्रमकांचा सिंधी सुपुत्रांनी वेळोवेळी सामना केला आहे. त्या शूरवीरांचा सरदार आहे राजा दाहर. दाहर सिंधचा शेवटचा राजा होता. सिंधचे मुसलमान त्याला आजही आपला राष्ट्रीय नेता मानतात. त्याचा जन्म इ. स. ६२६ मध्ये झाला. सोळा वर्षांच्या कोवळ्या वयात तो गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दीत अरब लोकांनी सहा वेळा सिंधवर स्वाऱ्या केल्या. पण प्रत्येकदा त्यांचा पराभवच झाला. अखेर सातव्या वेळेस इ. स. ७१२ मध्ये मुहंमद बिन कासिमच्या मार्गदर्शनाखाली अरबांचा विजय झाला. राजा दाहरने लढता लढता प्राणांची आहुती दिली. सिंधच्या रक्षणासाठी त्याने आपल्या वंशाची पूर्णाहुती दिली.



राजा दाहर

अरब लोकांनी सिंधवर तीन शतके राज्य केले. त्यानंतर (इ. स. १०५१ ते १३५०) सिंधवर ' सूमरां 'च्या घराण्याची राजवट आली. त्यांच्या राज्यात 'दो दो सूमरो' सारखा बहादूर अमात्य जन्मला. ज्याने अल्लाउद्दीन खिलजीशी टक्कर दिली. त्याने लढता लढता आपले प्राण दिले, पण आपली बहीण ' बाधी ' हिचे हात शत्रूच्या हातात दिले नाहीत. ' दो दो सूमरो ' आज सिंधच्या एका प्रसिद्ध लोककथेचा नायक आहे.

' सूमरां 'च्या राज्यानंतर 'समां'चे राज्य सुरू झाले. ' कंधार ' (कंदहार) च्या अरगून लोकांनी सिंधवर हल्ला केला. पण ' जामनंदी ' चा थोर सेनापती ' दर्याखान याने त्यांना पळताभुई थोडी केली. ' जामनंदी 'च्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा राजा झाला पण त्याच्या व दर्याखानाच्या मतभेदांमुळे दर्याखान राजीनामा देऊन निघून गेला. जेव्हा अरगून लोकांना ह्याची माहिती मिळाली तेव्हा त्यांनी पुन्हा सिंधवर हल्ला केला. ' दर्याखान 'चे मन वळवून त्याला परत आणण्यात आले. तो

शौर्याने लढला, पण लढाईत मारला गेला व 'अरगूनां'चा विजय झाला. ह्या लढाईत सिंधच्या 'सोढा' हिंदू लोकांनासुद्धा भाग घेण्याची विनंती करण्यात आली होती आणि त्यांनी लढाईत भागही घेतला. जरी आक्रमकांचा विजय झाला तरीसुद्धा आजही सिंधी जनता आक्रमक 'अरगूनां'चे स्मरण न करता दर्याखाना-चेच स्मरण करतात व त्यांच्या वीरतेची गीते गातात.

दर्याखाना सारखाच दुसरा सिंधी सुपुत्र होता 'होश मुहंमद' याने 'तालपूरां'च्या राज्यात इ. स. १८४३ साली इंग्रजांशी असा बहादूरीने सामना केला की आज सिंधीच नव्हे तर स्वत: इंग्रजसुद्धा त्याचे स्मरण करतात. आणि त्याला मान देतात, 'होश महंमद'नेच 'मरसूं मरसूं सिंध न देसूं' ची घोषणा केली. हे घोष वाक्य आज जिये सिंध चळवळीचे घोषवाक्य बनले आहे.

इंग्रजांनी सिंध देशावर विजय मिळवला पण सिंधी लोकांवर, त्यांच्या संस्कृतीवर ते विजय मिळवू शकले नाहीत. शंभर वर्षांच्या त्यांच्या कारकीर्दीत १९४२ ची चळवळ विशेषरूपाने महत्त्वपूर्ण आहे. ह्याच चळवळीत वीर हेमू कालाणीचा जन्म झाला. त्याने इंग्रजांच्या हुकूमशाहीला सडेतोडपणे तोंड दिले आणि हसत हसत त्याने फाशीचा दोर आपल्या गळयात घातला. हा जवान, भारतीय क्रांतिकारकात वयाने सर्वांत लहान होता. त्याचे वय अवघे २० वर्षेसुद्धा नव्हते. इंग्रजांनी त्याला पुष्कळ लालूच दाखविली, क्षमा मागण्यासाठी जबरदस्ती केली पण त्याने इंग्रजांना दाद दिली नाही आणि स्वखुशीने वीरगती पत्करली. आज हेमू कालाणी सिंधी जनतेचा वीर नायक आहे. मोहन-जों-दडोच्या नागरीसंस्कृतीला विरोध कर-णाऱ्या व जातीयवादी लोकांना सिंधच्या एका कॉलेज विद्यार्थिनीने, यास्मीनने 'बानू' मासिकात बजावले आहे–'हेमू कालाणीसारख्या वीर हिंदूला शहीद मानणे तुम्हाला नापसंत आहे. पण याद राखा सिंधची नवी पिढी जातीयवादी विचारांचा द्वेष करते. 'राजा दाहर' एक 'सिंधी होता, मग तो हिंदू असो किंवा

---

## जीनांची नीति

'देशातील राजकीय समस्यांची सोडवणूक करण्यासाठी ज्या मागण्या करण्याची नीती जिनांनी त्यावेळी वापरली त्यामुळे देशातील राजकारणात फूट पडली आणि धार्मिक असहिष्णुता व घृणा यांचा फैलाव झाला. त्यामुळेच हे दोन्ही देश अजूनही स्वतंत्र होऊ शकले नाहीत.

मुस्लीम लीग शक्तिशाली झाली होती म्हणून देशाचा कारभार लीगकडे गेला. त्याचवेळी जिनांच्या अवतीभवती खुशामत्यांची व हांजी हांजी करणाऱ्यांची भाऊ-गर्दी झाली. त्यामुळेच सच्छील राष्ट्रीय नेते त्यांच्या जवळ पोचू शकले नाहीत आणि मग वातावरण जातीभेद मानणारे, स्वार्थी व तशाच इतर लोकांनी भरून गेले. वीस वर्षे उलटून गेल्यावरही पाकिस्तान यापासून मुक्त होऊ शकलेले नाही.'

[ जी. एम. सैयद ]

---

मुसलमान असो. तो आमचा राष्ट्रीय नायक आहे. आजसुद्धा सिंध देशात हजारो हेमू कालाणी आहेत. आम्ही सिंधी मुहम्मद बिन कासमचा तिरस्कार करतो, शाह लतीफला सलाम करतो, जी. एम. सैयदला प्रणाम करतो. सिंध देशाची थोरवी इस्लाम धर्मामुळे नव्हे तर 'मोहन जो दडो' मुळे आहे. त्याच्यावर लाखो इस्लाम कुर्बान करून टाकू. आम्ही मुलींनी आपल्या मनाशी ठरविले आहे, की आम्ही आमच्या मुलांची दाहर, हेमू कालाणी, शेख अयाज व होश मुहंमद अशी नावे ठेवणार.'

आज जिथे सिंधची चळवळ 'राजा दाहर' आणि 'दोदो सूमरो' ते जी. एम. सैयदसारख्या राष्ट्रीय नेत्यांपासून आणि शाह लतीफ ते शेख अयाजसारख्या मानवतावादी कवींपासून प्रेरणा घेत आहे. मग तो हिंदू असो किंवा मुसलमान. सिंध देशाच्या सूफी आणि संत कवीत, शाह लतीफ (इ. स. १६८९), सचल (इ. स. १७३९) आणि सामी (इ. स. १७४३) यांच्या काव्यात धर्मनिरपेक्ष सिंधी साहित्य आणि संस्कृतीची बहुमोल परंपरा आहे. 'शाह' व 'सचल' मुसलमान होते आणि 'सामी' हिंदू होता. ह्या तिन्ही कवींनी भारताच्या सूफी आणि संत कवींप्रमाणेच हिंदू मुस्लिम एकतेवर जोर दिला, जातीयवादी भावनेला विरोध केला आणि मानवात परमेश्वराला पाहण्याचा संदेश दिला. ह्या त्रिमूर्तीच्या परंपरेतूनच सिंधचे लोक गायक भगत (भक्त) कंवररामचा जन्म झाला. त्याची मधुरगीते ऐकण्या-साठी सिंधच्या कानाकोपऱ्यातून लोक येत असत. कडव्या मुसलमानांनी इ. स. १९३९ साली हिंदू मुस्लिम दंगलीत त्याचा खून केला. आजही सिंधी मुसलमान भगत कंवररामचे स्मरण करून रडतात.

हे सर्व राष्ट्रीय नेते भारतीय सिंधी लोकांतही तेवढेच लोकप्रिय आहेत. दोन्ही देशांचे (!) सिंधी एकच साहित्य आणि चळवळीतून उत्साहित होत आहेत, आपली संस्कृती आणि परंपरा जपून ठेवीत आहेत. ह्यातून एवढेच सिद्ध होते की सिंधु संस्कृतीच्या परंपरेचे विभाजन झाले नाही आणि सिंध देशाचेही विभाजन झालेले नाही. ◻

## धर्माचे स्वरूप

'कोणताही धर्म व विचार हा सर्वोच्च असल्याचे मानणे हे विकासाच्या आड यणारे आहे. मला प्रत्येक धर्मात सत्याचे प्रतिबिंब दिसते आहे आणि प्रत्येक धर्मात अनेक गोष्टी नीरस व निरर्थक असल्याचेही माझ्या ध्यानात आले आहे.

सूफी पथीय माणसाने कोणत्यातरी एका धर्माला व विचाराला चिकटून राहिलेच पाहिजे असं मला वाटतं. कोणताही भेदभाव न बाळगता तो धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान साहित्य, अनुभव यांचा लाभ घेऊ शकतो.

ज्ञानालाच तो धर्माचा आत्मा समजतो आणि द्वेष, भेदभाव, छोटा-मोठा हा भाव, हिंसा, पवित्र-अपवित्र यात भेदभाव निर्माण करणाऱ्या गोष्टी त्याला इमानाच्या विरुद्ध वाटतात.' [ जी. एम. सैय्यद ]

# जिये सिंध! जिये सिंध!

## कवि– हैदरबक्ष जतोई

हिंदी अनुवाद– अर्जन 'सिकायल'

भाई अपना हर इंसान, अपना तो है यह ईमान,
अपना तो है यही सलाम, जिये सिंध! जिये सिंध!
कुलकत नफरत हो बरबाद, प्यार मुहब्बत जिंदाबाद,
अपना तो है यह पैगाम, जिये सिंध! जिये सिंध!
जिये सिंध और जिये हिंद! जिये हर प्यारा इंसान,
प्यार बहार हो आम और जाम, जिये सिंध! जिये सिंध!
अमर रहे किसान मजदूर, रहे मजदूरिन भी मसरुर,
मेहनत करते सुबहो-शाम, जिये सिंध! जिये सिंध!
सिंधके दुश्मन सितम न कर, अत्याचार और जुल्म न कर,
लूट-मार को जान हराम, जिये सिंध! जिये सिंध!
सिंध को जानो सोता शेर, अब न सहेगा यह अंधेर,
सिंधमे लाखों वीर अनंत, जिये सिंध! जिये सिंध!
सिंधी साथी हिम्मत धार, माना न पराजय हिम्मत धार,
दुष्टोंका कर तू संहार, जिये सिंध! जिये सिंध!
बहरे सुन सिंधकी फरियाद, जालिम हो जाने बरबाद,
कई हो जाते है गुमनाम, जिये सिंध! जिये सिंध!
सिंध का कथन है कहो लबैक! अपना है सलाम अलैक,
अपना तो है 'अलैक सलाम!' जिये सिंध जिये सिंध!
सुनले 'हैदर' की आवाज, जिसका है अपना अंदाज,
यह आवाज है या इल्हाम, जिये सिंध! जिये सिंध!

('जिये सिंध'च्या घोषणेचा सर्वप्रथम उच्चार करणारी कविता)

# ऐ सिंध का सौदागर!

**–अब्बन हयान पंन्हर**

हिंदी अनुवाद–अर्जन 'सिकायल'

---

सिंधका सौदा करनेवालो, लानत है तुम पर लाख हजार,
सरियाबीती, लेकिन किसी ने किया न ऐसा घृणित व्यापार,
कई सिकंदर, कासिम कानिल, अहमदशाह अब्दाली,
आये लेकिन टिक न सके वे, बन न सके वे वाली,
सिंध रहेगा अक्षुण्ण पावन, हमको है विश्वास,
सिंध का सौदा करनेवालो, लानत है तुमपर लाख हजार,
'शाह' और 'सामी' ने पाली है मेरी मीठी भाषा,
मांने दी है लोरी हमको, जीवित रखना अपनी भाषा,
भय तो 'मिठाई' का करना था, जिसके हाथ रहा इकतर,
सिंध का सौदा करनेवालो, लानत है तुमपर लाख हजार.
स्त्री भाषा और संपति छीनेगा कोई वीरोंसे,
सिंधी वीर न हटेंगे पीछे, रहेंगे आगे सीना ताने,
कूद पडेंगे मैदानोंमे कर के रणोचित श्रृंगार,
सिंध का सौदा करनेवालो , लानत है तुमपर लाख हजार.
जब तक है मेरी अंतिम सास, तब तक रहेगी मां आजाद,
मां तेरी स्नेह की मीठी वाणी, सदा रहेगी सबको याद,
वीर उसी दम मर जाता है अगर करे इससे इंकार,
सिंधका सौदा करनेवालो, लानत है तुमपर लाख हजार.

□ □ □

# सिंधी दृष्टिकोनातून सिंधूदेशाचे राजकारण

माहीमच्या शितळादेवी रोडवरील एक छोटासा फ्लॅट...एक छोटीशी बैठकीची खोली. भितीला लावन ठेवलेले लिहायचे टेबल. त्याच्या समोरच्या भितीला कॉट आणि तिच्या दोन्ही बाजूला नीटपणे लावून ठेवलेल्या पुस्तकांच्या, मासिकांच्या, फाइलांच्या उतरंडी...टेबलाजवळ तीन खुर्च्यांवर आम्ही बसलो होतो–

हे आहे अखिल भारतीय सिंधी बोली आणि साहित्य सभेचे कार्यवाह श्री. उत्तमचंदानी यांचे घर. त्यांच्या पत्नी सुंदरी याही सिंधी लेखिका आहेत. त्यांच्या लघुकथांचे दोन संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. उत्तम आणि सुंदरी दोघांनीही बेचाळीसच्या क्रांतीत दुसऱ्या अनेक सिंधी विद्यार्थ्यांबरोबर स्वतःला फेकून दिले होते. आता ते एक सिंधी मासिक ' नयी दुनिया ' चालवीत असतात. १९४८ पासून हे सिंधी साहित्याला वाहिलेले मासिक साहित्याच्या, सिंधी भाषेच्या प्रेमाने परिश्रमपूर्वक नियमित प्रकाशित करीत आहेत...उत्तम यांचा शांत प्रसन्न चेहरा, त्यांच्या पत्नीच्या चेहेऱ्यावरचे स्मित हास्य, त्यांची आतिथ्यशीलता, त्या घरातले ते साहित्य–संस्कृतीने भारलेले वातावरण सिंध आणि सिंधी संस्कृतीबद्दल बोलताना त्यांच्या डोळ्यांत प्रकट होणारी चमक आणि त्यांच्या स्वरात सहज व्यक्त होणारा अभिमान. सिंधू सरिता तर त्यांचे केवळ भक्ती स्थानच. क्षणभर वाटावे की जण सिंधची अस्मिता समूर्त होऊन बोलत आहे.

मी त्यांना अनेक प्रश्न विचारले. मोजक्या पण अर्थपूर्ण शब्दात त्यांनी त्यांची उत्तरे दिली. या संभाषणातून विभाजनापासून आजपर्यंत सिंधच्या राजकीय सामाजिक जीवनाचा चित्रपटच जणू डोळ्यांसमोरून सरकत गेला.

" आम्ही सिंध सोडलं त्यावेळी सर्व वातावरणच संशयाने आणि भीतीने भरलेलं होतं " श्री. उत्तम त्या कृष्ण दिवसांची आठवण करून सांगत होते " असुरक्षितता होती. केव्हा काय होईल याचा भरवसा नव्हता. विशेषतः शहरात जो विषारी जातीय प्रचार होत होता त्यामुळे आणि भारतातून जे मुजाहीर (निर्वासित) तेथे

दिनकर साक्रीकर

आले. त्यांच्यामुळे वातावरण बिघडून गेले. त्यांच्याच चिथावणीमुळे डिसेंबर १९४७ आणि जानेवारी १९४८ मध्ये हैद्राबाद (सिंध) आणि कराचीला दंगे झाले.

" हिंदु अल्पसंख्य होते. पण आर्थिक जीवनात त्यांचं वर्चस्व होतं मुस्लीम लीगने या वस्तुस्थितीचा फायदा घेऊन आमच्याविरुद्ध प्रचार सुरू केला. परिणामत: आमचे आमच्या शेजाऱ्यांशी आणि मित्रांशीही संबंध बिघडले. वास्तविक सुफी पंथाच्या प्रभावामुळे आणि दोन्ही समाजातील एकमेकांशी जमवून घेण्याच्या प्रवृत्तीमुळे हिंदु-मुसलमान शांततेने सहजीवन जगत होते. पण वातावरण बिघडले ते इतके की फक्त दोन तीन ठिकाणी दंगे झाल्याबरोबर हिंदूंनी सामुदायिक स्थलांतर केले.

" खरं म्हणजे हे स्थलांतर कायमचे होईल अशी आम्हाला कल्पना नव्हती. चार सहा महिन्यांनी, फार तर वर्षाने आपल्याला परत जाता येईल अशी आमची अपेक्षा होती. म्हणून, आम्ही काही सामान तर तेथील मुसलमान शेजाऱ्यांकडे तात्पुरते ठेवण्यासाठी दिले. परत गेल्यावर आपल्याला ते लागेल या कल्पनेनं सिंधी मुस्लीम मित्रांनी निर्वासितांच्या हल्ल्यापासून अनेक हिंदूंचे प्राण वाचविले होते. आम्ही सिंध सोडून येताना आमचे हे मित्र रडले होते. आम्हीही जड अंत:करणाने सिंधचा निरोप घेतला. उराशी आशा बाळगली होती, की आम्हाला लवकरच परत येता येईल."

—या मुसलमान मित्रांशी तुमचा काही पत्रव्यवहार किंवा अन्य प्रकारे संबंध उरला होता का ?

—पत्रव्यवहार तर होताच. शिवाय ' नयी दुनिया ' हा एक दुवा होता. १९६५ च्या युद्धकाळात व नंतर काही दिवस हा संबंध तुटला होता. पण नंतर तो पुन्हा प्रस्थापित होऊ लागला. मासिकाच्या प्रती अद्यापही तिकडे जातात.

—सिंधमधील मुस्लीम विचारकांमध्ये आपला इतिहास, सिंधी संस्कृती आणि विशेषत: सिंधी हिंदू यांच्याबद्दल नवीन विचार केव्हापासून येऊ लागले ? फाळणीबद्दलही त्यांनी कांही फेर विचार केला आहे का ?

—सिंधी मुस्लीम विचारवंतांमधील परिवर्तन प्रथम स्पष्ट दिसून येऊ लागले ते १९५४ च्या अखेरीस पश्चिम पाकिस्तानचे एक ' युनिट ' बनविण्यात आले तेव्हापासून. लष्करी हुकुमशाहीने हा जो निर्णय घेतला त्याचा सिंधी समाजाला धक्का बसला. कारण या निर्णयामुळे सिंधी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्यावरच केवळ नव्हे तर एकंदर सिंधच्या अस्तित्वावरच घाला पडला होता. एक युनिटमुळे सिंध नकाशावरून अदृश्य झाला आणि सिंधवर पंजाबी व मुजाहीर (निर्वासित) यांचे वर्चस्व स्थापन झाले. अर्थात् फाळणी रद्द व्हावी असे वाटणाऱ्या सिंधी विचारवंतांची संख्या अल्प आहे. परंतु मला असं वाटतं, की बांगला देशच्या निर्मितीमुळे ही संख्या वाढेल.

—पण हे तुमचं वाटणं कितपत वास्तविक आहे? तुम्ही 'जिये सिंध' आंदोलनाबद्दल इतकं लिहिलं खरं, पण डिसेंबरच्या निवडणुकीत काय झालं? सिंधमध्येही अखेर भुत्तो यांनाच बहुसंख्य जागा मिळाल्या आणि जय सिंध आंदोलनाच्या पुढाऱ्यांचा पराभव झाला, याचा अर्थ भारत-द्वेष, हिंदु-द्वेष यावर आधारलेल्या राजकारणाचाच प्रभाव अद्याप सिंधमध्येही आहे, नाही का?

—वरवर पहाता, असं वाटलं तरी, वस्तुस्थिती वेगळी आहे. एका दृष्टीने भुत्तोंचा विजय हाही जय सिंध आंदोलनाचाच विजय मानावा लागेल. कारण भुत्तोंनी स्वतःच जय सिंध आंदोलनाच्या काही घोषणा स्वीकारल्या होत्या. उदाहरणार्थ, सिंधमधील प्रत्येक प्रचार सभेची सुरुवात ते आणि त्यांचे अन्य प्रचारक 'जिये सिंध'च्या घोषणांनी करीत असत. तेही जय सिंधवाल्यांप्रमाणे सलाम करीत अलेकुमने अभिवादन न करता 'जय सिंध—सदा जय सिंध' हे अभिवादन शब्द वापरीत. आता एक गोष्ट खरी, की जय सिंध आंदोलन हे अद्याप बांगला देशच्या आंदोलनाप्रमाणे जनता-आंदोलन झालेले नाही. त्याची व्याप्ती बुद्धिजीवी वर्गापुरतीच आहे. त्यामुळे जिये सिंध आंदोलनाचा फायदा त्याच्या घोषणा वापरून भुत्तोंना घेता आला. जय सिंध आंदोलनाचे नेते जी. एम्. सैयद यांनी 'अखबार जहाँ'ला दिलेल्या एका मुलाखतीत निवडणूक-पराभवाबद्दल असे म्हटले आहे, की तें निवडणूक हरले खरे, परंतु धर्मनिरपेक्षता, समाजवाद आणि लोकशाही या तत्त्वांचा विजय झाला—

—पण भुत्तोंचा विजय हा धर्मनिरपेक्षतेचा विजय कसा मानता येईल?

—भुत्तोंचे स्फोटक व्यक्तिमत्त्व हे अनेक प्रकारच्या परस्पर विसंगत प्रवृत्तींनी भरलेलं आहे. भुत्तो हे भारत-द्वेष्टे आहेत, पण हिंदु-द्वेष्टे नाहीत. निवडणूक मोहिमेत त्यांच्या सर्व भाषणांचं मध्यवर्ती सूत्र असं होतं: 'पाकिस्तानमधील संघर्ष हा शोषक आणि शोषित यांच्यातील संघर्ष आहे. तो जुलमी, शासक आणि दडपलेली प्रजा यांच्यातील सघर्ष आहे. प्रस्थापित हितसंबंध असलेले लोक या मूलभूत संघर्षापासून जनतेचं लक्ष्य विचलित करण्यासाठी धर्माचा उपयोग करतात ...आपल्या आर्थिक व्यवस्थेत काही मूलभूत बदल केल्याशिवाय हा अधःपात थांबविता येणार नाही. या प्रश्नाइतका दुसरा कोणताच प्रश्न अधिक महत्त्वाचा नसल्यामुळे माझ्या पक्षाने पाकिस्तानच्या आर्थिक आणि सामाजिक प्रश्नांना मध्यवर्ती स्थान दिलेले आहे.' तेव्हा भुत्तोंची भूमिका ही अंतर्गत राजकारणात धर्मनिरपेक्ष समाजवादाची आहे. जमाते इस्लामीच्या मौलाना मदूदी यांनी समाजवादी प्रचार करणाराला अशी धमकी दिली, की 'आम्ही पाकिस्तानमध्ये इंडोनेशिया करू.' (म्हणजे इंडोनेशियात साम्यवाद्यांची कत्तल झाली तशी येथे करू) तेव्हा भुत्तोंनी त्यांना जवाब दिला, की 'आम्ही येथे व्हिएतनाम करू'...शिवाय, भुत्तोंच्या बाबतीत हेही लक्षात घ्यायला पाहिजे, की मुल्ला, मौलवी, पीर वगैरे जे कडवे धर्मांध सनातनी

आहेत त्यांना ते सतत आव्हान देत असतात व समाजावरील त्यांचे वर्चस्व नष्ट करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. म्हणून सैयद म्हणाले, की भुत्तोंचा विजय हाही धर्मनिरपेक्षतेचा विजय आहे.

— पण भुत्तो पाकिस्तानचे राष्ट्रपती झाले असल्यामुळे आता 'जिये सिंध' आंदोलनाचे भवितव्य काय दिसते ?

— जरी ते राष्ट्रपती झाले असले तरी केवळ त्यामुळे ही चळवळ लुप्त होणार नाही. ती चळवळ पुन्हा फोफावेल व प्रांतिक स्वायत्ततेचे ध्येय साध्य करील भुत्तोंनी सिंधी जनतेच्या स्वायत्ततेच्या आकांक्षा दडपून टाकण्याचा प्रयत्न केला तर मी ज्या सैयद यांच्या मुलाखतीचा उल्लेख केला. त्या मुलाखतीतच त्यांनी म्हटले आहे, की आयुब व याह्याखानप्रमाणेच भुत्तोंची अवस्था होईल. अर्थात्, सिंधी भाषेला तिचं हक्काचं स्थान त्यांनी मिळवून दिलं तर मात्र ते या आंदोलनातील हवा काढून घेऊ शकतील. जी. एम्. सैयद वगैरे जिये सिंध चळवळीच्या नेत्यांना ते मुक्त करीत नाहीत, यावरून त्यांना या चळवळीची भीती वाटते हे उघड आहे.

— बरं आता असं सांगा, की पाकिस्तानमध्ये जो भारतद्वेष व हिंदुद्वेष सतत जोपासला गेला आहे तो ओसरण्याची काही शक्यता आहे का ? सिंधमध्ये धर्मनिरपेक्षतेचा विचार दृढमूल होण्याची कितपत आशा आहे ?

— माझी अशी खात्री आहे, की पाकिस्तानमधील भारतद्वेष व हिंदूद्वेष हा आता ओसरू लागेल. असं वाटण्याचं एक कारण हे आहे, की आता जे काही पाकिस्तान उरलं आहे ते भारतद्वेषावर जगूच शकणार नाही. बांगला देशाची निर्मिती हा एक त्यांना कायमचा धडा मिळाला आहे. धर्मनिरपेक्षता सिंधी मुसलमानांत रुजत आहे अशी माझी खात्री आहे.

— भुत्तोंना सिंधमध्ये कायमचे जन-समर्थन लाभेल असे तुम्हाला वाटते काय ? सिंधची तरुण पिढी भुत्तोंच्या प्रभावाखाली संपूर्णपणे जाणे संभवनीय नाही का ?

— निवडणुकीत 'जिये सिंध' आंदोलनाच्या समर्थकांत फूट पडली होती व काहींनी भुत्ता 'जिये सिंध'च्या घोषणा देतात म्हणून त्यांना पाठिंबा दिला होता. शिवाय सिंधच्या एकंदर लोकसंख्येपैकी जवळजवळ एक तृतियांश हे गैरसिंधी निर्वासित आहेत. हा धनिक-वर्ग असून जिये सिंध आंदोलनाविरुद्ध त्यांची एकजूट आहे. भुत्तो हे संधीसाधू पुढारी आहेत. त्यांनी या वर्गाचाही पाठिंबा घेतला, वाटेल ती आश्वासने दिली व पैसाही पाण्यासारखा खर्च केला. या सर्व कारणांमुळे त्यांनी विजय मिळविला. पण तो टिकविणे कठीण दिसते. भुत्तोंनी शेख मुजीब व बांगला देशबद्दल जी भूमिका घेतली होती त्यामुळे आणि सिंधच्या विशिष्ट हितसंबंधांबद्दल त्यांनी जे औदासिन्य दाखविले त्यामुळे बऱ्याच तरुण वर्गाचा भ्रमनिरास झाला आहे. अनेक तरुणांनी निरनिराळ्या सिंधी वृत्तपत्रांत व पुस्तकांतून भुत्तो व त्यांच्या पक्षाबद्दल संशय व अविश्वास व्यक्त केला. हैद्राबादच्या (सिंध) जिये सिंध विद्यार्थि-

संघाने ' सिंधचे आवाहन ' म्हणून एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. यातील पुढील भाग या दृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे.

' राष्ट्रीय संसदेच्या निवडणुकीच्या संधीचा फायदा घेऊन सिंधचे संपूर्ण व स्वायत्त राज्य प्रस्थापित करून घेण्याची संधी सिंधने अगोदरच घालविली. उलट सिंधने घटना-आलेखनाचा अधिकार असलेल्या संसदेत अशा एका पक्षाला बहुमत दिले आहे की कोणत्या तरी स्वरूपात पुन्हा ' एक घटक ' बनविल्याशिवाय तो पक्ष अस्तित्वांत राहू शकत नाही. निवडणुकीनंतरच्या अल्पावधीत त्या पक्षाने हे दाखवून दिले आहे, की पाकिस्तानचे पुन्हा एक घटक बनवून त्याचा प्रतिपाळ करणे हेच आपले जीवित कार्य आहे. आता तरी सिंधी जनतेने सावध व्हावे. आपल्या भवितव्याबद्दल जागरूक रहावे. जे संसद सदस्य सिंधचे प्रतिनिधी म्हणून निवडून गेले आहेत, त्यांनी सिंधच्या त्यांच्याकडून काय अपेक्षा आहेत, सिंधी जनतेने त्यांच्यावर कोणती जबाबदारी सोपविली आहे याची जाणीव ठेवावी. हे सिंधचे आवाहन आहे आणि जे या आवाहनाला साद देणार नाहीत ते सिंधच्या इतिहासांत देशद्रोही म्हणूनच ठरविले जातील हे त्यांनी लक्षात ठेवावे '

—सिंधमधील ही परिस्थिती लक्षात घेता सिंधचा जो प्रदेश आज भारतीय सेनेने


लालमहाल
पन्हाळगड
राजगड
पुरंदर
आग्रा

ब. मो. पुरंदरे

राजहंस प्रकाशन
पुणे

मूल्य प्रत्येकी
तीन रुपये

व्यापला आहे तेथून सैन्य काढून घ्यावे असे तुम्हाला वाटते काय ? समजा हा प्रदेश भारताने सोडला नाही तर त्याचे काय परिणाम होतील.

—आपण सैन्य काढून घेतले तर बरे असे मला वाटते. कारण जर आपले सैन्य तेथे राहिले तर सिंधमधील संधी साधू, प्रतिगामी, जात्यंध भारतविरोधी गट त्या परिस्थितीचा उपयोग जिये सिंध चळवळ चिरडून टाकण्यासाठी करून घेतील अशी भीती आहे.

—या नव्या परिस्थितीत सिंधमधील धर्मनिरपेक्षता मानणाऱ्या शक्तींनी आपण काही मदत करू शकतो का ? कोणत्या प्रकारे मदत करता येईल ?

—आपण मदत अप्रत्यक्षपण करू शकतो. मुख्यतः आपण इथे अल्पसंख्याकांना, विशेषतः मुसलमानांना न्यायाने वागविणे ही सर्वांत महत्वाची मदत होईल. तसेच सिंधी भाषेला उत्तेजन दिले पाहिजे, सिंधी भाषेच्या विकासासाठी इतर भाषांप्रमाणेच मदत मिळाली पाहिजे. सिंधमधील मुसलमान आणि येथील सिंधी हिंदू या दोघांनाही समजणारी जी सिंधी लिपी आम्ही वापरतो ती कायम ठेवणे आवश्यक आहे. कारण हा आम्हाला जोडणारा दुवा आहे. या माध्यमाद्वारेच येथे सिंधी साहित्याच्या व भाषेच्या विकासाचे जे प्रयत्न आम्ही केले. त्यापासून सिंधी मुस्लीम साहित्यिकांनी स्फूर्ती घेतली आहे. सिंधी लिपीचे हे महत्त्व विसरू नये. येथील सर्व चळवळींच्या प्रतिक्रिया तेथे होतात. याची आपण जाणीव ठेवली तर सिंधमधील राष्ट्रीय प्रवृत्ती अधिक बलशाली होण्यास आपण साहाय्यभूत होऊ शकतो.

अशी ही आमची प्रदीघ चर्चा संपली.

श्री. उत्तम यांचे सिंधी लेखक, विचारक, प्राध्यापक यांच्याशी फाळणीपासून आजतागायत जे संबंध त्यांनी प्रयत्नपूर्वक राखले व वाढविले आहेत त्यामुळे या वर्गाच्या मनाची, अंतःकरणाची त्यांना कल्पना आहे. या दृष्टीने त्यांच्या परिस्थितीच्या विश्लेषणाला व मतांना महत्त्व आहे. सिंधच्या आजच्या राजकारणाचे स्वरूप आकलन होण्यास त्यांची ही चर्चा उपयुक्त व्हावी.




खानू न्हावी सलूनमध्ये केस कापीत होता. त्याच वेळी राष्ट्रीय रक्षक दलाचे जवान कवायत करीत होते. लेफ्ट-राईट, लेफ्ट राईट व त्यांच्या बुटांच्या खाड खाड आवाजाने सारा आसमंत भरून गेला होता. खाकी गणवेशधारी धड-धाकट जवानांच्या घामटलेल्या चेहेऱ्यांवर बेफिकिरी व मगरूरपणा स्पष्ट दिसत

मूळ लेखक
शेख अयाज

हिंदी अनुवाद
गोविंद पंजाबी

---

होता. केस कापून झाले तसे शामदास सेठ उठले आणि त्यांनी कवायत करणाऱ्या जवानांकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर भिती, लाचारी आणि द्वेषाची चिन्हे दिसत होती–' खानू, तो चाँदताऱ्याचा झेंडा घेऊन जाणार कोण आहे रे!' घाबरत घाबरतच त्यांनी खानू न्हाव्याला विचारले.

–तो त्या तुकडीचा प्रमुख, खान मुहंमद...लोहाराचं काम करतो.

–' खानू ' त्याच्यावरील पूर्ण विश्वासाने शामदास सेठ म्हणाले,–' तो काय म्हणतो रे, दंगे-बिगे करायचा तर या लोकांचा विचार नाही ना!'

खानू मुस्लीम लीगचा सदस्य होता. इस्लामी धर्माच्या महानतेबद्दल त्यांच्या मनात आदराची भावना होती पण गिऱ्हाईकांबरोबर तो नेहमीच प्रेमाने व संयमाने वागत असे म्हणूनच तो म्हणाला, 'शेटजी ते दंगे बिगे कशाला करतील, ते व्यामाम करीत आहेत.'

–पण मित्रा व्यायाम करायचा असेल तर ते रामा मुल्ल्याच्या किंवा वाहीद वक्ष यांच्या आखाड्यात करू शकतात की. येथे रस्त्यावर व्यायाम करायची काय गरज आहे. मी उद्या जोधपूरला जात आहे. बायको आणि मुलाबाळांनाही बरोबर नेणार आहे–शेटजी खानूला म्हणाले.

गेले दोन चार दिवस खानू अशाच प्रकारच्या बातम्या ऐकत आला होता. 'अलबहीद' व 'संसार समाचार' या वर्तमानपत्रांतून आलेले बंगाल व बिहार-मध्ये झालेल्या दंग्यांचे वृत्त त्याने वाचले होते. वेदनामय आणि हृदयद्रावक... मानवतेला काळीमा फासणारे, भावा भावांच्या रक्तांशी खेळ खेळणारे दंगे... हजारो स्त्रियांची अब्रू लुटली गेली होती. कोवळ्या निष्पाप कच्च्याबच्च्यांची कत्तल झाली होती...सरहद्द प्रांत, लाहोर आणि मुंबईत झालेल्या दंग्यांची छायाचित्रे त्याने वर्तमानपत्रांतून पाहिली होती. त्याच्या मनात अनेक विचारांनी गर्दी केली होती. बिहारी मुसलमानावर हिंदूंनी अत्याचार केले होते. आमच्या धर्मबांधवांच्या रक्तांशी त्यांनी खेळ चालविला होता. बुरखेधारी स्त्रियांची अब्रू त्यांनी लुटली होती. दोन जून नंतर येथेही दंगे होतील का? खानूचे विचारचक्र चालूच होते... त्याच्या हातातील वस्तरा काम करीत होता. पण मनात काही वेगळेच चालले बिहारी मुसलमानांवरील अत्याचाराचा बदला आम्ही येथे घेणार का? दंग्याचे चित्रही त्याच्या डोळ्यांसमोर तरळले, एक उदाहरण त्याच्या मनात जुळणी करीत

होते. या शामदासशेठच्या गळ्यावरून हा वस्तरा फिरेल का ? पण...पण या विचाराबरोबरच त्याच्या मनाचा थरकाप उडाला...

खानू न्हावी होता, पण संध्याकाळी तो जेव्हा शर्ट व पँट घालून लक्षी दरवाजा येथे फिरायला जाई त्यावेळी त्याला न्हावी म्हणण्याची कोणाची छाती नव्हती. शिकारपूरचे अनेक महाविद्यालयीन विद्यार्थी त्याच्याबरोबर दोस्ती करून होते. कारण सिंधमधील काही कॉलेजातील तऱ्हेतऱ्हेची प्रकाशन, त्याचप्रमाणे इतर उर्दू व हिंदी वर्तमानपत्रे व साप्ताहिके त्याच्या सलूनमध्ये त्यांना वाचायला मिळत असत. त्याच्या सलूनमध्ये अशोक कुमार व पृथ्वीराज यांच्या तसबिरीही होत्या. तो जेव्हा साहित्य व चित्रपट यांवर चर्चा करीत असे तेव्हा त्यातला तो जाणकार असल्याचे ऐकणाऱ्याला सहज समजत असे. त्याच्या सलूनमध्ये सुगंधी पावडर आणि तेलेही असत व ती वापरून ही पोरे सजून कॉलेजला जात असत. म्हणूनच खानूची मैत्री त्यांना हवीहवीशी वाटे.

अशिक्षित हिंदु शेठीये व मुसलमान जमीनदारांची मुले व कॉलेज विद्यार्थी जे त्याचे मित्र होते, ते नेहमीच त्याच्यावरोबर सहल, शिकार किंवा अभिनय यावरच वादविवाद करीत असत. दोन तीन साम्यवादीही त्याच्या सलूनमध्ये जात असत पण त्याच्याकडे लक्ष न देता ते आपापल्या चर्चेतच मश्गुल असत. काळच ते त्याच्या सलूनमध्ये केस कापायला आले होते.

' सिंध सिंध्यांसाठी आहे. आज सिंध या राष्ट्राचे स्वतंत्र अस्तित्वच धोक्यात आले आहे. हे पंजाबी, बिहारी, गुजराती, आमची भाषा, संस्कृती व्यापार, जमिनी आमच्यापासून हिरावून घेत आहेत. काँग्रेसवर गुजराथ्यांचे वर्चस्व आहे तर बिहारी आणि पंजाब्यांचा मक्ता लीगने घेतला आहे. भले मग सिंधी भुकी मेले तरी पर्वा नाही, तेव्हा या सर्व कटकटी आपण नाहीशा केल्याच पाहिजेत' अशा प्रकारचे त्यांचे बोलणे चालले होते.

त्यांच्यातील एक हिंदू होता. तो म्हणाला. ' उदयपूर, जोधपूरच्या हिंदूमध्ये रहाण्यापेक्षा इथेच राहून मुस्लीम मित्रांच्या हातून मारले जाणेच मी अधिक पसंत करतो. हा देश माझा प्राण आहे, येथील बाग-बगीचे, रस्ते, लोक माझे आहेत. सिंधशिवाय जगणे म्हणजे मढ्याप्रमाणे आहे......

इतके विशाल मन असलेला हिंदू यापूर्वी खानूने पाहिला नव्हता. म्हणूनच तो तन्मयतेने हे सारे ऐकत होता. बोलण्याच्या भरात त्या हिंदू साम्यवाद्याने आवेशाने ' जय सिंध 'चा पुकारा केला. खानूने प्रथम जेव्हा ' जय हिंदू 'चा पुकार ऐकला होता तेव्हा त्याला त्यांत हिंदुत्वनिष्ठेचा वास आला होता. जणू काय कोणीतरी वस्तऱ्याने आपली मानच कापत असल्याचे त्याला वाटले होते. ' जयसिंध ' घोषणेने तो सुखावला, कोणीतरी आपल्यावर गुलाब पाणी शिंपडीत असल्याचा त्याला भास झाला.

आज त्याच्या मनात विचार येत होता की सिंधमध्ये दंगे झालेच तर काय करायचे ? त्या वस्तऱ्याने शेठजीची मान तुकवायची ? शेठजीचा कॉलेजमध्ये शिकणारा मुलगा त्याच्याकडेच केस कापायला जात असे. नववर्ष दिनानिमित्त सिंधुकाठी भरणाऱ्या जत्रेत खानूला तो व त्याचे मित्र अनेक वेळा भेटलेले होते. त्यांनी प्रत्येक वेळी खानूला आपल्यात सामावूनही घेतले होते. खानू भूतकाळात गुडूप झाला. जत्रेत सर्वत्र वर्दळ असायची, सिंधुमाई खळखळून वहात असायची. एकदा त्या पुलाकडून जातांना त्याने सिंधूचे अवखळ रूप पाहिले आणि कानांवर हात ठेवून त्याने दोहा गायला सुरुवात केली, 'चोळे वारी नीन्गरी...' (ओ कुरते-वाली छोकरी)...सारंच प्रेमपूर्ण वातावरण...हिन्दु-मुसलमान हा तेव्हा भेदच नव्हता. सर्वचजण अखंड संगीतपान करीत असत. त्याच वेळची आणखी एक आठवण त्यांच्या मनात तरळली. त्यांनी पोहायला शिकताना उपयोगी पडणाऱ्या फळ्या उचलून त्यांवर ताल धरला होता आणि ते सारेचजण संगीतात भिजून चिंब झाले होते. त्यानंतर ते सारे आंबे चुखत चुखत पोहायला उतरले होते. समुद्राप्रमाणे विशाल असलेल्या सिंधुमाईच्या कुशीत ते पोहत होते. खानूच्या मनात विचार आला. हे पाणी हिंदू-मुसलमानांना समान वागणूक देते. हिंदू माणसाला बुडवायचे आणि मुसलमानाला तरंगवायचे असा भेदभाव येथे होत नाही. सेठजीचा मुलगा व खानू यांच्या डोक्यावर सूर्य तळपत होता. डोकी थंड ठेवण्यासाठी त्यांनी पाण्यात बुड्या मारल्या. एकाला सावली व दुसऱ्याला ताप देण्याचा भेदभाव सूर्यसुद्धा करीत नाही. खानूच्या मनातील असे विचार चालूच होते. निसर्ग जर हिंदु-मुसलमान असा भेद करीत नाही तर त्या निसर्गाची निर्मिती करणारा तो ईश्वर. तरी तो कसा करील आणि ईश्वर जर असा भेदभाव करीत नाही तर मग लोकांनी तो का करावा ? ज्याच्याबरोबर आपण खाल्ले पिल्ले आहे, उठबस केली आहे, त्याच्या कर्त्यांच्या मातापित्यांचा गळा कसा घोटायचा ? तो विचार करीत होता.

खानू त्याच्या हिंदू मित्रांबरोबर शाहीबागेत भजन (लोकगीते, नृत्य व नाट्य एकत्र असणारा कार्यक्रम) पाहायला व ऐकायला जात असे. जेव्हा महंत कानावर हात ठेवून शाह लतिफची, 'थुदी वसा इज थर जी, मिटी मुइए मथा, जे पोयों थे पसाह, तबि निजाइ मढ मलीर में, (मी मेल्यानंतर माझा मृत देह माझ्या मलीर देशाला घेऊन जा), कविता म्हणत असे तेव्हा तेथे जे काही वातावरण तयार होते असे त्यामुळे आपण तेथेच देह ठेवावा असे खानूला वाटे. तिथे विशाल वृक्ष होत. शीतलता देणारे. आपली कबर येथेच त्या वृक्षांच्या छायेत असावी आणि त्या झाडांची पाने आपल्या कबरीवर सतत वर्षाव करीत रहावीत असे त्याला वाटे. महंताचा मधुर, मंजूळ व पल्लेदार आवाज त्याच्यापाशी मोगऱ्याचा सुगंध घेऊन येत असे. आपल्या कबरीतही हाच आवाज जात असावा, धुमत रहावा असे त्याला वाटे. एखाद्या देवदूताने आपल्याला स्वर्गात नेले तरी तेथून धूम ठोकून पळत यावे

आणि मोगऱ्याचा सुगंध देणारा भगताचा आवाजच ऐकत बसावे या विचारात तो दंग होत असे. खानूच काय पण सारेच हिंदू-मुस्लिम असाच विचार करीत असत.

हे हिंदू सिंध सोडून जाणार? काय हे लोक ‘ मारुई ’चा देश सोडून जाणार? मग त्यांच्या शाह लतिफच्या कविता कोण ऐकणार?

शाह लतिफच्या काव्यासाठी प्राण द्यायला तयार असणारे, सिंधुच्या जलावर जगणारे सिंधी, सिंधबाहेर जगणार कसे आणि कशावर?

हिंदू-मुसलमान यांच्या जीवनाचे एकत्र विणले गेलेले धागे त्याच्या नजरेसमोर येऊ लागले. यात सिंधची संस्कृती, पुढारलेली नागरी संस्कृती, राष्ट्रीयता एकच होती. सिंधच्या विचारात तो गुरफटून गेला होता. त्याचे विचारचक्र त्याच्या केस कापण्याच्या मशीनप्रमाणे चालू होते.

संध्याकाळी तो सलून बंद करून घरी जात असताना एक दृश्य त्याच्या नजरेसमोर सारखे येत होते. माणसे आणि सामानाने भरलेल्या बग्ग्या स्टेशनच्या रोखाने निघाल्या होत्या. त्यात आपली सारी मालमत्ता व प्यारी मातृभूमी सिंध कायमची सोडून जाणारे अनेक होते... सारं काही मागे सोडून चालले होते. त्यांचे प्रिय कवी शाह लतिफ, वसामी, जिंदा पीर, साधुबेला, बारहवीची जत्रा, अगदी सारं काही मागे सोडून ते चालले होते. एका अज्ञात भूमीकडे की जेथील लोकांची भाषा, रीतभात त्यांना अगदीच नवीन होती.




त्याचे विचारचक्र थांबले नव्हते... पैसा असलेले शेठ सावकार खर्च करून सिंधबाहेर जातील. त्यांचे काय, जोधपूर, जयपुरात त्यांची घरे आहेत. तेथे जाऊन ते व्यापार करतील पण गरीब बिचारे कारकून, अध्यापक काय करणार. ते सिंध कसा सोडणार? त्यांच्यापैकी अनेकजण त्याच्याकडे केस कापायला येत असत; केस

कापायचे चार आणे देणे त्यांना जमत नसे. ते हे गरीब लठ्ठ भाडं देऊन कसे जाणार आणि देशाबाहेर जाऊन काय करणार ? त्यांना नोकरीधंदा कोण देणार ?

दुसऱ्या दिवशी सकाळी खानू आपल्या घराच्या दरवाजात उभा राहून दात घासत होता. तेवढ्यात मासळी विकणाऱ्या बाईचे 'मासे घ्या मासे' हे शब्द त्याच्या कानांवर आदळले. खानूच्या बायकोने बाहेर येऊन तिला थांबविले व म्हणाली, मला यातील अर्धी मासळी पाहिजे. तेवढ्यात तिची शेजारीण, पेसूरामची आई बाहेर आली आणि म्हणाली, 'ती सर्वच मासळी घे, त्यातली अर्धी मी घेईन.' त्यांनी ती सर्व मासळी घेऊन त्यातील अर्धी अर्धी वाटून घेतली. वाटणी चालू असताना पेसूरामची आई म्हणाली, 'बहन, आसपासच्या घराघरांतून द्वेष पसरू लागला आहे. जर मुसलमानांनी दंगा केला तर आश्रयार्थ मी तुझ्याकडे येईन.'


खानू तेथेच होता त्याने म्हातारीची गम्मत करण्यासाठी म्हटले, 'मी तर मुस्लीम लीगवाला आहे आणि जिना कॅप घालतो. तुम्ही तर मलाच घाबरले पाहिजे.'

मान हलवीत, पेसूरामची आई म्हणाली, तुम्ही ढीग लीगवाले असा की, आमच्या ठायी तुम्ही खानूभय्याच आहात. आपण आम्हाला कसे माराल ? शेजाऱ्यांचे नाते, माता-पिता, बहीणभावाचे असते. तुम्ही इंदूच्या दिवशी आम्हाला मिठाई देता आणि आमच्या सणांच्या वेळी आमच्याबरोबर गोडधोड खाता म्हणूनच तुम्हाला अशी इच्छाच होणार नाही आणि हो तुमच्या हातून मरण आलेच तर मी धन्य समजेन. आणि म्हातारीने त्याला एक म्हण ऐकवली–मर मार नन्टा भाइडा, सिसी अ दींदालत (मार लो मेरे छोटे भाई, सरकार लो) ही म्हण आई, बहीण-भावाच्या भांडणाच्या वेळी त्यांना ऐकवत असते.

ही म्हण ऐकताच खानू भानावर आला. एका शरणार्थी बाईला मी मारणार ? छे. असं कदापि होणार नाही. बिहारात हिंदूंनी मुसलमानांना मारले त्यात पेसूरामच्या आईचा काय दोष ? ती तर लहानपणापासून त्यांच्या शेजारी राहात आली आहे. त्या दोघांनी एकाच बोरीची बोरे लहानपणी खाल्ली होती, एकाच नळावर एकत्र पाणी भरले होते. खानूनेच अनेक वेळा कळशी तिच्या डोक्यावर ठवायला मदत केली होती. त्याचा काटून पेशूरामच्या गच्चीत पडलेला पतंग तिनेच त्याला अनेक वेळा परत केला होता. खानूची बायको गरोदर असताना तिनेच तिला पाणी आणि कोणा एका संताकडील दोरा आणून दिला होता. मग बिहारी मुस्लीम मारले गेले त्यात पेसूरामच्या आईचा काय दोष आहे ? नाही नाही असं होणार नाही ! सिंध देशात आम्ही दंगे होऊ देणार नाही. निराश्रित शेजाऱ्याचा गळा कापण्याइतका कोण निर्दय आहे ? त्यांची धुंदी साफ उतरली होती–अगदी गुळगुळीत दाढी व्हावी तशी ! ◻ ◻ ◻

मराठी अनुवाद : विजय वैद्य

# सीमेंट
# कायम टिकाऊ
# असते



आणि ए सी सी सीमेंटमध्ये बांधलेले घरही तसेच असते. ते पिढ्या न् पिढ्या टिकते. असे घर म्हणजे तुमची मुले, नातू, पणतू यांच्यासाठी भक्कम वारसाच होय. ए सी सी सीमेंट म्हणजे सुरक्षितता, टिकाऊपणा आणि स्थायीपणा.

तुम्हाला लागणारे सीमेंट मिळविण्यासाठी तुमच्या नजीकच्या **ए सी सी** स्टॉकिस्टचा अथवा दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २०, यांचा संपर्क साधा.

तज्ज्ञांची **मोफत तांत्रिक मदत** दि कॉंक्रीट ॲसोसिएशन ऑफ इंडिया, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २०, यांचेकडून मिळेल.

**ACC**

**शेतकऱ्यांचा सखा**

**दि ॲसोसिएटेड सीमेंट कंपनीज लिमिटेड**
**दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड**



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

बाळपणी

दुबळी, कुढी, चिडखोर

यौवनात

सुंदर, लाडावलेली, मुकी बाहुली

आज

जिद्दी, पाताळयंत्री, हैवान

म्हणून ओळखली जाणारी

आणि ओळखलीच नाही वाटणारी

आणखी कोण ?

# दॅट वूमन–ती बाई

एका अपूर्व राजकीय कर्तृत्वाच्या

बेंगलोर ते ढाका

अशा अनपेक्षित जबर झेपेचा

बिनराजकीय दृष्टिकोनातून

आलेख चितारणारी

लेखमाला

# दॅट वूमन–ती बाई

माणूसमधून

लवकरच सुरू होत आहे.

**लेखक : विजय तेंडुलकर**

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH 649

